‘ प्रकाश ’ मंडळ, पुस्तक ६ वें.

# स्त्रियांचे हक्क व सुधारणा


लेखक

वासुदेव विनायक जोशी,

बी. ए., एल्एल्. बी. वकील, बडोदें.



१५ डिसेंबर ] किंमत ८ आणे [ १९३८

प्रकाशक
द्यार्णव रघुनाथ कोपर्डेकर,
'प्रकाश' मंडळ, ५२९ सदाशिव पेठ, पुणें.

मुद्रक
शंकर रामचंद्र दाते, बी. ए.
लोकसंग्रह छापखाना, ६२४ सदाशिव पेठ, पुणें.

नगर वाचनालय, सातारा.

# वाचकांस—

राजरत्न श्री. वासुदेव विनायक जोशी यांचें हें दुसरें पुस्तक आम्हीं प्रसिद्ध करीत आहों. गेल्या पुस्तकांत समाजधारणेचीं जीं दोन प्रमुख अंगें म्हणजे पति आणि पत्नी यांची एकमेकांसंबंधीं व समानविषयक अशी कोणती जबाबदारी येऊन पडते याचें त्यांनीं कुशल रेखाटन केलेलें होतें. परंतु समाजरथाचीं दोन चाकेंच अशा रीतीनें पतिपत्नीचा दर्जा असतांना समाज, कायदा आणि धर्माच्या नांवाखालीं चाललेल्या आचारविचारांचा जुलूम व जबरदस्ती यांच्या ओझ्याखालीं स्त्री किती वांकून गेली आहे याचें विवेचन त्यांनीं या पुस्तकांत केलेलें आहे. अज्ञानावस्थेंत झालेले विवाह, विधवेला मिळणारी पतीच्या मालमत्तेची वांटणी, नवरा मेल्यानंतर घरांत होणारी तिची कुचंबणा यांचीं प्रत्यंतरें जागोजाग दिसून येतच आहेत. परंतु या सर्व अडचणींतून मार्ग शोधून काढण्यास सदरहू पुस्तक उपयुक्त होईल. श्री. जोशी यांना जनतेनें स्त्रियांचे वकील, स्त्रियांचे कैवारी वगैरे अनेक पदव्या दिल्याच आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव हा फक्त बडोद्यापुरताच संकुचित राहिलेला नसून तो वाढत आहे. अशा वेळीं त्यांनीं हें पुस्तक अगदीं योग्य वेळीं प्रसिद्ध करूं दिल्याबद्दल आम्हीं त्यांचें अभिनंदन करीत आहों; परंतु जनतेनेंहि हें पुस्तक वाचून त्यांतील ग्राह्यांश घ्यावयास हवा व यासाठीं ह्या पुस्तकाची किंमत अल्प ठेविली आहे.

स्त्रियांच्या प्रश्नांवर 'पराधीन,' 'जन्माचा बंदिवास' वगैरे कादंबऱ्या लिहून श्री. जोशी यांनीं स्त्रिया आणि तत्संबंधींचे हक्क व अडचणी यांचा साकल्यानें विचार केलाच आहे. परंतु वैदिक व स्मार्त काळापासूनच्या ऋग्वेद, मनुस्मृति वगैरे ग्रंथांच्या साहाय्यानें त्यांनीं आपलीं मतें या पुस्तकांत अधिक स्पष्टपणें मांडलीं आहेत. श्री. जोशी यांचीं इतरहि कांहीं पुस्तकें महाराष्ट्र वाचकांच्या सेवेस सादर करण्याची आमची मनीषा आहे आणि त्यासाठीं त्यांजकडून सक्रिय साहाय्याची आम्हीं अपेक्षा करीत आहों.

ता. १४।१२।३८<br>पुणें २

द. र. कोपर्डेकर

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ लें | हक्कांचें स्वरूप .... .... .... | १ |
| प्रकरण | २ रें | इतरधर्मीय स्त्रियांचे कायदेशीर हक्क .... | १४ |
| प्रकरण | ३ रें | कन्येचे वैयक्तिक हक्क .... .... | २५ |
| प्रकरण | ४ थें | धटस्फोट .... .... .... | ३८ |
| प्रकरण | ५ वें | बहुपत्नीकत्व .... .... .... | ६० |
| प्रकरण | ६ वें | कन्येचे आर्थिक हक्क .... .... | ६८ |
| प्रकरण | ७ वें | सुवासिनीचे आर्थिक हक्क .... .... | ७६ |
| प्रकरण | ८ वें | विधवेचे आर्थिक हक्क .... .... | ८४ |
| प्रकरण | ९ वें | मालकीहक्काचें स्वरूप .... .... | ९५ |
| प्रकरण | १० वें | उपसंहार .... .... .... | १०७ |

र वाचनालय, सातारा.

# स्त्रियांचे हक्क व सुधारणा

## प्रकरण १ लें

## हक्कांचें स्वरूप

**प्रास्ताविक—**

हिंदु स्त्रियांच्या आर्थिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्याचा पुरस्कार अलीकडे स्त्रियांनीं चालविलेल्या चळवळींत प्रामुख्यानें करण्यांत येत आहे. खुद्द स्त्रियांनींच आपलीं गाऱ्हाणीं वेशीवर टांगण्याचा जो प्रयत्न चालविला आहे, तो बदलत्या काळाचा द्योतक असून उदयोन्मुख उन्नतीचा अरुणोदय आहे. अशा या महत्त्वाच्या काळीं स्त्रियांचे हक्क काय आहेत याचें विवेचन, व ते कोणकोणत्या बाबतींत सुधारून घेतले पाहिजेत, याबद्दल विधायक सूचनांचें दिग्दर्शन शक्य तेवढ्या सोप्या भाषेंत करण्याचें ठरविलें आहे.

पूर्वी 'मनोरंजनां'त याच विषयावर विस्तृत अशी लेखमाला लिहिली होती; पण त्यांत बहुजनसमाजाला व विशेषत: भगिनीवर्गाला न समजेल असे कित्येक कायद्यांचे गुंतागुंतीचे मुद्दे घेऊन विवेचन केलें होतें. शिवाय त्यांत कित्येक महत्त्वाची माहिती देण्याचें राहून गेलें होतें. या लेखमालेनंतर हिंदु स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा निर्णय करण्यासाठीं बडोदें सरकार आणि म्हैसूर सरकार यांनीं नेमलेल्या समित्यांचीं निवेदनें बाहेर पडलीं आहेत. त्यांपैकीं बडोदें सरकारी कमिटीवर लेखक स्वत: असल्यानें पूर्वीच्या त्याच्या बऱ्याच कल्पना वादविवादाच्या टाकीनें अधिक रेखीव व नीटनेटक्या झाल्या आहेत. तेव्हां या विषयावर पुन: लिहिण्याचें ठरविलें आहे. भगिनीवर्गाला आपले हक्क कोणते याचें स्पष्ट स्वरूप समजावें, तसेंच त्यांना आपल्या मागण्या निश्चित करतां याव्या, हा ह्या लेखांचा उद्देश तर आहेच, पण विरोधकांचे

मुद्दे व ते खोडून टाकण्याचा युक्तिवाद याचेंहि ज्ञान त्यांना सहज व्हावें असाहि एक हेतु आहे.

### कायदा, हक्क व जबाबदारी म्हणजे काय ?—

कायदेशीर हक्क असें आपण म्हणतों त्याचा अर्थ काय ? यांत प्रथम कायदा या शब्दाचा अर्थ आपणांस नक्की केला पाहिजे. समाजधारणेच्या हेतूनें मनुष्यानें घालून दिलेले नियम असा कायदा या शब्दाचा अगदीं सोप्या भाषेंत अर्थ होतो. निरनिराळ्या मनोवृत्तींच्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज; तशांत काम, क्रोध, मद, मोह आणि मत्सर यांपैकीं एकाद्या विकारानें तरी प्रत्येक व्यक्तीस धुंदी चढलेली असते. अशा स्थितींतहि त्या सर्व व्यक्ती एकत्र राहतात याचें कारण म्हणजे कायद्याचें नियंत्रण होय. सर्कशींत शेळी आणि सिंह एका ताटांतून दूध पितात, याचें श्रेय जवळ उभा राहिलेल्या 'रिंग-मास्तरा'स आहे. सर्कशीची शिस्त सोडून अभिलाष मनांत धरून जर सिंह शेळीकडे पाहून गुरगुरूं लागला तर तत्क्षणीं त्याच्या पाठींत चाबकाचा तडाखा बसतो आणि चाबकाचा तडाखा बसेल या भीतीनेंच तो जन्मजात खाद्या-बरोबर मित्रत्वाच्या भावानें वागतो.

समाजांतहि राक्षसी वृत्तीचे इसम कमी असतात असें नाहीं, पण दुसऱ्या इसमाला ते मारझोड करूं लागले अगर दुसऱ्याचें वित्तसर्वस्व हरण करूं लागले तर त्यांचा समाचार घ्यायला कायदा उभा असतो. तसेंच त्या गरि-बाचें रक्षण करणारा पाठीराखा कायदाच होय. दुसऱ्याला मारहाण करणें अगर त्याचें वित्तसर्वस्व हरण करणें हे कायद्यानें गुन्हे ठरविले आहेत. आणि म्हणून हे गुन्हे करणाराला त्या गुन्ह्याबद्दल शिक्षाहि होते. या शिक्षेंतच पर्यायानें गरीब मनुष्याचें संरक्षण आहे. कारण शिक्षेच्या भीतीनेंच नर-पशूंनाहि दीनांच्याकडे वांकड्या नजरेनें पाहण्याचें धैर्य होत नाहीं. एकाद्या आडदांडानें शिक्षेची भीति गुंडाळून ठेवून निरपराधी माणसास मारहाण केली व त्याचें द्रव्य हरण केलें तर त्याला शिक्षा होईलच. पण याहिखेरीज त्यानें हरण केलेलें वित्त परत मिळवून देण्यास आणि झालेल्या मारहाणीबद्दल नुकसानी मिळवून देण्यास कायदा त्या निरपराधी मनुष्याच्या मदतीला धांवून येतो. हरण केलेलें द्रव्य परत द्यावें आणि नुकसानीबद्दल अमक पैसे द्यावे

असा त्या अपराधी मनुष्याला कोर्टाकडून हुकूम होतो आणि हुकुमाची अंमलबजावणी न्यायकोर्ट आपल्या अंमलदारांकडून करितें. म्हणजे कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठीं सरकारी कचेरीची आवश्यकता आहे, हें उघड आहे. सरकारनें जे नीतिनियम अंमलांत आणण्याचें ठरविलें असेल तेवढ्यांचीच अंमलबजावणी सरकारी कचेऱ्या करतील. तेव्हां कायदा म्हणजे सरकारनें मान्य केलेले समाजधारणेचे नियम होत.

हक्क म्हणजे काय तें आपण पाहूं. वरील उदाहरणांत निरपराधी मनुष्यावर दोन प्रकारें आपत्ति आली अशी आपण कल्पना केली आहे. एक शरीरास इजा व दुसरी द्रव्याची हानि. या दोहोंबद्दल त्याला कायद्याचें रक्षण मिळतें असें आपण वर म्हटलें आहे. आणि तें कां याचें उत्तर, व्यक्तिमात्रास शारीरिक सुरक्षणाचा आणि मालकीच्या द्रव्यसंरक्षणाचा हक्क आहे हें होय. व्यक्तिस्वातंत्र्य आणि आर्थिक स्वायत्तता, हे दोन मनुष्यमात्राचे महत्त्वाचे हक्क गणले जातात. या हक्कांवर हल्ला करणारें प्रत्येक कृत्य कायद्यानें दंडनीय ठरविलेलें आहे. कायद्यांत प्राणिमात्रांचे हक्क काय काय आहेत याचा जाहीरनामा कुठेंच प्रसिद्ध केलेला सांपडावयाचा नाहीं. पण महत्त्वाच्या हक्कांवर घाला घालणारें प्रत्येक कृत्य दंडनीय ठरविण्यानें वैयक्तिक हक्कांची प्रस्थापना कायद्यानें अस्फुटपणें केली आहे. तेव्हां हक्क म्हणजे काय तर त्याचें उत्तर असें कीं, ज्याला प्रतिकार करणें कायद्यानें निषिद्ध ठरविलें आहे असा व्यक्तिमात्राचा आचार.

हक्कांबरोबर जबाबदारी उत्पन्न होते. एकाद्या मनुष्यास रस्त्यानें जाण्याचा हक्क आहे असें आपण म्हटलें म्हणजे त्याला त्या रस्त्यानें जाऊं देण्याची जबाबदारी इतर सर्व लोकांवर आहे आणि त्याला अडथळा करणें हा गुन्हा होय. असें नसेल तर हक्क या शब्दाचें महत्त्वच राहणार नाहीं. खाजगी घरांत तिऱ्हाइतास येण्याचा हक्क नाहीं; मालकावर त्याला आंत येऊं देण्याची जबाबदारीहि नाहीं आणि त्यानें अडथळा केला तर तो गुन्हाहि होऊं शकणार नाहीं. म्हणजे हक्क आणि जबाबदारी हीं एकमेकांवर अवलंबून आहेत, इतकेंच नव्हे तर, एक दुसऱ्याशिवाय स्वतंत्र अस्तित्वांत येऊं शकत नाहीं. आतां हे हक्क आणि ह्या जबाबदाऱ्या अंमलांत आणण्याचें

कार्य न्यायकचेऱ्या करीत असल्या तरी कोणत्या हक्कांचें संरक्षण करावयाचें हें कायद्यानें ठरविलेलें असतें.

**हक्कांचें महत्त्व—**

व्यक्तिमात्राची उन्नति त्याच्या वैयक्तिक आणि आर्थिक स्वातंत्र्यावर अवलंबून असते. कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे त्याला जेवढे वैयक्तिक आणि आर्थिक हक्क जास्त तितकी त्याची उन्नति अधिक लवकर होते. जगाच्या सुरुवातीपासून आजपर्यंत वैयक्तिक हक्कविस्ताराची चळवळ जगांत झालेल्या मोठमोठ्या उलाढालींच्या मुळाशीं होती आणि पुढेंहि जगाच्या अंतापर्यंत ती तशीच असणार. वैयक्तिक हक्क हे शरीराप्रमाणें जन्मजात आहेत. समाजरचनेच्या पहिल्या अमदानींत ह्या हक्कांचें मोल देऊन संरक्षणाचा निवारा व्यक्तिमात्रानें मिळविला; पण याबद्दल भलती किंमत आपण दिली असा त्याला लवकरच पश्चात्ताप वाटूं लागला असावा. कारण वैयक्तिक स्वातंत्र्याच्या आकांक्षा बऱ्याच राज्यक्रांत्यांच्या पाठीमागें होत्या. ह्याच व्यक्तिस्वातंत्र्याच्या आकांक्षा लोकसत्तावादाच्या मूर्त स्वरूपांत आज प्रकट झाल्या आहेत व चुकूनमाकून राहिलेल्या एकतंत्री सत्तेच्या केन्द्रावर झडप घालण्यासाठीं त्या टपून बसल्या आहेत.

एकंदरींत वैयक्तिक स्वातंत्र्य आणि आर्थिक स्वामित्व, हीं दोन अभेद्य तत्त्वें आहेत. तेव्हां यांचें महत्त्व कोणत्या शब्दांत वर्णन करावें? स्त्रियांच्या बाबतींत हीं दोन तत्त्वें लागू कां न पडावींत? निग्रो लोकांची गुलामगिरी जर अन्यायी म्हणून ठरली तर घरोघर दिसून येणारी स्त्रियांची गुलामगिरी कोणत्या मुद्यावर समर्थनीय ठरेल? कुटुंबांतल्या वडील माणसाच्या हातीं मिळकतीवरचें स्वामित्व राहावें आणि स्वतः इतर व्यक्ति मिळकती म्हणून गणल्या जाव्यात, ही रोमन लोकांतील कुटुंबपद्धति व त्याच्याशीं तंतोतंत जुळणारी हिंदु कुटुंबपद्धति कालाच्या ओघानें वाहून गेली. कुटुंबांतील पुरुषांना मिळकतीवर वडील माणसाइतकेंच स्वामित्व मिळालें. अशा स्थितींत स्त्रियांना तरी त्या मिळकतीच्या स्वामित्वाच्या हक्कापासून किती दिवस वगळून ठेवतां येईल?

जगांतील निरनिराळ्या देशांच्या इतिहासाकडे पाहिलें तर त्यांतहि

नगर ... वाचनालय

हिंदु स्त्रियांच्या आजच्या परवशतेप्रमाणें त्या त्या देशांतील स्त्रियांची जुन्या काळची पराधीनता आढळून येईल. पण तीहि परवशता बदलत्या काळाबरोबर नाहींशी झाली आणि आज पाश्चात्य देशांत स्त्रिया ह्या पुरुषांच्या बरोबरीचे हक्क उपभोगीत आहेत. तेव्हां हिंदु स्त्रियांना ते हक्क केव्हां तरी मिळणार अगर द्यावे लागणार हें उघड आहे.

## हिंदुधर्मशास्त्राचें स्वरूप—

आज ह्या बाबतींत प्रचलित असलेला कायदा म्हणजे हिंदुधर्मशास्त्र. त्याचा उगम अगदीं वैदिक कालापासून दाखवितां आला तरी काल-विस्ताराच्या निरनिराळ्या भागांतून वाहात बाहेर पडलेला आजचा कायदा हा उगमस्थानीं दिसणाऱ्या निर्मळ आणि बारीक झऱ्याप्रमाणें थोडाच कायम आहे ? त्यांतहि परिस्थितीचे निरनिराळे वळसे घेतां घेतां त्याला आपद्धर्माचें बरेंच वाळवंट रिकामें सोडावें लागलें; तसेंच नवीन येऊन मिळणाऱ्या विचार-सरणीच्या झऱ्यांना पोटांत घ्यावें लागलें व कित्येक वेळां त्यामुळें त्याचें मूळचें स्वच्छ पाणी गढूळहि झालें. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हिंदुधर्मशास्त्रांत, त्याच्या तत्त्वांत आणि तपशिलांत एकसारखे फरक होत गेले आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आमचें हिंदुधर्मशास्त्र वेदप्रणीत आहे व वेद अपौरुषेय आहेत, तेव्हां त्यांत फेरफार करण्याचा कोणासहि हक्क नाहीं, असा एक हटवादी मुद्दा पुढें मांडण्यांत येतो; पण त्यांत बिलकूल तथ्य नाहीं. हिंदुधर्म-शास्त्र एकसारखें बदलत आलें आहे. वेदकालीन कायदा स्मृतींनीं पालटून टाकला. स्मृतींतील कायदा निबंधकारांनीं (टीकाकारांनीं) फिरवून टाकला आणि न्यायकचेऱ्यांनीं त्या सर्वांची छाटाछाट केली. अशी वस्तुस्थिति असतां स्मृतींत अगर टीकाग्रंथांत स्त्रियांविषयीं जें अनुदार धोरण ठेवून हक्कांचें विवेचन केलें आहे, तें फिरविण्याचा कोणास अधिकार नाहीं असें म्हणण्यांत काय अर्थ आहे ? वर आपण पाहिलेंच आहे कीं, कायदा म्हणजे समाज-धारणेचे सरकारनें घालून दिलेले नीतिनियम. समाज बदलतो ही गोष्ट मान्य असेल तर बदलत्या समाजाचें आकलन करणारे नियम—कायदा हाहि बदलला पाहिजे. नाहींपेक्षां समाजाशीं विसंगत असलेला कायदा समाज-धारणेचें कार्य कसें करूं शकेल ? पांच वेळां खावें व झटून अभ्यास करावा

हे लहान मुलांच्यापुरते शिस्तीचे नियम योग्य होत; पण तें मूल जाणतें माणूस झालें अगर वृद्धावस्थेंत गेलें तरी या दोन नियमांचें पालन त्यानें केलेंच पाहिजे असें म्हणणें कितीसें शहाणपणाचें होईल ?

समाजाचें शेंकडों वर्षांपूर्वी ज्या नियमांनीं एकीकरण करतां आलें असेल ते नियम आजच्या यांत्रिक युगाच्या राजवटींतहि अबाधित राहिले पाहिजेत, असा हट्ट धरणें कितपत वाजवी होईल ? चार हजार वर्षांपूर्वींच्या नैसर्गिक शारीरिक जरूरीवर दृष्टि ठेवून रानावनांत भटकणाऱ्या समाजाचें नियंत्रण करण्यासाठीं घालून दिलेले दंडक शहरांत राहून यांत्रिक सुखसाधनांच्या आधीन झालेल्या आजच्या समाजावर लादणें कितपत न्याय्य होईल ? समाज बदलला व आपले नीतिनियमहि बदलले आहेत. समाजाच्या पावलाशीं पाऊल टाकीत कायदा जर चालेल, तरच त्याला समाजाची रखवाली करतां येईल. जर त्याच्यांत आणि समाजस्थितींत अंतर पडेल तर मागें रेंगाळत चालणाऱ्या कायद्याला समाज झुगारून देईल. तेव्हां बदलत्या काळाबरोबर कायदाहि बदलला पाहिजे असें म्हणणें भाग पडतें.

### हक्क : वैय्यक्तिक व आर्थिक—

विवेचनाच्या दृष्टीनें कायदेशीर हक्क दोन प्रकारचे असूं शकतील. (१) वैयक्तिक व (२) आर्थिक. वैयक्तिक हक्कांत वैयक्तिक स्वातंत्र्य तर येतेंच; शिवाय वैवाहिक जीवनचरित्राचे निरनिराळे हक्कहि त्यांतच समाविष्ट होतात. स्वतःच्या लग्नाला संमति देणें, लग्न करणें न करणें आपल्या मर्जीवर अवलंबन असणें व लग्नानंतर निरनिराळ्या कारणपरत्वें पतीपासून फारकत मिळवून निराळें राहणें अगर घटस्फोट करून घेणें, हे अधिकार वैयक्तिक हक्कांच्या कक्षेंत येतील. तसेंच मुलांच्या पालकत्वाचा हक्क व त्यांचीं लग्नकार्यें करण्याचा अधिकार, तसेंच मुलगा दत्तक घेण्याचा अगर देण्याचा अधिकार, हे सर्व वैयक्तिक हक्कांचे निरनिराळे प्रकार होत. यांपैकीं विशेष जाचणुकीचा मुद्दा पाहिला तर तो लग्नसंस्काराच्या बाबतींतला होय. लग्न करावें अगर अविवाहित राहावें, लग्न केलें तरी त्यांत मुलीची संमति घ्यावी कीं नाहीं, लग्न झाल्यावरहि तिला घटस्फोट मागण्याची मोकळीक असावी कीं नाहीं आणि घटस्फोट मागावयाचा म्हटला तरी तो कोणत्या कारणासाठीं

सातारा ... ग्रंथालय

मागतां यावा, वगैरे महत्त्वाचे प्रश्न जे समाजापुढें आज डोळे वटारून उभे ठाकले आहेत, त्या सर्वांची चर्चा वैयक्तिक हक्कांचें विवेचन करतांना करावी लागेल.

नंतर आर्थिक हक्कांच्या कक्षेंत काय काय गोष्टी येतात तें आपण पाहूं. आईबाप, पति अगर इतर नातेवाईक यांच्या मिळकतीचा वारसा घेण्याचा हक्क असणें, मिळालेल्या मिळकतीवर स्वतंत्र स्वामित्व असणें, वडिलार्जित मिळकतींत जन्मजात हक्क सांगतां येणें, हातीं आलेल्या मिळकतीची मृत्युपत्रानेंहि व्यवस्था करण्याचा अधिकार असणें आणि हे सर्व अधिकार पुरुषांच्या हरकतीवांचून अगर हरकती असूनहि अबाधितपणें भोगतां येणें यालाच आर्थिक स्वातंत्र्य असें संबोधितां येईल. रोजच्या अडचणींच्या बाबतींचा उल्लेख करावयाचा तर ते विषय थोडक्यांत असे : कन्येला पुत्राप्रमाणें वडिलार्जित मिळकतींत जन्मजात हक्क असावा कीं नाहीं, तसेंच बहिणीला भावाच्या बरोबर वारसा मिळावा कीं नाहीं, आजन्म अविवाहित राहणाऱ्या मुलीची पालनपोषणाची व्यवस्था कुटुंबाच्या मिळकतींतून व्हावी कीं नाहीं, लग्नानिमित्त मुलीच्यासाठीं होणारा खर्च कोणत्या प्रमाणांत असावा, हुंड्याच्या रकमेवर तिची मालकी असावी कीं नाहीं, लग्न झाल्यानंतर पतीच्या मिळकतींत तिला कोणते हक्क असावेत व पतिनिधनानंतर पतीच्या मिळकतींत अगर पतीच्या कुटुंबाच्या मिळकतींत मुलांच्या बरोबर वा मुलांच्या अभावीं तिला काय हक्क मिळावेत, वारसाई हक्कानें अगर स्वकष्टानें मिळविलेल्या मिळकतींत पतीच्या हयातींत आणि पतीच्या पश्चात् संपूर्ण स्वामित्व असावें कीं नाहीं, वगैरे गोष्टी आर्थिक हक्कांची चर्चा करतांना पाहाव्या लागतील. तेव्हां सहजासहजी विवेचनापुरते या विषयाचे दोन भाग पडतात व यापुढें त्याच धोरणानें विवेचन करावयाचें आहे.

## कायदेशीर हक्कांचें ऐतिहासिक समालोचन—

हिंदु स्त्रियांचे आजमितीस काय काय हक्क आहेत, हें नमूद करण्याच्या अगोदर पूर्वींच्या काळीं काय हक्क होते याचें विवेचन करणार आहोंत. त्यावरून बरींच मार्गदर्शक अशीं प्रमेयें सांपडणार आहेत. ऐतिहासिक दृष्टीनें

पाहतां असें म्हणावें लागेल कीं, स्त्रियांचे हक्क उत्कर्ष आणि अपकर्ष ह्या दोन्ही अवस्थांतून निरनिराळे कालखंड ओलांडून बाहेर पडलेले आहेत.

वैदिक कालांत स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें सर्व बाबतींत सारखें हक्क होते. स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य व वैयक्तिक स्वातंत्र्य यांची परमोत्कर्षाची अवस्था वेदकालीन निकोप समाजरचनेंत आढळून येते. प्रौढविवाह व प्रीति-विवाह होत असत; इतकेंच नव्हे तर, पुर्नविवाहहि होत असत. नवऱ्याच्या मिळकतींत, फार काय पण नवऱ्याच्या कुटुंबाच्या मिळकतींतहि तिला बरोबरीचे हक्क मिळत असत. तसेंच बापाच्या मिळकतींत मुलीला मुलाच्या बरोबरीनें हिस्सा मिळत असे, व आजन्म अविवाहित राहणाऱ्या मुलीहि निघत असत. मिळकत दुसऱ्या कोणास द्यावयाची असेल अगर धर्मकार्यांत खर्च करावयाची असेल तरी पतीला पत्नीची संमति घ्यावी लागत असे व दोघांनाहि यज्ञाचे अधिकार सारखेच असत.

यानंतरच्या काळांत थोडीशी पीछेहाट होण्यास सुरुवात झाली. यज्ञाचे वेळीं मादक सोमरसाचें सेवन करण्याचा प्रघात असे; पण स्त्रियांच्या नाजूक शरीरप्रकृतीस तें झेंपणार नाहीं, म्हणून त्यांना सोमरसपानापासून वगळण्यांत आलें. "स्त्रिया ह्या शरीरानें कमताकद आहेत, तेव्हां त्यांना भाग देणें योग्य नाहीं." हा नियम सोमरसाच्या वांटणीपुरता असूनहि बौद्धायनानें त्याच्या आधारावर स्त्रियांना मिळकतीचा भाग मिळूं नये, असा या ऋचेचा अर्थ केला. त्या वेळच्या अधोगतीच्या उतरंडीस लागलेल्या समाजानें बौद्धायनाचें पांडित्य शिरसा वंद्य मानलें आणि स्त्रियांच्या मूळच्या स्वतंत्र हक्कांची जी छाटाछाट समाजानें यापूर्वींच अंमलांत आणण्यास सुरुवात केली होती, ती शास्त्रसंमत आहे असें ठरलें. वैदिक कालांत जास्तींत जास्त हक्क उपभोगणाऱ्या तेजस्वी स्त्रियांनीं त्यांच्या हक्कांवर होणारें हें अतिक्रमण निमूट-पणें कां सहन केलें व सुसुष्ठ समाज अधोगतीच्या उतरंडीवरून घसरत खालीं कसा येऊं लागला, हें एक कोडें वाटतें. पण त्याचें उत्तर सोपें आहे. आर्य लोक उत्तरेकडील निवासस्थान सोडून दक्षिणेंत फैलावूं लागले; त्या वेळीं त्यांना तेथील मूळच्या रहिवाश्यांशीं अहर्निश झगडत राहावें लागत होतें. पूर्वींचे आचाराचे नियम त्यांना बदलावे लागले. पूर्वींची उपजीविकेची विवंचना जाऊन तिचे ठिकाणीं शत्रूशीं तोंड देण्याची त्यांना काळजी लागूं लागली.

जसजसे आर्य लोकांचे थवे दक्षिणेकडे लांबवर घुसूं लागले, तसतसे त्यांचें मातृभूमीशीं दळणवळण तुटूं लागलें. दरेक समूह आपआपल्यापुरता रक्षणाचा मार्ग शोधूं लागला. लढणाऱ्या व्यक्तींची महति वाढली. तेव्हां अर्थात् जात्या स्त्रिया ह्या लढाईच्या कामीं पुरुषांच्या मानानें कमताकद असल्यानें त्या मागें पडूं लागल्या. पुरुषांचें महत्त्व समाजांत आणि कुटुंबांत भलतेंच वाढलें आणि कालांतरानें स्त्रिया ह्या पुरुषांवर अवलंबून राहिलेल्या रक्षणीय दुर्बळ चिजा वाटूं लागल्या.

याच वेळेस चूल व मूल हीं आजचीं जीं स्त्रियांचीं सर्वमान्य ध्येयें गणलीं जातात, त्यांचा उगम झाला असावा. कुटुंबाचें अगर समाजाचें बळ त्यांतील पुरुषांच्या संख्येवर अवलंबून राहिलें; त्यामुळें अधिक पुत्र उत्पन्न करणें हें त्या काळच्या संसारी मनुष्याचें ध्येय बनलें. त्यासाठीं पूर्वीचें एकपत्नीव्रत मागें पडून एकापेक्षां अनेक लग्नें करण्याचा प्रघात पडला; फार काय पण जुन्याच्या अभिमान्यांनाहि लाजेनें खालीं माना घालण्यास लावणारी नियोगाची चाल हिंदुसमाजांत रूढ झाली. अनार्य लोकांशीं शत्रुत्व ठेवून त्यांच्याशीं सतत लढणारे आर्य लोक ठिकठिकाणीं वसाहती करूं लागले, तेव्हां अनार्यांच्या अडाणी चाली न कळत त्यांच्या मानगुटीं बसल्या; आणि बहुपत्नीकत्वाची चालहि कांहींशी जरूरीची तर कांहींशी अनार्यांची नक्कल म्हणून रूढ झाली असावी. हें बहुपत्नीकत्वाचें पाप इतकें वाढलें आणि पुत्रोत्पत्तीच्या कार्यक्रमाचें इतकें अवास्तव स्तोम माजलें कीं, आर्य लोकांनीं अनार्य स्त्रिया आपल्या बायका म्हणून घरांत घातल्या व शास्त्रानें अनुलोम विवाहाच्या शिक्कामोर्तबानें ह्या अनाचारास मान्यता दिली. यज्ञयाग करणारे आर्य लोक त्या काळींहि यज्ञयाग करीत असत; पण स्त्रियांना यज्ञयागांत भाग घेण्याचा अधिकार होता तो याच काळांत नाहींसा झाला. स्त्रिया ह्या सर्वतोप्रकारें पराधीन बनल्या. फार काय, पण त्या स्वत: पुरुषांची मिळकत म्हणून ठरल्या. विवाहाचे निरनिराळे आठ प्रकार व नियोगपद्धति ह्यांवरून स्त्रियांबद्दलची किती अधम कल्पना त्या काळीं धर्मग्रंथांत रूढ होती याची वाचकांना खात्री होईल. स्त्रियांचें मिळकतीवरचें स्वामित्व यापूर्वींच नाहींसें करण्यांत आलें होतें. तथापि स्त्रीधनाची जी पुसट कल्पना जिवंत राहिली होती, तिचा

येवढा संकुचित अर्थ शास्त्रकार करीत सुटले कीं, त्यांनीं व्यवहारांत त्या कल्पनेचे जमिनीला पायच लागूं दिले नाहींत.

यानंतरचा काळ स्मृति-काळ होय. निरनिराळ्या स्मृतींत एकाच आचाराबद्दल निरनिराळे विधि-निषेध आढळून येतात व एकाच स्मृतिग्रंथांतून परस्परविरोधी असे नीति-नियम सांपडतात, याचें इंगित हेंच असावें कीं, त्या वेळचा हिंदुसमाज जितका नादान तितकाच तो विस्कळित झालेला असावा. अशा समाजासाठीं कायदा घडविण्याचा स्मृतिकारांनीं प्रयत्न केला खरा; पण त्यांनाहि कडक नीतिनियमांची भलतीच पल्लेदार उडी घेतां येणें शक्य नव्हतें. कांहीं चालू रीतिरिवाज तर कांहीं निर्भेळ नीतितत्त्वें, अशी सांगड घालून त्यांना स्मृतिग्रंथ लिहावे लागले. म्हणून स्मृतिग्रंथांत स्त्रियांबद्दल ज्या कित्येक अनुदार कल्पना व्यक्त झालेल्या दिसतात त्या स्मृतिकालीन समाजस्थितीच्या द्योतक होत. स्त्रियांना कायमचें नालायक ठरविण्याचा अगर त्यांची अधोगति करण्याचा हेतु स्मृतिकारांचा असणें अशक्य होय. उलट स्मृतिकारांनीं कांहीं कांहीं बाबतींत विसरून गेलेलीं वैदिककालीन तत्त्वें पुन्हां सजीव केलीं. बहुपत्नीकत्वाच्या रूढीला त्यांनीं बरेच पायबंद लावले व स्त्री वांझ असेल, कर्कशा असेल, रोगी असेल तरच तिच्या पतीनें दुसरें लग्न करावें अशी सवलत त्यांनीं ठेविली. बालविवाह यापूर्वीच रूढ झाला होता. तथापि तारुण्यांत येईतोंवर आईबापांनीं मुलीचें लग्न योग्य वराशीं करून दिलें नाहीं तर तिचा तिनें नवरा पसंत करून त्याच्याशीं लग्न लावावें अशी जुन्या स्वयंवराची आणि चालू बालविवाहाची त्यांनीं सांगड घातली. वधूपरीक्षेप्रमाणेंच त्यांनीं वरपरीक्षेच्या अटी घालून दिल्या. कुल, शील, विद्या, शरीर, वय या दरेक बाबतींत सर्वथैव योग्य असलेल्या वरासच पित्यानें कन्या द्यावी आणि असा योग्य वर मिळाला नाहीं तर खुशाल जन्मभर तिला अविवाहित ठेवावें, असा कडक शिस्तीचा नियम बालविवाहास चटावलेल्या प्रौढांच्यावर त्यांनीं लादला. इतकें करूनहि जाणूनबुजून अगर अजाणपणें अयोग्य वराशीं कन्येचा विवाह झाला तर कांहीं कारणासाठीं अशा त्या नवऱ्यास सोडून दुसऱ्याशीं पुन्हां विधियुक्त लग्न करण्याचा हक्क त्यांनीं स्त्रियांना दिला. आणि हीच त्यांची योजना आजकालच्या घटस्फोटाच्या चळवळीची पाठीराखी आहे. स्त्रीधनाचें त्यांनीं पुनरुज्जीवन केलें, त्याचे

निरनिराळे प्रकार ठरविले व त्यावर स्त्रियांचें स्वामित्व थोड्याफार फेरफारानें प्रस्थापित केलें. पति अगर पिता यांचा वारसा पुत्राच्या अगर भावाच्या अभावीं स्त्रीला मिळावा असें ध्वनित केलें. एकंदरींत पाहतां अधोगतीच्या गर्तेत बुडाशीं सांपडलेल्या हिंदुसमाजाला पृष्ठभागावर नसलें तरी उन्नतीच्या अर्ध्या वाटेवर आणून सोडण्याचें कार्य स्मृतिकारांनीं केलें असें सर्वसाधारणपणें म्हणतां येईल.

यानंतरचा काळ टीकाकारांचा होय. स्मृतिकारांनीं विशेषत: याज्ञवल्क्यस्मृतीनें जो उदारमतवादी पंथ सुरू केला त्या पंथाचा विस्तार तत्त्वाच्या तपशिलानें व अनुयायांच्या संख्येनें करण्यास जे स्वतंत्रसंप्रदाय-संस्थापक टीकाकार पुढें सरसावले, त्यांत मिताक्षरा ग्रंथाचा लेखक विज्ञानेश्वर व दायभाग ग्रंथाचा लेखक जीमूतवाहन या दोन तेजस्वी टीकाकारांचे स्त्रीजातीवर कायमचे उपकार झालेले आहेत. दायभाग आणि मिताक्षरा या दोन ग्रंथांतील स्त्रियांच्या बाबतींतील सर्व तत्त्वें एकत्रित केलीं आणि तीं अंमलांत आणलीं तर स्त्रियांच्या आर्थिक हक्कांची अशी समर्पक योजना तयार होईल कीं जी आजकालच्या आकांक्षा तृप्त करील; इतकेंच नव्हे तर, आजपासून शें दीडशें वर्षांनंतरच्या आकांक्षाहि पुऱ्या करील. वैयक्तिक हक्कांचा पुरस्कार मागें पडला व स्मृतिकालापूर्वीं जो ऱ्हास सुरू झाला होता तो स्मृतिकारांनाहि थांबवितां आला नाहीं; कारण स्मृतिकारांनीं जे वैयक्तिक हक्क सजीव करण्यास उत्तेजन दिलें, ते हक्क इतके झपाट्यानें नामशेष झाले कीं, आज त्यांचा मागमूसहि दिसत नाहीं. वैयक्तिक हक्कांबद्दल आजची परिस्थिति एका शब्दांत व्यक्त करावयाची म्हणजे ‘पराधीनता’ हा शब्दप्रयोग वापरावा लागेल.

**प्रस्तुतचे कायदेशीर हक्क**—

आजमितीस कायद्यानें स्त्रियांचे कोणकोणते हक्क मान्य केले आहेत, तें आपण पाहूं. विषयविवेचनांत दरेक हक्काबद्दल विस्तृतपणें लिहावें लागणारच आहे म्हणून थोडक्यांत येथें त्यांचे हक्क नमूद करणार आहोंत.

प्रथम आपण वैयक्तिक हक्क घेऊं. अज्ञान मुलीचें पालन करण्याचा हक्क व कन्यादान करण्याचा हक्क तिच्या पित्याला असतो. लग्न करण्यांत

मुलीची संमति घेण्याची जरूरीच नसते. तिची संमति असो अगर नसो वडील मंडळींनीं कशाहि वराबरोबर तिचें लाविलेलें लग्न वज्रलेप होय. नवऱ्या मुलांत वय, विद्या, शील, स्वरूप यांपैकीं कोणत्या गोष्टी किती प्रमाणांत असाव्यात याचाहि निर्बंध नाहीं. तेव्हां वाटेल त्या वराशीं मुलीचें लग्न करून देण्याच्या आड अपत्यप्रेमाशिवाय कोणतीच गोष्ट येऊं शकत नाहीं. लग्नसंबंध एकदां झाला म्हणजे तो मृत्यूशिवाय कोणत्याहि कारणानें तुटत नाहीं. नवऱ्याचें षंढत्व, धर्मांतर, निर्दयता, व्यभिचार, दुष्ट वर्तन, असाध्य रोगीपणा अगर कायमचें नाहींसें होणें, या कोणत्याहि कारणानें लग्न मोडून टाकण्याचा आणि दुसऱ्याशीं पुन्हां लग्न करण्याचा हक्क विवाहित स्त्रीला नसतो. लग्न झाल्याबरोबर तिचें पालकत्व तिच्या नवऱ्याकडे येतें; व अज्ञान अगर सज्ञान स्थितींत तिचें स्वातंत्र्य कुंठित करण्याचा हक्क तिच्या नवऱ्याचा असतो. नवऱ्यानें वाटेल तेवढ्या बायका कराव्यात, वाटेल ते अनाचार करावेत; त्याच्या पत्नीला कांहींच हरकत घेतां येत नाहीं.

आतां आर्थिक हक्कांबद्दल विचार करूं. लहान मुलीला लग्न होईतोंपर्यंत वडिलांच्या मिळकतींतून अन्नवस्त्र मिळतें व कुटुंबाच्या ऐपतीप्रमाणें लग्नखर्च मिळतो. पित्याच्या मिळकतींत तिला मुलाबरोबर कधींच वारसा हक्क मिळत नाहीं. तसेंच लग्न झाल्यानंतर तिची हलाखीची स्थिति होवो अगर ती निराधार वैधव्य स्थितींत असो, वडिलांच्या मिळकतींतून तिला अन्नवस्त्रहि मिळण्याचा हक्क नाहीं. तिचा बाप विभक्त आणि निपुत्रिक स्थितींत मरण पावेल तर तिला त्याचा वारसा मिळतो. विवाह झाल्यानंतर तिला नवऱ्याकडून अन्नवस्त्र मागण्याचा हक्क मिळतो, मात्र ह्या हक्काचा नवऱ्याच्या मिळकतीवर बोजा पडत नाहीं. नवऱ्याच्या कर्जापायीं मिळकतीचा लिलांव झाला, विक्री झाली तर तिचें कांहींच चालत नाहीं. नवऱ्याच्या कमाईंत तिला कांहीं हक्क मिळत नाहींत, पण विवाहित स्थितींत तिऱ्हाइतांकडून तिला मिळकत बक्षिस मिळालेली अगर तिनें स्वकष्टानें कमाविलेली असेल तर नवऱ्याच्या संमतीवांचून त्या मिळकतीची विल्हेवाट तिला करतां येत नाहीं. नवऱ्याच्या पश्चात् त्याच्या मिळकतींतून पुत्राच्या बरोबरीनें मिळकत वांटणी करून मागण्याचा हक्क असतो. मरणसमयीं विभक्त असेल आणि त्याला पुत्र नसेल तेव्हां तिला नवऱ्याची मिळकत वार-

साई हक्कानें मिळते. अशी जी वारसाई हक्कानें तिच्या हातीं मिळकत येते त्या मिळकतीवर तिची मालकी मर्यादित असते. म्हणजे त्या मिळकतीच्या उत्पन्नाचाच विनियोग तिला स्वतःकडे करतां येतो. स्वतःचें पोषण, पतीची श्राद्धादि धर्मक्रिया, कुटुंबांतील मुलींचीं लग्नकार्यें व मिळकतीचें संरक्षण करण्यासाठीं मात्र मिळकत गहाण अगर विकत देण्याचा तिला अधिकार आहे. ती मिळकत तिच्या पश्चात् तिच्या नवऱ्याचे चवदा पिढ्यांपर्यंतचे जे वारस, त्यांना मिळावयाची असते.

---

## प्रकरण २ रें

# इतरधर्मीय स्त्रियांचे कायदेशीर हक्क

परधर्मीय स्त्रियांचे कायदेशीर हक्क काय काय आहेत, याची थोडक्यांत नोंद केली असतां अस्थानीं होणार नाहीं. कारण त्यावरून हिंदु स्त्रियांच्या हक्कांची तुलना करणें वाचकांना सुलभ जाईल. प्रथम आपण हिंदुस्थानांतील निरनिराळ्या धर्मांत काय काय हक्क आहेत तें पाहूं.

**मुसलमान स्त्रियांचे हक्क—**

मुसलमान स्त्रियांचे वैयक्तिक हक्क येणेंप्रमाणें आहेत: लग्न हा करार असल्यामुळें लग्नांत तिच्या संमतीची अपेक्षा ठेविलेली असते व ती अज्ञान असेल तेव्हां तिच्यातर्फे तिचे पालक संमति देऊं शकतील. मात्र अज्ञानावस्थेंत लग्न झालेलें असेल आणि तिला तें पसंत नसेल, तर वयांत येतांच तें नाकबूल करण्याचा हक्क कायद्यानें तिला दिला आहे. तिच्या नवऱ्याला एका वेळीं चारापेक्षां जास्त लग्नाच्या बायका करतां येत नाहींत. नवऱ्याच्या मनांत आलें तर लागोपाठ तीन वेळां 'तल्लाक' हा शब्द उच्चारून त्याला काडीमोड करून घेतां येते. घटस्फोट मागण्याचा हक्क मुसलमानी धर्मांत स्त्रियांच्या वांट्यास ठेविलेला नाहीं. आर्थिक हक्कांबद्दल पाहावयाचें तर असें म्हणतां येईल कीं वारसा, हुंडा अगर स्वतःची कमाई व कोणत्याहि कारणानें त्यांना मिळालेल्या मिळकतीवर त्यांचें संपूर्ण स्वामित्व असतें. म्हणजे त्यांच्या मनास येईल त्याप्रमाणें मिळकतीची विल्हेवाट करण्याचा त्यांना अधिकार असतो. मुसलमानी धर्मांत शिया आणि हनाफी असे दोन संप्रदाय आहेत. आणि त्यांचे वारसाईचे क्रम व हिस्से निरनिराळे आहेत. मुसलमानी धर्मास अविभक्त कुटुंबपद्धति मान्य नाहीं. दोन्ही पंथांत बायको, मुलगी, आई, आजी आणि बहिण यांना ठराविक हिस्से मरणाराच्या पश्चात् राहिलेल्या मिळकतींतून मिळतात. जसें मुलें असतील तर बायकोला आठवा; नाहीं तर चौथा. मुलें असतील तर आईला सहावा; नाहींतर तिसरा; आजा

... नगर ...



नसेल तर आजीला सहावा; भाऊ नसेल तर मुलींला अर्धा आणि भाऊ असेल तर भावाच्या निम्मा; आणि बहिणीस सख्खा भाऊ नसेल तर अर्धा, ह्याप्रमाणें वारसाई हक्कानें मिळकत मिळते. लग्नानिमित्तानें नवऱ्याकडून देणगी म्हणून मिळणाऱ्या मिळकतीला मेहेर म्हणतात. आणि मेहेरची बाबत मुसलमानी स्त्रियांच्या दृष्टीनें महत्त्वाची आहे. लग्नाच्या वेळेस हुंड्याप्रमाणेंच मुसलमानी स्त्रिया मेहेरची रक्कम अडवून ठरवून घेतात आणि मेहेरच्या रकमेचे रोख अगर कालांतरानें द्यावयाची असे जरी दोन भाग असले तरी ती रक्कम हातीं आल्याशिवाय स्त्री लग्नसंबंध पार पाडणार नाहीं असें ती पतीला म्हणू शकते. ही मेहेरची रक्कम कर्ज म्हणून समजली जाते आणि मयताच्या मिळकतींतून ती दिल्यानंतरच बाकी राहिलेल्या रकमेंतून वारसांना मिळकत मिळते.

## पारशी स्त्रियांचे हक्क—

पारशी लोकांत लग्न करार म्हणून समजला जातो. अर्थात् उभयतां स्त्रीपुरुषांची संमति लग्नांत असणें जरूरीचें असतें. मुलीची लग्नास संमति घेण्यांत येते. इतकेंच नव्हे तर, लग्न झाल्यानंतरहि तिला नवऱ्यापासून घटस्फोट व फारकत मागतां येते. नवऱ्यानें परधर्म स्वीकारला, दुसऱ्या स्त्रीशीं लग्न केलें, व्यभिचार केला, बलात्कार केला, पशुता दाखविली, त्याच्या वर्तनांत निर्दयता दिसून आली, अगर त्यानें पत्नीचा त्याग केला, तर स्त्रीला तिच्या मर्जीनुरूप घटस्फोट अगर फारकत घेतां येते. व्यक्तिशः ती पूर्ण स्वतंत्र असते. पारशी स्त्रियांना मिळकत संपूर्ण अधिकारानें भोगतां येते. वारसा हक्क, लग्नाची पेहरामणी, लग्नाची व्यवस्था, बक्षिस आणि स्वकष्टार्जन या योगानें मुख्यतः त्यांना मिळकत मिळत असते. लग्नाची पेहरामणी अगर मुलीनें घेतलेला हुंडा, तसेंच लग्नव्यवस्था हीं तिच्या मर्जीप्रमाणें ठरत असतात. तेव्हां त्याची इयत्ता कायद्यानें ठरविलेली नाहीं. वारसाई हक्कासंबंधानें पाहिल्यास मयताच्या पश्चात् मुलाला चार भाग, विधवेला दोन भाग व मुलीला एक भाग याप्रमाणें वारसाईचा क्रम आहे. मुलगा अगर मुलगी नसेल, पण मयताचे आईबाप अगर दुसरे नातेवाईक असतील तर विधवेला अर्धी मिळकत मिळते. आईला वंशजांच्या अभावीं भाग मिळावयाचा असतो

व बाप जिवंत असला तर बापाचा अर्धा हिस्सा आईला मिळकत मिळते. पारशी गृहस्थास स्वतःची पत्नी, मुलगी व आई ह्यांचें भरणपोषण करावें लागतें.

## हिंदी ख्रिश्चन स्त्रियांचे हक्क—

हिंदुस्थानांतील ख्रिश्चन लोकांचे वैयक्तिक हक्क निरनिराळ्या कायद्यांनीं ठरविलेले आहेत. त्यांचा धर्म ख्रिस्ती असला तरी एक धर्माच्या जोरावर त्यांना वैयक्तिक हक्क खुद्द इंग्रज लोकांप्रमाणें मिळत नाहींत. पण त्यांच्यासाठीं निरनिराळे कायदे घडवून दिलेले आहेत. त्यांच्यांत लग्न हा एक करार म्हणून समजला जातो. तेव्हां त्यांत मुलीची संमति घेत असतीलच हें निराळें सांगणें नको. लग्न झाल्यानंतरहि स्त्रीला नवऱ्यापासून घटस्फोट मागतां येतो. त्याचीं कारणें येणेंप्रमाणें: परधर्माचा स्वीकार पतीनें केला असेल, दुसऱ्या स्त्रीशीं त्यानें लग्न केलें असेल, तो व्यभिचारी असेल, बलात्कार करीत असेल, पशुवृत्तीचा असेल, निर्दय असेल, अगर त्यानें दोन वर्षांपेक्षां जास्त कालपर्यंत पत्नीचा त्याग केला असेल तर, घटस्फोटानंतर तिला परिस्थितीप्रमाणें ठराविक पोटगी एकदम अगर वार्षिक मिळते. मिळकतीसंबंधानें पाहतां ख्रिस्ती स्त्रियांचें मिळकतीवरचें स्वामित्व संपूर्ण स्वरूपाचें असतें. पुरुषाला आपल्या मिळकतीचें मृत्यपत्र करण्याचा अबाधित हक्क असतो. त्यानें मृत्युपत्र केलें नसेल तेव्हां त्याच्या पश्चात् त्याची विधवा आणि संतति यांत विधवेस तिसरा हिस्सा व संततीस बाकीचे दोन हिस्से अशा प्रमाणांत मिळकतीची विभागणी होते. संतति नसेल तेव्हां विधवेला निम्मा हिस्सा मिळतो व मयताच्या इतर नातेवाइकांस बाकीची निम्मी मिळकत जाते. मुलीला वडिलांच्या मिळकतींतून मुलाबरोबर हिस्सा मिळतो. फार काय, पण अगोदर मेलेल्या मुलीच्या मुलांनाहि मुलीचा भाग मिळू शकतो. बहिणीला भावाच्या बरोबरीनें वारसा मिळतो. आपलीं मुलें आणि पत्नी यांचें पालनपोषण करण्याची जबाबदारी प्रत्येक ख्रिस्ती गृहस्थावर आहे.

## इंग्लिश स्त्रियांचे हक्क—

इंग्लिश लोक हे सर्व जगांत नाणावलेले पुराणाभिमानी आहेत. जगांत

नगर वाचनालय, सातारा.



चाललेल्या सुधारणा शेवटीं जर कुठें पाऊल टाकीत असतील तर त्या इंग्लंडांत. इंग्लंडमध्येंहि स्त्रियांचे हक्क अगदीं शून्यत्वापासून पूर्णत्वापर्यंत निरनिराळ्या अवस्थांतून विकास पावले आहेत. १९२५ सालीं लॉर्ड बर्कनहेड यांच्या कारकीर्दींत जे निरनिराळे कायदे घडविण्यांत आले त्यांत स्त्रियांच्या बाबतीपुरती कायद्यांतील विषमता पार नाहींशी करण्यांत आली आहे. वडील मुलाकडे सर्व मिळकत जाण्याचा नियम रद्द केला, त्याचबरोबर कन्या आणि पुत्र यांना बापाच्या सर्व मिळकतींत सारखे हिस्से दिल्याचें जाहीर केलें. विवाहित स्त्रियांचें स्वतःच्या मिळकतीवरचें परावलंबित्व नष्ट झालें व आज त्या मिळकतीवर संपूर्ण स्वामित्व उपभोगीत आहेत. असा आमूलाग्र फेरफार इंग्रजी कायद्यांत घडून आला आहे. इंग्लिश लोक लग्न हा एक करार समजतात व त्यांत मुलीची संमति अवश्य लागते. लग्न झाल्यानंतर तिला नवऱ्याचें धर्मांतर, त्याग, व्यभिचार, निर्दयता, परस्त्रीशीं लग्न, पशुवृत्ति, बलात्कार वगैरे कारणांवरून घटस्फोट अगर फारकत मागतां येते. पूर्वी नुसता व्यभिचार हें कारण घटस्फोटासाठीं योग्य समजत नसत; पण त्याच्याबरोबर पतीची निर्दयता असणें जरूर होतें. नुकत्याच झालेल्या सुधारणेंत असें ग्रहण करण्यांत आलें कीं, पतीचा व्यभिचार हा घटस्फोटास बस्स आहे. कारण व्यभिचार ही निर्दयतेचीच बाबत आहे. वारसाई हक्कासंबंधानें पाहतां स्त्री आणि पुरुष यांचे एकमेकाची मिळकत वारसाई हक्कानें घेण्यासंबंधीं सारखेच नियम आहेत म्हणजे जे नियम विधवेला लागू तेच विधुरालाहि लागूं आहेत.

मयताचीं देणीं दिल्यानंतर जी मिळकत शिल्लक राहील त्यापैकीं त्याच्या विधवेस त्याची सर्व जंगम मिळकत मिळते; शिवाय पांच टक्के व्याजासुद्धां एक हजार पौंड निव्वळ रक्कम मिळते. संतति नसेल तर राहिलेल्या मिळकतीचें उत्पन्न आणि संतति असेल तर निम्या मिळकतीचें उत्पन्न तिला जन्मभर मिळतें. मयताचे आईबाप, भाऊ आणि बहीण, आजोबा आणि चुलते हे हयात नसतील तर सर्व मिळकत तिला संपूर्णपणें मिळते. मुलीला आईचा अगर बापाचा वारसा भावाच्या बरोबरीनें मिळतो. पत्नी आणि मुलें यांचें पोषण करण्याची जबाबदारी प्रत्येक इंग्लिश गृहस्थावर आहे. घटस्फोटाचा दावा केला तर दाव्याचा खर्च, दावा चालू असतांना स्वतःची व

मुलांबाळांची पोटगी; व घटस्फोट मिळाल्यानंतर स्वतःच्या व मुलांबाळांच्या पोटगीबद्दल उचल अगर वार्षिक रक्कम तिला मिळू शकते.

**वारसाचा सर्वसाधारण कायदा—**

सरकारांतून सर्वसाधारण वारसाईचा कायदा बनविण्यांत आला आहे. हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती जातीशिवाय इतर जातींना तो लागतो; आणि तो कायदा म्हणजे इंडियन सक्सेशन ॲक्ट हा होय. या कायद्याचा इतिहास असा आहे: हिंदुस्थानचा राज्यकारभार कंपनीसरकारकडून काढून घेऊन इंग्लंडनें स्वतःकडे ज्या वेळीं अधिकारसूत्रें घेतलीं त्या वेळेला सर्वसाधारण वारसाईचा कायदा घडविण्याच्या उद्देशानें हा कायदा घडविण्यांत आला होता व तो हिंदु, मुसलमान, शीख, जैन या सर्व जातींना एकसारखा लागू करण्याचा विचार होता. गुन्हयांना शिक्षा देणारा फौजदारी कायदा जसा सर्व जातींना सारखाच लागू पडतो तसाच हा कायदा सर्व जातींना लावून वारसाई हक्कांचा निर्णय करावा असा विचार त्या वेळीं सरकारचा होता. पण नुकत्याच झालेल्या बंडामुळें सरकारला तसें करणें धोक्याचें वाटून त्यानें हा कायदा मागें ठेवून दिला. तो पुढें कित्येक वर्षांनीं हिंदू, मुसलमान, ख्रिस्ती यांशिवाय इतर जातींना लागू करण्यांत आला. राणीच्या जाहीरनाम्यांत असें एक आश्वासन देण्यांत आलें कीं, हिंदुस्थानांतील जातींच्या वैयक्तिक हक्कांत आणि त्यांच्या कायद्यांत सरकार बिलकूल हात घालणार नाहीं. अशा प्रकारचें आश्वासन त्या वेळीं देणें जरूर होतें. आणि या आश्वासनांतूनच सामाजिक बाबतींत सुधारणा घडवून आणण्यापुरती सरकारच्या बेफिकीर वृत्तीची सुरुवात झाली आहे. असो. हा इंडियन "सक्सेशन ॲक्ट" वेळोवेळीं बदलत जाऊन त्यांत वारसाई हक्कासंबंधानें ठरविण्यांत आलें तें असें—

मयताच्या पश्चात् त्याची विधवा आणि संतति हयात असेल तर मिळकतीचा तिसरा भाग विधवेला मिळेल व दोन भाग संततीला मिळतील. मयताला संतति नसेल व त्याची मिळकत पांच हजार रुपयांच्या आंतील किंमतीची असेल तर ती सर्व मिळकत त्याच्या विधवेस मिळेल; पण जर मिळकत पांच हजार रुपयांपेक्षां जास्त असेल तर मयताच्या मृत्यूच्या तारखेपासून द. द. शें ४ टक्के व्याजासुद्धां रु.५००० ची रक्कम होईल ती रक्कम

मयताच्या मिळकतींतून त्याच्या विधवेस मिळेल. विधवेची भरणपोषणाची व्यवस्था तिला मिळणाऱ्या पांच हजार रुपयांच्या मिळकतीशिवाय राहिलेल्या मिळकतींतून मिळावयाची. याशिवाय जी मिळकत राहील ती विधवा आणि मयताचे जवळचे नातेवाईक यांनीं आपआपसांत निम्मे निम्मे वांटून घ्यावयाची. जवळचे नातेवाईक कोणी नसतील तर मयताची सर्व मिळकत त्याच्या विधवेस मिळेल. मुलीला मुलाच्या बरोबरीनें पित्याच्या मिळकतींत भाग मिळतो. फार काय पण, अगोदर मरण पावलेल्या मुलीच्या संततीस त्यांच्या आईचा हिस्साहि उतरतो. वैयक्तिक हक्कांबद्दल घटस्फोटाचा कायदा जो सर्व-साधारण म्हणून हिंदुस्थान सरकारनें घडविलेला आहे तो त्यांनाहि लागतो. पतीचें क्रौर्य, षंढत्व, पशुता, अवहेलना, धर्मांतर, पुनर्लग्न आणि व्यभिचार यांपैकीं कोणत्याहि कारणासाठीं त्याच्या बायकोस घटस्फोट मागून घेतां येतो. पारशी लोकांना कांहीं काळपावेतों इंडियन सक्सेशन ॲक्ट लावीत असत.

## रजिस्टर लग्नाच्या स्त्रियांचे हक्क —

धार्मिक विधीनें लग्नसमारंभ न करतां रजिष्टर पद्धतीनें लग्न करण्याची पद्धति कित्येक वेळीं वधूवर अंमलांत आणतात हें पुष्कळांना माहीत असेलच.— हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें गोत्राची अगर जातीची आडकाठी जी ठेविलेली आहे ती टाळण्यासाठीं अलीकडे अशीं नोंदलेलीं लग्नें होऊं लागलीं आहेत. आणि याबद्दलचा कायदा ‘ स्पेशल मॅरेज ॲक्ट ’ या नांवानें ओळखला जातो. आजवर नोंदवून अगर रजिष्टर पद्धतीनें लग्न करावयाचें असलें तर वधूवरांना असें जाहीर करावें लागत असें कीं, आपण हिंदुधर्म पाळीत नाहीं, पण या कायद्यांत दुरुस्ती होऊन आतां स्वतःचा धर्म (हिंदु, मुसलमान, जैन वगैरे) कायम ठेवून या कायद्याचा फायदा वाटेल त्याला घेतां येईल अशी सुधारणा दाखल झाली आहे. तेव्हां आतां या स्पेशल मॅरेज ॲक्टखालीं ज्यांचीं लग्नें नोंदविलीं जातात त्यांचे हक्क काय आहेत तें पाहूं. लग्न कायदेशीर होण्यास चार मुख्य अटी ठेवण्यांत आलेल्या आहेत त्या अशा : वराची पहिली बायको अगर वधूचा नवरा जिवंत असून त्यांचा लग्नसंबंध चालू असतां कामा नये. स्त्रीचें वय १४ व पुरुषाचें वय १८ वर्षांपेक्षां कमी असतां कामा नये. उभयतांपैकीं कोणी लग्नविधीस संमति देण्यास असमर्थ म्हणजे एकवीस वर्षांपेक्षां कमी वयाचें असेल तर

त्याच्या कायदेशीर पालकाची लग्नास संमति असली पाहिजे व उभयतां वधूवरांचें लग्नसंबंध होण्याच्या आड येईल असें जवळचें नातें असू नये. या कायद्याप्रमाणें लग्न नोंदविलें म्हणजे वैयक्तिक व आर्थिक हक्कांत एकदम मोठा फरक पडतो ही गोष्ट अजून पुष्कळांच्या ध्यानांत आलेली नाहीं. नाहीं तर हिंदुधर्मशास्त्रांत सुधारणा करा अशी न्याय्य मागणी बेफिकीर पुराणा-भिमानी हिंदुसमाजापुढें अगदीं कळवळून करण्याऐवजीं सर्व तरुणांनीं यापुढें लग्न रजिष्टरविधीनें करावें अशीच चळवळ सुधारणाप्रिय लोकांनीं केली असती. असो.

या कायद्याखालीं झालेलें लग्न घटस्फोटाच्या कायद्यानें त्यांत दिलेल्या कारणांसाठीं रद्द करून घेतां येतें. उभयतांपैकीं कोणी व्यभिचारी, क्रूर, पशुवृत्ति, कुत्सित रोगी असेल अगर दुसऱ्याचा त्यानें त्याग केला असेल तर दुसऱ्यास घटस्फोट मागतां येतो. या कायद्यान्वयें लग्न झालें म्हणजे नवरा-बायकोच्या हयातींत उभयतांना लग्न रद्द करून घेतल्याखेरीज पुनर्लग्न करितां येत नाहीं व त्यांस पुनर्लग्नाबद्दल फौजदारी कायद्यांत सांगितलेली शिक्षा होते. म्हणजे घटस्फोटाची सवलत व बहुपत्नीकत्वाचें उच्चाटन असें दोन महत्त्वाचे वैयक्तिक हक्क अशा स्त्रियांना मिळतात. आर्थिक हक्कांबद्दल पाहतां असें दिसून येईल कीं, उभयतां पतिपत्नी यांच्या मिळकतीचा वारसा इंडियन सक्सेशन ॲक्टाप्रमाणें उतरतो असें सदर कायद्यांत ठरविलें आहे. वर परिच्छेदांत इंडियन सक्सेशन ॲक्टमधील स्त्रियांच्या हक्काबद्दलची योजना दिली आहे, त्याप्रमाणें स्त्रियांना पतीच्या पश्चात् मिळकत मिळेल. तेव्हां दोन्ही दृष्टींनीं रजिष्टर लग्नपद्धतीपासून फार मोठे फायदे स्त्रियांच्या पदरांत पडतात यांत शंका नाहीं. आज ही लग्नपद्धति केवळ आपद्धर्म अगर अडचणींतून सुटकेचा एक विधि म्हणून लोक अंमलांत आणतात. पण त्यांतील महत्त्वाच्या बाबी पाहिल्या म्हणजे याउपर तरुणींनीं आपलीं लग्नें रजिष्टर पद्धतीनेंच झालीं पाहिजेत असा हट्ट धरला तर तें योग्यच होणार आहे.

हिंदुसमाज निरनिराळ्या प्रांतवार आणि राज्यवार वांटला गेलेला आहे. तेव्हां एकाच हिंदुसमाजाला स्थितिपरत्वें निरनिराळे कायदे लागू पडतात. त्याचें ठळक उदाहरण म्हणून गोव्यांतील हिंदुसमाजाच्या हक्कां-विषयीं थोडेंसें वर्णन देतों. पोर्तुगीज लोकांनीं गोवें प्रांतांत राज्य स्थापिलें.

तथापि हिंदुधर्मशास्त्रांत हात न घालण्याची पराङमुख वृत्ति त्यांनीं आचरली नाहीं, तर हिंदुधर्मशास्त्राचें वैयक्तिक स्वरूप सर्वसाधारण कायद्याच्या अंमलाखालीं आणिलें; तसेंच हिंदुधर्मशास्त्राच्या सिद्धांतांत कित्येक मूलतः फेरफार घडवून आणले. आणि यामुळेंच हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा गोमांतकांत तरी अनुभवास येत नाहीं असें तज्ज्ञांचें म्हणणें आहे. (प्रो. सावर्डेकरकृत, गोमांतक परिचय भाग २, पृष्ठ ७।८) तेव्हां गोवेकर हिंदु-समाजांत स्त्रियांचे हक्क काय आहेत तें आपण पाहूं :

## गोव्यांतील हिंदु स्त्रियांचे हक्क—

विवाह हा पुरुष व स्त्री ह्यांनीं कायदेशीर संतति निर्माण करण्यासाठीं परस्परांशीं केलेला करार होय, अशी व्याख्या येथील कायद्यांत केलेली आहे. सदर विवाह सरकारांत नोंदवावा लागतो आणि त्या नोंदणीच्या वेळीं उभयतां वधूवरांनीं आणि ते अज्ञान असल्यास त्यांच्या पालकांनीं संमति द्यावी लागते. करार ज्या कारणांनीं रद्द ठरवितां येतो त्या कारणामुळें लग्न रद्द होईलच. विवाह नोंदलेला नसेल तर तो कायदेशीर गणला जात नाहीं. वधूवरांचीं कर्तव्यें, परस्परांशीं प्रामाणिकपणें दाम्पत्यधर्मानुसार वागणें, एकत्र राहणें व हरएक कामांत एकमेकांस मदत करणें अशीं ठरविलेलीं आहेत व दाम्पत्य-धर्माची उभारणी स्वतंत्रता व समता या तत्त्वांवर केलेली आहे. पहिली स्त्री जिवंत असतां केलेला विवाह कायदेशीर होणार नाहीं. मात्र पहिल्या पत्नीस पुरुष संतति न होतां तीस वर्षें उलटून गेलेलीं असलीं अगर गेल्या दहा वर्षांत पुरुष संतति झालेली नसली व पहिली बायको योग्य कारणें दाखवून निराळी राहात असेल आणि तिला पुरुष संतति नसेल अगर पहिला विवाह घटस्फोटानें रद्द झाला असेल तर पुरुषास दुसरें लग्न करतां येतें. उभयतां पति-पत्नीस घटस्फोट करून घेण्याची मोकळीक दिलेली आहे आणि घटस्फोटाचीं कारणेंहि कायद्यानें ठरवून दिलेलीं आहेत. आर्थिक हक्कांबद्दल पाहतां असें म्हणावें लागेल कीं, विवाहानंतर पतिपत्नी यांची मिळकत ज्याच्या त्याच्या मालकीची राहिली तरी पतीला सदर मिळकत पत्नीच्या लेखी संमतीशिवाय दुसऱ्यास कोणत्याहि प्रकारें लिहून देतां येत नाहीं. मिळकतीसंबंधीं होणाऱ्या प्रत्येक दस्तऐवजावरहि पत्नीची सही कायद्यानें आवश्यक ठरविलेली आहे.

बापाच्या मिळकतींत कन्येला पुत्राच्या बरोबरीनेंच हक्क मिळतो. अशा प्रकारें तेथील कायद्यानें गोमांतकांतील हिंदु स्त्रियांचे हक्क ठरविलेले आहेत.

## बडोदें संस्थान : स्त्रियांचे हक्क—

ज्या ज्या प्रांतांत सरकार सामाजिक सुधारणेबद्दलची उदासीन वृत्ति असूं देत नाहीं त्या त्या प्रांतांत विशेषत: संस्थानच्या ताब्यांत असलेल्या प्रांतांत कायद्याची घडामोड झपाट्यानें होत आहे. बडोदें संस्थानांत घटस्फोटाचा कायदा सन १९३१ मध्यें अंमलांत आला आणि ज्या जातींत घटस्फोट घेण्याची रूढि नाहीं अशा जातींनाहि तो लागू करण्यांत आला आहे. उभयतां पतिपत्नी आणि ते अज्ञान असतां त्यांचे पालक घटस्फोट मागूं शकतात. त्याचीं कारणें : उभयतांपैकीं कोणी सात वर्षांउपरांत बेपत्ता झालें असेल, साधु अगर संन्यासी झालें असेल, परधर्मीय झालें असेल, निर्दय असेल, योग्य कारणाशिवाय तीन वर्षांपेक्षां जास्त कालापर्यंत त्यानें दुसऱ्याचा त्याग केला असेल, उन्मत्त असेल अगर व्यभिचारी असेल तर, पति नपुंसक असेल अगर सृष्टीविरुद्ध गुन्हा करणारा असेल तर पतीला आणि लग्नाच्या वेळीं पत्नी दुसऱ्यापासून सगर्भा असेल तर पतीला घटस्फोट मागतां येतो. कित्येक लग्नें बेकायदेशीरच ठरविलीं आहेत व अशा वेळीं घटस्फोट घेण्याच्या ऐवजीं लग्न निरर्थक ठरवून घेतां येतें. उभयतांपैकीं कोणी लग्नाच्या वेळीं कुत्सित रोगानें पीडित असेल, बहिरें, मुकें, अंध, भ्रांतचित्त, अप्रबुद्ध अगर पतित असेल तर, अगर कायद्यास असंमत असा सगोत्र अगर भिन्नवर्ण विवाह झालेला असेल अगर लग्नांत कपट, जबरदस्ती झाली असेल तर लग्न निरर्थक ठरूं शकतें. हें झालें वैयक्तिक हक्कांबद्दल. आर्थिक हक्कांबद्दल खालीलप्रमाणें योजना केलेल्या आहेत. कन्येला वडिलार्जित मिळकतींत मुलाच्या चौथा हिस्सा मिळावा आणि यांतूनच तिचा लग्नखर्च भागवावा. विधवा पत्नीला पुरुष सहभागीदाराप्रमाणें पतीच्या कुटुंबाच्या मिळकतींत पुत्रसमान हक्क मिळतात व पतीच्या पश्चात् विधवेला आपल्या एका मुलाइतका हक्क मिळकतींत मिळतो व तिला आपला हिस्सा निराळा करून घेतां यावा. विधवेची मिळकतीवरची मालकी बारा हजार रुपये किंमतीपर्यंत संपूर्ण असून कायद्यानें

नगर वाचनालय, सातारा.



ठरविलेले विशिष्ट वारस हे उत्तराधिकारी म्हणून मान्य केले आहेत आणि बाकीचे उत्तराधिकारी असतील तरी विधवेला संपूर्ण मालकी असते.

## म्हैसूर संस्थान—

म्हैसूर संस्थानानेंहि अशीच एक सरकारी समिति नेमिली होती; तिचें निवेदन म्हैसूर संस्थानच्या कायदेमंडळांत मान्य झालें असून त्यांत खालीलप्रमाणें योजना केलेल्या आहेत. विधवा आई, अविवाहित मुलगी आणि बहीण यांस वारसदार ठरविलें असून विधवेस व आईस प्रत्येकीं एक-द्वितीयांश भाग व अविवाहित बहिणीस व मुलास चौथा भाग मिळावा. लग्न झाल्यानंतर पत्नीच्या भरणपोषणाचा बोजा नवऱ्याच्या मिळकतीवर पडावा व त्याच्या पश्चात् स्वतःचा हिस्सा तोडून घेण्याचा अधिकार विधवेस असावा.

## इतर राष्ट्रांतील स्त्रियांचे हक्क—

जगांतील निरनिराळ्या राष्ट्रांत स्त्रियांना आजमितीस काय हक्क आहेत, हें आपण पाहूं. अमेरिका ही सुधारणेच्या सर्व बाबतींत उड्या टाकीत चालली आहे व व्यक्तिमात्र म्हणून दरेक अमेरिकन इसमाचें हक्कसंरक्षण करावयाचें आणि न्यायाचा तराजू लिंगभेदाच्या कल्पनेनें बिलकूल डळमळूं द्यावयाचा नाहीं अशा तऱ्हेची कायद्याच्या परमोत्कर्षाची स्थिति अमेरिका उपभोगीत आहे असा आज त्यांचा जगाला जाहीर आदेश आहे. मिळकतीच्या बाबतींत अगर घटस्फोटाच्या बाबतींत स्त्री आणि पुरुष यांना तेथें समसमान हक्क आहेत. त्याच्या खालोखाल युरोपांत स्त्रियांना वैयक्तिक व आर्थिक स्वातंत्र्य देण्यांत आलें आहे. फरान्स, जर्मनी, इटली वगैरे देशांत स्त्रियांचें आर्थिक स्वातंत्र्य कायद्यानें पुरुषांच्या जवळ जवळ बरोबरीनें आणून ठेविलें आहे आणि वैयक्तिक बाबतींत तर दोघांचे हक्क समसमान आहेत.

मुसलमानी धर्मामुळें आजवर मागें राहिलेला तुर्कस्थान घ्या. त्यांतहि स्त्रियांच्या आर्थिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मुहूर्तमेढी इतर सुधारणांच्या अगोदरच रोवण्यांत आल्या आहेत. रशियाकडे पाहिलें तर आर्थिक स्वातंत्र्याची बाबत त्यांनीं पुरुषांच्या हातूनहि हिरावून घेतली आहे व आजच्या मितीस स्त्री अगर पुरुष या दोघांनाहि सारखीच आर्थिक पराधीनता प्राप्त

झाली आहे. सोव्हिएट रशियानें लग्नसंस्थेची मांडणी जेवढी साधी केली तेवढा साधेपणा अजून कोणत्याहि राष्ट्राच्या कायद्यांत आलेला नाहीं. आणि तितकाच साधेपणा घटस्फोटाच्या साधनांचा पाहिला म्हणजे राष्ट्र हें व्यक्ती-साठीं आहे, हें नव्या रशियाचें ब्रीदवाक्य समाजरचनेच्या दरेक बाबतींत बिन-चूक लागू केलेलें दिसून येतें. आशिया खंडांत दृष्टि टाकली तर झोंपेंतून प्रथम जागा होणारा जर कोणी असेल तर तो जपान होय. जपानांतील स्त्रियांना अगदीं हिंदु स्त्रियांप्रमाणें पराधीनता भोगावी लागत असे. पण ती गुलामगिरी जागृतीच्या कोंवळ्या राजवटींत नाहींशी झाली व आज जपाननें बऱ्याच अंशीं युरोपियन राष्ट्रांचें स्त्रियांच्या वैयक्तिक आणि आर्थिक हक्कांच्या बाबतींत अनुकरण चालविलें आहे. पूर्वी एका काळीं गुलामाच्या पंक्तीस बसलेली गृहिणी आज जपानच्या उत्कर्षाची जागती ज्योत झाली, इतकेंच नव्हे तर आपल्या कार्यक्षमतेनें चमकणाऱ्या या विद्युल्लतेनें राजकारणी पुरुषांनाहि दिपवून सोडिलें आहे. आळशी हिंदुस्थानाच्या उशाशीं डोकें ठेवून अफूच्या निशेंत घोरत पडलेला चीन देश हाहि जागा झाला असून जागृतीचें पहिलें लक्षण म्हणूनच कीं काय त्यानें स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतींत विलक्षण सुधारणा घडवून आणली आहे. स्त्रियांना मालमिळकत म्हणून समजून वागविण्याचे दिवस संपले असून वैयक्तिक आणि आर्थिक स्वातंत्र्याचे हक्क पुरुषांच्या बरोबरीनें त्यांना देण्यांत आलेले आहेत.

एकंदरींत जगांतील समाजक्रांतीकडे पाहिलें आणि स्त्रियांच्या हक्कांच्या बाबतींत झालेल्या सुधारणांचा आढावा काढला तर असें म्हणावें लागेल कीं, हिंदुस्थानाशिवाय इतरत्र विलक्षण क्रांति घडून आलेली आहे. त्यांतहि हिंदु स्त्रियांच्या वैयक्तिक पराधीनतेस आणि आर्थिक दैन्यास जगांतच काय, पण हिंदुस्थानांतील इतर धर्मांत तोड सांपडणार नाहीं. सर्व जगाबरोबर हिंदुसमाजहि क्रांतीच्या भोंवऱ्यांत सांपडला आहे. समाजरचनेच्या जुन्या तत्त्वांच्या पाचोळ्यास त्यानें उराशीं कवटाळून धरिलें तर तो दशदिशांस उधळला जाईल. परिस्थिति बदलली, आचार बदलले, तेव्हां चालू काळांत उचित असे फेरफार समाजरचनेच्या तत्त्वांत घडवून आणिले तरच आपला हिंदु समाज जिवंत राहील, ही साधी गोष्ट राजकीय अगर सामाजिक सुधारणांप्रमाणें स्त्रियांच्या कायदेशीर हक्कसुधारणेच्या बाबतींत लागू पडणार नाहीं काय ?

सातारा नगर ... वाचनालय, सातारा
पाने ११५
दा नं. ८५२८३
२११:३१:१९०५
३६, भवानी पेठ

## प्रकरण ३ रें

# कन्येचे वैयक्तिक हक्क

**कन्या; सुवासिनी—**

हिंदु स्त्रियांच्या वैयक्तिक हक्कांबद्दल आपण विचार करूं. आर्थिक हक्क आणि वैयक्तिक हक्क असे जरी विषयाचे दोन भाग पाडले तरी यांपैकीं दरेक भागाची चर्चा करतांना आणखी पोटभाग पाडणें जरूर आहे. स्त्रीला लग्नापूर्वीची आणि लग्नानंतरची अशा दोन अवस्था प्राप्त होतात आणि त्यांना अनुक्रमें कन्या व सुवासिनी अशीं नांवें दिलेलीं आहेत. या दोन अवस्था लक्षांत ठेवणें जरूर आहे. कारण लग्न होईपर्यंतचे हक्क निराळे आणि लग्न झाल्यानंतरचे हक्क निराळे. ज्या कुळांत ती जन्मली त्या कुळांतून तिला लग्नाच्या निमित्तानें दुसऱ्या घरीं जावें लागतें. म्हणून या दोन निरनिराळ्या अवस्था तिला प्राप्त होतात. पुरुषाचें तसें नसतें. पुरुष ज्या कुटुंबांत जन्मतो, त्याच कुटुंबांत तो मरेपर्यंत राहतो; म्हणून त्याच्या हक्कांना अशा तऱ्हेच्या दोन अवस्था प्राप्त होत नाहींत. तेव्हां हा भेद वाचकांनीं ध्यानांत ठेवावा.

**कन्येचे हक्क—**

आतां आपण कन्येचे वैयक्तिक हक्क काय आहेत तें पाहूं. मुलाप्रमाणेंच मुलीलाहि वैयक्तिक स्वातंत्र्य द्यावें कीं नाहीं हा ज्याच्या त्याच्या विवेकाचा प्रश्न आहे. कायद्यानें दोघांनाहि व्यक्तिस्वातंत्र्य सारख्याच प्रकारचें दिलेलें आहे. कन्येच्या हक्कांपैकीं महत्त्वाचा हक्क कुटुंबांतून शिक्षण संपादन करण्याचा. त्याचें विवेचन आर्थिक स्वातंत्र्याची चर्चा करतांना होईल. तूर्त कन्येच्या एका महत्त्वाच्या हक्काबद्दल आपण विचार करूं. आणि तो म्हणजे तिच्या लग्नाबद्दलचा होय. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें लग्न हा एक मोठा आणि महत्त्वाचा संस्कार आहे. आपल्या लोकांत या संस्काराचें जितकें महत्त्व मानण्यांत आलेलें आहे, तेवढें महत्त्व दुसऱ्या कोणत्याहि धर्मांत अगर कायद्यांत मानलेलें दिसून येत नाहीं, असें स्ट्रेंज साहेबांचेंहि मत आहे. पुरुषांच्या दहा

संस्कारांतील हा जरी एक महत्त्वाचा संस्कार असला तरी स्त्रियांना लग्नविधि हाच काय तो एकटा वैदिक संस्कार असें स्मृतींत सांगितलें आहे. वैदिक* संस्कार या दृष्टीनें त्याचें काय महत्त्व असेल तें असो; पण स्त्रियांच्या उत्कर्षाचा कारक व मारक म्हणून या लग्नविधीचें महत्त्व फार आहे. लग्ननिमित्तानें ज्या कांहीं बऱ्यावाईट परिस्थितींत स्त्रियांना जाऊन पडावें लागतें त्याच परिस्थितींत त्यांना कायमचें राहावें लागतें. परिस्थिति प्रतिकूल असली, अयोग्य वराशीं लग्नसंबंध झाला असला तर अत्यंत कर्तबगार स्त्रीची हुशारी धुळीस मिळते; इतकेंच नव्हे तर तिला त्या रौरवांत आमरण पिचत पडून राहावें लागतें. याच्या उलट परिस्थिति अनुकूल असेल आणि कर्तबगारीस वाव मिळेल, एवढें स्वातंत्र्य तिला तिच्या पतीकडून मिळत असेल तर धुळीस मिळालेलें कुटुंबहि ऊर्जितावस्थेस आणण्याचें भाग्य तिला लाभतें. म्हणजे एकंदर आयुष्याची इतिकर्तव्यता स्त्रियांच्या बाबतींत तरी त्यांच्या लग्नसंबंधावर अवलंबून असते. याशिवाय आपल्या लग्नसंस्कारांतील जी एक अभंगत्वाची दृढमूल कल्पना आहे त्यामुळें तर स्त्रियांच्या दृष्टीनें लग्नसंस्कार हा एवढा गंभीर विषय झालेला आहे कीं त्याची महति वर्णन करावी तेवढी थोडीच! एकवार लग्न झालें म्हणजे कशीहि स्थिति असो अगर कशाहि नवऱ्याशीं गांठ पडो, हिंदु स्त्रीला त्यांतून सुटका करून घेण्याचा मार्ग कायद्यानें मोकळा ठेविलेला नाहीं. कोणाच्याहि चुकीनें अयोग्य वर मिळाला तरी त्याचे परिणाम जन्मभर त्या बिचारीला भोगावे लागतात. लग्न हा अभेद्य संस्कार आहे याचा अर्थ असा कीं, एकवार लग्न झाल्यानंतर कोणत्याहि कारणासाठीं तें रद्द करतां येत नाहीं. लग्नगांठ ही वज्रलेप होय हें तत्त्व पुरुषांना मुळींच जाचक होत नाहीं. पत्नीच्या हयातींत एकापेक्षां अनेक लग्नें करण्याचा पुरुषाला हक्क असतो. तेव्हां अयोग्य वधूशीं त्याची गांठ पडली तर तो तिला टाकून देऊन दुसरीशीं लग्न करूं शकतो. त्याच्या पत्नीला मात्र नवऱ्याच्या हयातींत दुसरें लग्न करतां यावयाचें नाहीं. तेव्हां लग्नसंस्काराचें महत्त्व स्त्रियांच्या दृष्टीनें किती आहे हें निराळें सांगण्याचें कारण नाहीं. आतां या महत्त्वाच्या बाबतींत तिला कोणकोणते हक्क आहेत तें पाहूं.

---

* वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः। —मनु २–६७.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

विवाहाचे प्रकार—

स्मृतींत "ब्राह्म, दैव, आर्ष, गांधर्व, पैशाच, राक्षस, आसुर व प्राजापत्य" याप्रमाणें विवाहांचे आठ प्रकार सांगितलेले आहेत; तरी कलियुगांत त्यांपैकीं ब्राह्मविवाह हाच काय तो कायम राहिला आहे. व कायद्यानें असें अनुमान करावें लागतें कीं दरेक विवाह ब्राह्मपद्धतीनेंच झालेला आहे.* गांधर्वविवाह-पद्धति आतां अंमलांत राहिलेली नसून‡ गांधर्वविवाह म्हणजे रक्षासंबंधापेक्षां वरच्या दर्जाचा नाहीं.† चालू काळांत 'प्रीतिविवाह' अगर गांधर्वविवाह ही गोंडस शब्दयोजना बरेच लोक वापरतांना ऐकूं येतात; पण त्याचा कायद्याच्या दृष्टीनें विचार केला तर हे शब्दप्रयोग व्यवहारांत कविकल्पनेप्रमाणें फोल ठरतात. उभयतां वधुवरांनीं एकमेकांवर प्रेम करावें आणि एकत्र राहावें असा गांधर्वविधीचा उद्देश व अशा तऱ्हेनें राहिलेल्या जोडप्यास विवाहित स्त्रीपुरुषांची प्रतिष्ठा मिळत असे. पण आज जर असें प्रणयी जोडपें एकत्र संसार करूं लागलें तर कायद्याच्या दृष्टीनें त्यास काडीचीहि प्रतिष्ठा प्राप्त व्हावयाची नाहीं. त्यांची संततीहि अनौरस गणली जाईल आणि पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याची मिळकत त्याचे भाऊबंद घेऊन जातील. तेव्हां प्रीतिविवाह याचा अर्थ इतकाच कीं, दोघांनीं एकमेकाचें प्रेम संपादावें आणि त्यावर लग्नविधीचा शिक्कामोर्तब घेऊन सामाजिक प्रतिष्ठा मिळवावी. खुद्द लग्नविधींत मुलीच्या संमतीचीच अपेक्षा ठेवली नाहीं तर त्यांत प्रीतिविवाहास अवसर तो कोठें असणार?

ब्राह्मविधि—

ब्राह्मविधीचें वर्णन मनूनें असें केलें आहे कीं विद्या व सदाचार यांनीं युक्त अशा वराला बोलावून त्याला वस्त्रें, अलंकार द्यावयाचे व त्याची पूजा करून त्याला कन्येचें दान करावयाचें.

आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम्।
आहूय दानं कन्याया ब्राह्मो धर्मः प्रकीर्तितः॥ —मनु. ३२७.

---

* गोजाबाई वि. श्री. शहाजीराव. १७ मुंबई ११४.
‡ विश्वनाथ स्वामी वि. का. मु. अमाल. २४ मद्रास. लॉ. ज. २७१.
† भवानी वि. नारायणसिंग. ३ अलाहाबाद ७३८.

यांत दर्शविल्याप्रमाणें पित्यानें कन्येचें दान करावयाचें ही मुख्य कल्पना लग्नविधींत आहे. तेव्हां अर्थात् कन्येचा विचार घेण्याचें कारणच राहात नाहीं. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें मुलीचें लग्न करणें अगर तिला अमुक एक स्थळीं देणें हें तिच्या पालकांच्या मर्जीवर अवलंबून आहे व लग्नास मुलीची कबुली आहे कीं नाहीं याची खिसगणती करण्याचें कारण नाहीं असें विधान कायद्याचा अर्थ करतांना न्यायासनावरून करण्यांत येत असतें.* मुलींची संमति पूर्वीच्या काळीं घेत असत. फार काय पण स्वतःच्या पतीची निवड करण्याची मोकळीक तिला वेदकाळीं देण्यांत आली होती. ऋग्वेदांत म्हटलें आहे :

भद्रा वधू भवति यत् सुपेशाः स्वयं स्वामित्रं वनुते जनेचित् ।

चांगली आणि रूपवती कन्या पुरुषांतून स्वतःच पतीची निवड करते. या वाक्यावरून तसें मानण्यास हरकत नाहीं. पूर्वीच्या काळीं वधूवर उभयतां प्रौढ असत; त्यामुळें वडिलांनीं कन्यादान केलें तरी उभयतांच्या प्रौढ वयांतच खरोखर विवाह होत असे, असें न्यायमूर्ति सदाशिव अय्यर यांचेंहि मत आहे.$ महाभारतकालीं प्रौढ विवाहच रूढ होते याबद्दल भारताचार्य कै. चिंतामणराव वैद्य यांचेंहि मत स्पष्ट आहे. ते लिहितात‡ "अशा अनेक स्त्रियांच्या वर्णनावरून असें स्पष्ट दिसतें कीं, पूर्वकाळीं लग्नांत स्त्रिया पूर्ण वयांत आलेल्या असत. विवाहकाळीं वधू प्रौढ असून विवाहाच्या रात्रींच पतिपत्नीसमागम झाल्याचें वर्णन आहे." निबंधकारांनीं घेतलेला महाभारताचा पाठ "त्रिंशद्वर्षो वहेत् कन्यां हृद्यां षोडशवार्षिकीम्" (तीस वर्षें वयाच्या पुरुषानें हृदयास आनंद देणारी सोळा वर्षांची कन्या वरावी) असा आहे. याशिवाय महाभारतांतील दुसरें एक वचन येथें विचारांत घेण्यासारखें आहे 'वयस्थां च महाप्राज्ञ कन्यामावोढुमर्हहि' (वयांत आलेल्या मुलीशीं अर्थात् तरुण कन्येशीं विवाह करणें आयुष्यकर आहे) यांत 'वयः' या शब्दाचा अर्थ पणांत आलेली असा घेणेंच योग्य आहे. जसें "वयस्थस्तरुणोयुवा." पूर्वकाळीं अगदीं महाभारतकालापर्यंत लहानपणीं विवाह मुळींच होत नव्हते. पुरुषांचे बहुधा एकवीसपासून तीस-वर्षेपर्यंत व स्त्रियांचे पंधरा सोळा वर्षांचे सुमारास विवाह होत असत. महा-

---

* पुरुषोत्तमदास वि. पुरुषोत्तमदास. २१ मुंबई २३ (श्रा.म.१०–२७).

$ सतिरज्जु वि. व्यंकटस्वामी. ४० मद्रास ९२९.

‡ श्री महाभारत उपसंहार—पृ. २०९.

भारतकाळीं जी स्वयंवराची पद्धत होती त्यांतहि वधूनें वराची निवड करावयाचा हक्क कबूल करण्यांत आलेला होता. प्रौढ विवाहाची चाल मागें पडली व अर्भकांचीं लग्नें आईबाप लावूं लागले. तेव्हां अर्थात् मुलीची संमतीच काय पण मुलाचीहि संमति घेण्याचें कारण उरलें नव्हतें. मुलीच्या संमतीची जरूरी राहिली नव्हती तरी वरपसंतीची जी भारी जबाबदारी धर्मशास्त्रकारांनीं तिच्या पित्यावर टाकली होती आणि त्यासाठीं जे निरनिराळे नियम घालून दिले होते त्यावरूनच योग्य वर मुलीला मिळावा याबद्दलची जरूर ती खबरदारी घेण्यांत आली होती असें म्हणावें लागतें. उत्कृष्ट, सुस्वरूप व योग्य अशा वरास कन्या द्यावी. ऋतुमती कन्या आमरण पितृगृहीं राहिली तरी हरकत नाहीं, पण गुणहीन वराला तिला कदापि देऊं नका असा कडक निर्बंध शास्त्रकारांनीं घालून दिलेला होता.

उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशाय च।
अप्राप्तामपि तां तस्मै कन्यां दद्याद्यथाविधिः ॥ —मनु ९-८८.
काममामरणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि।
न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनायकर्हिचित् ॥ —मनु ९-८९.

तसेंच कांहीं कांहीं शारीरिक व्यंगें पुरुषास असलीं तर त्याला लग्न करतां यावयाचें नाहीं असें स्पष्ट ठरविण्यांत आलें होतें. विष्णुस्मृतींत सांगितलें आहे कीं, कुबडे, खुजे, जन्मांध, नपुंसक, लुले, भयंकर रोगानें पछाडलेले अशा पुरुषांनीं आमरण व्रतस्थ राहावें आणि त्यांनीं लग्नें करूं नयेत.

कुब्जवामनजात्यंधः क्लीबपीडार्त रोगिणाम्।
व्रतचर्या भवेत्तेशां यावज्जीवमसंशयम् ॥ —विष्णु.

वर जे गुणहीन पुरुष वर्ज्य करावेत असें सांगितलें आहे त्याचें स्पष्टीकरण करतांना नारद म्हणतो, "वेडा, ज्ञातिभ्रष्ट, नपुंसक, कपाळकरंटा, बांधवांनीं टाकलेला, जुनाट रोगी व शरीरांत व्यंग असलेला असा वर निवडूं नये."

उन्मत्तः पतितः क्लीबो दर्भगस्त्यक्तबांधवाः।
कन्यादोषौचयौ पूर्वो एष दोष गणो वरे ॥ —नारद.

आणि याच अर्थाचें कात्यायनाचेंहि वचन आहे:

उन्मत्तः पतितः कुष्ठी षंढश्च वा सगोत्रजः।
चक्षुः श्रोत्रविहीनश्च तथापस्मारदूषितः ॥—कात्यायन.

अशा कोणत्याहि तऱ्हेचा निर्बंध वरपसंतीच्या बाबतींत आज अस्तित्वांत नाहीं. निदान अशा निर्बंधाचें उल्लंघन झालें अगर वर दर्शविल्यापैकीं एकाद्या व्यंगानें युक्त अशा अयोग्य वराशीं कन्येचें लग्न झालें तर तें रद्द होऊं शकतें असें कायद्याचें रक्षण नाहीं; उलट हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें एकवार लग्न झालें म्हणजे तें वज्रलेप असें मानण्यांत येतें. याची चर्चा पुढें योग्य स्थळीं करण्यांत येईलच.

## लग्नास मुलीची संमति—

लग्नासारख्या महत्त्वाच्या बाबतींत उभयतां वधूवरांची संमति असणें अत्यंत जरूर आहे. लग्न म्हणजे पोरखेळ नव्हे, कीं ज्यांत उभयतांना त्यांच्या इच्छेविरुद्ध एकत्र डांबून ठेवणें श्रेयस्कर होईल. लग्न हा एकादा करार अगर ठराव अशा हलक्या कोटींतला नसून संस्कार या पवित्र कोटींतला आहे, असें हिंदुधर्मशास्त्र बजावून सांगतें. पण वर वर्णन केलेली वस्तुस्थिति पाहतां संस्कार या भव्य नांवाखालीं धर्मशास्त्र आमच्या विवाहसंस्थेची विटंबनाच करीत आहे, व ऐहिक सुखासाठीं धडपडणाऱ्या स्त्रीपुरुषांची वंचना करीत आहे असेंच म्हणावें लागेल. दोन अनोळखी उतारू आगगाडीच्या डब्यांत त्यांच्या मर्जीविरुद्ध कोंबून बसविले तरी त्यांना थोडाच वेळ तशा अडचणींत काढावयाचा असतो. पण लग्नाच्या नांवाखालीं स्त्रीपुरुषांना एकत्र आणून आमरण त्यांना संसारयात्रा करण्यास लावणाऱ्या विधींत उभयतांची संमति घेण्याचें आवश्यक लक्षण नसेल तर त्यांचा जीवनक्रम कितीसा सुखकर होईल? विशेषतः आमचा लग्नसंस्कार हा एकाद्या माणसानें केलेल्या कराराप्रमाणें मोडतां येणारा नाहीं, तो एक अभेद्य संस्कार आहे असें बजावून सांगण्यांत येतें. तेव्हां करारापेक्षांहि त्याच्यांत जास्त टिकाऊपणा येण्यास वधुवरांची त्या विधीस संमति असावी; याशिवाय तो संबंध सुखकर होणार नाहीं. पूर्वीं-पेक्षां अलीकडील काळांत या संमतीची जरूरी जास्त भासूं लागली आहे. उभयतां वधूवरें प्रौढ असतात, त्यांच्या आकांक्षा आणि आवडीनिवडी बनलेल्या असतात, आणि लग्नसंस्थेकडेहि ते एका विशिष्ट आशेनें पाहूं लागले आहेत. पूर्वींच्या काळीं नवीन जरीची टोपी अगर परकर शिवण्यानें होणारा आनंद हा बालवरवधूंना लग्नापेक्षां वरच्या दर्जाचा वाटत असे व उभयतां

परकरटोपीची जेवढी अधिक काळजी घेत असत तेवढी पति पत्नीची अगर पत्नी पतीची घेत नसत. लग्नसमारंभ हा आजच्या मौंजीबंधनाच्या समारंभाप्रमाणें केवळ हौसेचा प्रकार म्हणून वडीलधारी मंडळी त्यांत सामील होत, तर बालवधूवरें यांना तो समारंभ मौजेपेक्षां थोडाच उदात्त वाटत असेल? आजची समाजस्थिति पार बदलून गेली आहे. लहान पोरांचा सांभाळ करणारी कुटुंबसंस्था ढांसळून पडली आहे. त्यामुळें पतिपत्नी म्हणून एकत्र येणाऱ्या व्यक्तींचा सलोखा घडवून आणणारी परिस्थिति नाहींशी झाली आहे. अशा स्थितींत उभयतांच्या पसंतीनें केलेलीं लग्नेंहि खडतर ठरण्याचा प्रसंग; तर संमतीशिवाय घडवून आणलेले लग्नसंबंध दिवसेंदिवस कसे टिकणार? यावर कोणी असें म्हणेल कीं, संमतीशिवाय घडवून आणलेल्या लग्नाविरुद्ध स्त्रियांनीं कोठें तक्रारी केल्या आहेत? त्याचें उत्तर अगदीं सोपें आहे. बोलून दाखविलें तरच दुःख झालें असें थोडेंच आहे ? तसें असेल तर सोशीक माणूस हा नेहमींच सुखी ठरेल. स्त्रियांनीं आजवर सोशीकपणा दाखविला, पतिव्रताधर्माचे मूग गिळून त्यांनीं आपलीं वैवाहिक दुःखें तोंडावाटे बाहेर पडूं दिलीं नाहींत यावरून त्यांना दुःखें नाहींतच असें म्हणणें मुळींच योग्य नाहीं. जुन्या वळणाची आणि जुन्या पिढींतील स्त्री पतिव्रताधर्माच्या दडपणाखालीं दडपून गेलेली असल्यानें खडतर वैवाहिक आयुष्याबद्दल ती दैवास हात लावून स्वस्थ बसेल. आजची तरुण पिढींतील जागृति स्त्रियांना आपलीं गाऱ्हाणीं स्पष्टपणें जाहीर करण्यास स्फूर्ति देत आहे. पातिव्रत्य धर्माच्या कल्पनास केव्हांच मूठमाती मिळालेली आहे. अशा स्थितींत नशिबाला हात लावून त्यांनीं स्वस्थ बसावें असें कसें होईल ? मुलींनाहि मुलांच्याप्रमाणें कांहीं आकांक्षा असतात, कांहीं भावना असतात. तेव्हां वरपसंतीच्या वेळीं त्यांचा विचार घेणें हें रास्त होणार आहे.

पूर्वींच्या काळीं वरपरीक्षा फार कसोशीनें होत असावी. वरामध्यें कोणकोणते गुण असले पाहिजेत याची यादी वर नमूद केली आहे. त्यावरून दिसून येईल कीं, बालविवाहाच्या अमदानींत कन्येच्या सुखाबद्दल योग्य ती खबरदारी शास्त्रकारांनीं घेतलेली होती. पण आज तसा कोणताच निर्बंध कायद्यानें घातलेला नाहीं. पसंत केलेल्या वरांत एकच दोष काय, पण सर्व दोष एकाच वेळीं असले आणि अशाशीं तिचें लग्न लागलें तरी तें सर्वथैव कायदे-

शीर समजलें जातें. फार काय पण असें लग्न रद्द करून घेण्याचा मार्गहि शास्त्रानें ठेविलेला नाहीं. खुद्द पिता मुलीच्या सुखासाठीं जागरूक असणारा पाहिजे. तथापि द्रव्याच्या लोभानें अयोग्य वराला मुलगी देणारे पाषाणहृदयी बाप जर सांपडतात तर मग वडील हयात नसतील तेव्हां मुलीचे चुलते, मामा, भाऊ (सख्खे, चुलत, सावत्र) आणि इतर नातेवाईक मंडळी यांच्यावर जेव्हां लग्नाची जबाबदारी येऊन पडते त्या वेळेस तिच्या भावी सौख्याची योग्य खबरदारी घेतली जाईलच अशी काय खात्री ? तिची जन्मदात्री माता, पण तिला मुलीच्या लग्नसंबंधांत मत देण्याचा हक्क अत्यंत किमान असून तिचा दर्जा शेवटला आहे. दुसरें असें कीं, पालकांना प्रामाणिकपणें चांगलें वाटणारें स्थळ मुलीला पसंत पडेल असें थोडेंच आहे ? आणि तिला पसंत नसतांहि पालकांनीं आपल्या मर्जीप्रमाणें लग्न उरकून टाकावयाचें तर त्यांत मुलीला सुख लाभेल याची खात्री काय ? बदलत्या काळानें आणि बदललेल्या परिस्थितीनें वैवाहिक सुखांत नवीन अपेक्षांची व म्हणून नवीन निराशांची भर टाकलेली आहे. विवाहसंबंधांतील केवळ धार्मिक भावना नाहींशी होत चालली, प्रजोत्पादन हा त्यांतला हेतु नाहींसा होऊं लागला, त्याबरोबर वैयक्तिक सुखाची आणि वैयक्तिक स्वातंत्र्याची कल्पनाहि फोंफावूं लागली आहे. केवळ शिक्षणाच्या कसोटीनें वधूवरांतील गुणावगुण ठरवितां येण्यासारखे नसतात, आणि सांस्कृतिक योग्यतेची अपेक्षा परस्परांच्या मनांत उत्पन्न झालेली आहे. अशा स्थितींत पति अपेक्षेप्रमाणें नसेल तर वरकरणीं त्या स्त्रीचें वैवाहिक जीवन इतरेजनांना सुखी दिसलें तरी तिच्या कष्टी जीवनाची कल्पना तिलाच एकटीला असणार ! अशीं विजोड जोडपीं जोडण्यासाठीं आमचा लग्नसंस्कार अस्तित्वांत आलेला नाहीं. धर्म, अर्थ, काम, फार काय पण मोक्ष दंपतींच्या आटोक्यांत आणून देणाऱ्या लग्नसंस्थेचें उदात्त स्वरूप कायम टिकवावयाचें असेल तर उभयतां वधूवरांना परस्परांना पसंत करण्याचा हक्क असला पाहिजे. आज मुलांनीं असा हक्क आपल्या आईबापांकडून हिसकावून घेतला आहे. मुलींनाच तो कां असूं नये ? नवऱ्याला पत्नी पसंत नसली तर तो दुसरें लग्न करतो. तशी मोकळीक पत्नीला नाहीं. म्हणून वरपसंतीच्या वेळीं मुलीची संमति जरूर घेतली पाहिजे. इतर सर्व धर्मांत कन्येला वरपसंतीच्या बाबतींत संमति देण्याचा अधिकार आहे. शिक्षणानें

आणि संस्कृतीनें मागासलेल्या मुसलमान लोकांत सज्ञान स्थितींत वधूवरास आपापल्या लग्नास संमति देतां येते. पण अज्ञान मुलांमुलींचीं लग्नें त्यांच्या खुद्द बापानें अगर आजानें केलेलीं नसतील तर वयांत येतांच पतिपत्नीसमागम होण्यापूर्वीं तें लग्न उभयतां वधूवरांस मोडून टाकतां येतें. आपणाकडे 'सारडा अॅक्ट' पास झाला तेव्हां अर्भकांचीं लग्नें लावण्याचा खटाटोप अनायासें बंद पडला. मुलीचें वय कायद्याच्या दृष्टीनें अज्ञानावस्थेंत असलें तरी तिच्या ठिकाणीं आवडीनिवडी अगर आकांक्षा थोड्याफार प्रमाणांत उत्पन्न झालेल्या असणारच. तेव्हां तिची संमति मिळाली तरी पुष्कळशीं विजोड जोडपीं कमी होतील. तथापि कायदेशीर संमति देण्यासाठीं वधूचें वय निदान सोळा वर्षांचें गणलें जावें. तेव्हां या बाबतींत अशी सूचना करणें अवश्य आहे कीं, लग्नास उभयतां वधूवरांची संमति अवश्य ठेवावी. आणि अशी संमति देण्यासाठीं उभयतां वधूवरांस अठरा वर्षांनंतर लायक म्हणून समजावें. सोळापेक्षां खालच्या वयाच्या वधूवरांतर्फे त्यांचे पालक संमति देण्यास समर्थ समजावेत, मात्र अठरा वर्षांच्या आंत झालेला विवाह पतिपत्नीसमागम होण्यापूर्वीं रद्द करण्याचा हक्क उभयतांना असावा.

अज्ञान वधूवरांचीं लग्नें त्यांच्या पालकांनीं केलीं आणि त्यांत हरकत घेण्यासारखें कांहीं नसलें तर तीं लग्नें कायम राहतीलच. मात्र अशा संबंधांत जर कांहीं वैगुण्य असेल तर वयांत येतांच लग्न रद्द करून घेण्याचा हक्क मुलींना असावा अशी महत्त्वाची सूचना तिच्या वैयक्तिक हक्काबद्दल करणें जरूर आहे. मात्र हा हक्क पतिपत्नीसमागम होण्यापूर्वीं अंमलांत आणल्यासच कायम समजावा अशी त्याला पुस्ती जोडणें जरूर वाटतें. मुलीच्या बापाला तिच्या लग्नासंबंधानें जी अनियंत्रित सत्ता कायद्यानें दिलेली आहे, तीमुळें पैशाच्या लोभानें अयोग्य स्थळीं मुलींना लोटून देणाऱ्या पित्यावर कायद्याचें कसलेंच नियंत्रण राहात नाहीं. तथापि सर्वसाधारणपणें असें म्हणतां येईल कीं, पित्याला दिलेल्या या अधिकाराचा दुरुपयोग होण्याच्या वेळीं त्याचें अपत्यप्रेम त्याच्या लोभाच्या आड आल्याशिवाय राहात नाहीं. लोभास वात्सल्यापुढें हार खावी लागल्यास नवल नाहीं. मुलीच्या बापाला जे अनियंत्रित अधिकार तेच पित्याच्या अभावीं त्या मुलीच्या पालकाला मिळतात. कन्यादान करण्याच्या हक्काच्या निरनिराळ्या प्रती कायद्यानें

लाविल्या आहेत. बापाच्या अभावीं कन्यादान करण्याचा हक्क मुलीच्या आजास नंतर बापाच्या कुळांतील पुरुषास व त्यानंतर मातेस असतो. अशी अधिकारपरंपरा शास्त्रानें घालून दिलेली आहे. या परंपरेवरून असेंहि दिसून येईल कीं, जन्मदात्या आईला मुलीच्या लग्नाच्या संबंधांत अगदीं किमान दर्जा दिलेला आहे. याचा परिणाम असा होतो कीं, मुलीचे चुलते अगर इतर पुरुषनातेवाईक मुलीला वाटेल त्या स्थळीं देऊन टाकतात. तिऱ्हाइतांना अशा मुलीच्या सुखदुःखाची कितीशी काळजी असणार? आणि कायदा असें म्हणतो कीं, एकवार लग्न झालें म्हणजे तें अभेद्य. तेव्हां याचे परिणाम स्त्रियांना कोठवर सोसावे लागतात याचीं उदाहरणें समाजांत प्रत्यहीं दिसून येतात. मुलीच्या चुलत्यानें आईला न विचारतां खुशाल एकाद्या नादान मुलाला अगर म्हाताऱ्या नवऱ्याला पुतणी देऊन टाकल्याचीं उदाहरणें पुष्कळांनीं पाहिलीं असतील. अशा स्थितींत मुलीला अगर तिच्या आईला कांहींच करतां येण्यासारखें नसतें. लग्नाचें निश्चित झाल्यानंतर लग्नविधि आपल्या शास्त्राप्रमाणें इतक्या झपाट्यानें उरकून घेतां येतो कीं, कोर्टाची मदत घेणेंहि अशक्य होतें. शिवाय सध्यांची स्त्रियांची विपन्नावस्था पाहतां कोर्टकचेऱ्यांचा मार्ग मोकळा असूनहि त्यांना त्याचा फायदा घेतां येणार नाहीं. मुलीचें लग्न करण्याचा ज्याला अधिकार नाहीं अशा नातेवाइकानें तिचें लग्न केलें असलें तरी तें रद्द होऊं शकत नाहीं. कारण शास्त्रानें घालून दिलेला कन्यादान अधिकाराचा क्रम हा आज्ञार्थी नसून केवळ ऐच्छिक आहे.* खुद्द कोर्टाचा हुकूम अमान्य करून घडवून आणलेलें लग्न हें कोर्टानें वज्रलेप म्हणून ठरविलें आहे.‡ अशा स्थितींत केवढा भयंकर परिणाम ओढवतो याची वाचकांनीं कल्पना करावी. सर्व आयुष्याचें सुखदुःख ज्या लग्नावर अवलंबून आहे त्या लग्नाच्या बाबतींत प्रत्यक्ष वधूची संमति घेतली जावी ही मागणी अत्यंत किमान म्हणून मानण्यास हरकत नाहीं.

लग्नास मुलीची संमति असावी, असें म्हणून स्वस्थ बसून चालावयाचें नाहीं. तर मुलीची संमति लग्नप्रसंगीं घेतली नसेल तर झालेलें लग्न कितपत

---

* मूळचंद वि. भुदिया. २२ मुंबई ८१२; खुशालचंद वि. बाई मणी. २१ मुंबई २४७ वगैरे.

‡ बाई दिवाळी वि. बाई मोती. २२ मुंबई ५०९.

ग्राह्य मानावें याविषयीं विचार केला पाहिजे. वास्तविक ज्या लग्नास तिची संमति नसेल तें लग्न तिला टाळण्याचा हक्क असला पाहिजे. संस्कार म्हणून कितीहि जोरानें लग्नाची थाळी पिटली तरी तत्त्वतः आणि वस्तुतः लग्नसंस्थेच्या बुडाशीं वैवाहिक आयुष्य सुखदायक व्हावें हाच लौकिक विचार असतो. ऐहिक जीवनपेक्षां लग्नाचा पाया मोक्षाची आशा धरून रचावा असले एके काळचे विचार आज परिस्थितीनें वेडेपणाचे ठरतील. बुभुक्षितानें आपण ‘ उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ’ असें सांगणें जितकें हास्यास्पद आहे तितकेंच लग्नविधीचा मोक्षाशीं संबंध लावणें हास्यास्पद होईल. लग्नाचा उद्देश, त्याचें कार्य आणि त्यापासूनची अपेक्षा हीं सर्व केवळ लौकिक आहेत; फार काय पण ऐहिक वैवाहिक जीवन सुखी व्हावें यापरता दुसरा उद्देश लग्नसंस्थेच्या बुडाशीं नाहीं. पतिव्रताधर्माचें आणि मोक्षाचें खूळ धर्माभिमान्यांनीं आमच्या अडाणी स्त्रीवर्गाच्या मनांत जें पेरून ठेविलें आहे, त्याला वार्षिक व्रतवैकल्याचें इतकें पाणी पुरविलें जात आहे कीं, आज स्त्रीजीवनाचें सर्व क्षेत्र या केरकचऱ्यानें भरून गेलें आहे. आणि त्याच्या ठिकाणीं दिसणारा भित्रेपणा, परावलंबीपणा, फाजील सहिष्णुता, फार काय पण पतीची आणि पत्नीची झालेली अधोगति हीं त्याचींच फळें आहेत. तेव्हां ही भलतीच मोक्षाची कल्पना कुणीहि उराशीं बाळगूं नये. लग्न हा लौकिक संबंध आहे आणि इतर लौकिक संबंधांप्रमाणें त्यांत निगडित होणाऱ्या स्त्रीपुरुषांची स्पष्ट संमति नसल्यास तो लग्नसंबंध त्यांच्यावर बंधनकारक होऊं नये असें म्हणणें भाग पडतें. मुलगी सज्ञान असेल तर तिची संमति घेतां येईल आणि तिच्यापुरतें हें म्हणणें बरोबर आहे; पण हिंदु लोक अर्भकांचीं लग्नें लावण्यास चटावलेले आहेत. ते आपली हौस पुरविल्याशिवाय राहणार नाहींत. शिवाय ‘ सारडा ॲक्ट ’ नें मुलींची लग्नवयोमर्यादा सज्ञानपणाच्या उंबरठ्याशीं आणून सोडली नाहीं. तेव्हां अज्ञानावस्थेंत मुलींचीं लग्नें त्यांचे आईबाप व पालक हे करीत राहणारच. अज्ञानाच्या वतीनें इतर लौकिक व्यवहारांत संमति देण्यास त्याचे वडील अगर पालक हे अधिकारी समजले जातात. मात्र अज्ञानाच्या हितासाठीं तो व्यवहार नसेल तर अगर अज्ञानास तो मान्य नसेल तर वयांत येतांच त्याला तो रद्द करून घेतां येतो. वयांत येतांच जर त्यानें

संमति दिली अगर कायम केला तर तो व्यवहार त्याला बंधनकारक होतो. अशाच तऱ्हेची सोडवणूक मुलींना लग्नाचे बाबतींत मिळावी.

**अपवाद—**

अज्ञानावस्थेंत झालेलें लग्न मुलगी वयांत येतांच रद्द करूं शकेल या नियमाला एक अपवाद घालणें जरूर आहे. पतिपत्नीसमागम होण्यापूर्वी तिला तो हक्क बजावण्याची मोकळीक असावी. पतिपत्नीसमागम एकवार झाला म्हणजे तिचा तो हक्क नष्ट व्हावयास पाहिजे. कारण एक तर तिनें पालकाच्या कृत्यास स्वतःच्या कृतीनें संमति दर्शविली असें होईल, आणि दुसऱ्या तऱ्हेनें तिनें स्वतःस भलत्याच अडचणींत नेऊन टाकलें असें होईल. समागम झाल्यानंतर तिनें लग्न रद्द केलें तरी तिच्याशीं पुनः लग्न करण्यास कोण तयार होणार ? बालविधवांचेहि पुनर्विवाह फारसे होत नाहींत; तर भ्रष्ट झालेलीचा विवाह कसा घडून येणार ?

**अज्ञान स्थितींत माहेरीं राहण्याचा हक्क—**

झालेलें लग्न आपणांस पसंत आहे कीं नाहीं हें जाहीर करण्याइतकी स्वतंत्रता तिला असली पाहिजे. म्हणजे अर्थात् वयांत येण्याच्या अगोदर तिला नवऱ्याचे घरीं न राहण्याची मोकळीक असणें जरूर आहे. आज लग्न होतांच तिचा पति तिचा पालक होतो आणि तिचें वय कितीहि लहान असो, तिनें त्याच्यापाशीं आणि त्याच्या आज्ञेंत राहावें असा कायद्याचा नियम आहे व या नियमाला कांहीं आळा घातला नाहीं तर मुलीला दिलेली संमतीची सवलत ही निष्फळ ठरेल. म्हणून तशी सवलत देणें जरूर आहे.

एकंदरींत संमतीबद्दलची सूचना अशी मांडतां येईल कीं—

लग्नास मुलीची संमति असावी. ती अज्ञान असेल त्या वेळेस तिच्या वतीनें तिचे पालक संमति देण्यास अधिकारी आहेत.

तिच्या संमतीवांचून झालेलें लग्न अगर तिच्या अज्ञानावस्थेंत झालेलें लग्न पतिपत्नीसमागम होण्यापूर्वी तिच्या मर्जीनुरूप तिला रद्द करण्याचा अधिकार असावा.

लग्नांत कपट, दगलबाजी अगर बळजबरी झालेली असेल तरीहि

तिला लग्न रद्द करण्याचा हक्क असावा. कपट यांत वराची जात, वय, ऐपत यांविषयीं केलेलें असत्य विधान कीं ज्यावर विश्वास ठेवूनच लग्नसंबंध घडून आला अशा गोष्टींचाहि समावेश व्हावा. बळजबरी, दगलबाजी यांत मुलीच्या आईबापाची अगर पालकाची अगर तिची स्वतःची संमति मिळविण्यासाठीं गैरवाजवी दाब वापरणें, लांचलुचपत देणें अगर देण्याचें कबूल करणें, अशांचा समावेश व्हावा.

---

सातारा
सातारा

## प्रकरण ४ थें

# घटस्फोट

### सुवासिनीचे वैवाहिक हक्क—

लग्न हा एक संस्कार म्हणून समजला जातो, व तो एकाद्या करारा-प्रमाणें वाटेल तेव्हां बदलतां किंवा रद्द करितां येत नाहीं, असें हिंदुधर्मशास्त्र म्हणतें. लग्न लागलें कीं स्त्रीपुरुषांचा संबंध अभेद्य होतो. पति नपुंसक असो, पतित असो, बेपत्ता होवो, संन्यासी होवो, मारझोड करीत असो, पशु-वृत्तीचा असो, कोणत्याहि कारणामुळें एकवार झालेलें लग्न रद्द होऊं शकत नाहीं व तिचा पति हयात आहे तोंवर तिला दुसरें लग्न करितां येत नाहीं. तिनें लग्न केलेंच तर ती गुन्हेगार ठरते आणि तिला शिक्षा होते. तिनें लग्न न करितां दुसऱ्या पुरुषाशीं संबंध ठेविला तर त्या पुरुषास व्यभिचाराच्या गुन्ह्या-बद्दल शिक्षा होते. पति मारझोड करणारा असेल, दुष्ट असेल अगर अत्यंत नादान असेल तर प्रसंगविशेषीं पत्नीला निराळें राहतां येतें व यालाच फारकत घेणें असें म्हणतात. लग्नानंतर पत्नीनें पतीच्या ताब्यांत आणि हुकुमांत राहिलें पाहिजे. तिचा पालक नवरा होय. पत्नीला नवऱ्याच्या येथें मी राहात नाहीं असें म्हणतां येत नाहीं. नवऱ्यास तिला कबजांत घेण्याचा दावा करितां येतो व तिनें कोर्टाच्या हुकुमाप्रमाणें नवऱ्याच्या येथें जाण्याचें नाकारलें तर तिला दिवाणी तुरुंगांत पाठविण्याचा कोर्टास अधिकार आहे. आज घटस्फोट खालच्या जातींत रूढि म्हणून प्रचलित आहे. कायद्यानें घटस्फोट मान्य केलेला नाहीं. घटस्फोटाची रूढि वरच्या जातींत मान्य नाहीं. आपणांस वरच्या दर्जाची जात म्हणवून घेण्यासाठीं खालच्या जातींनींहि या बाबतींत पुष्कळच अनुकरण केलेलें आढळून येतें. पुनर्विवाह हाहि वरच्या जातीसच मान्य नाहीं. मराठ्यांच्यांत घटस्फोट अगर काडीमोड देण्याची वहिवाट आहे. पण छप्पन कुळांतले वरच्या दर्जाचे मराठे घटस्फोटाची व पुनर्विवाहाची चाल आमच्यांत नाहीं असें म्हणतात व त्याप्रमाणें वागतात. एकंदर हिंदुसमाज

घेतला तर तीन हिस्से जातीच्या लोकांत घटस्फोट रूढ आहे. फक्त जेमतेम एक हिस्सा हिंदु लोकांत काडीमोड नाहीं.

### घटस्फोट आणि फारकत—

वैवाहिक हक्कांबद्दल विचार करण्याच्या अगोदर घटस्फोट आणि फारकत यांतील फरक जाणणें जरूर आहे. घटस्फोट म्हणजे ज्याला इंग्रजींत डायव्होर्स म्हणून म्हणतात तो. यांत स्त्रीपुरुषांचा विवाह रद्द होऊन त्या-उभयतांना पुनर्लग्न करण्याची मुभा कायद्यानें दिलेली असते; परंतु फारकत म्हणजे जिला इंग्रजींत ज्युडीशियल सेपरेशन म्हणून म्हणतात तें. त्या योगानें उभयतांतील पति-पत्नि हें नातें कायम राहूनहि त्यांना कांहीं वैवाहिक जबाबदाऱ्यांतून मुक्त करण्यांत येतें. दोघांना एकत्र राहण्यास भाग पाडतां येत नाहीं. पत्नी फारकत घेतल्यानंतर स्वतंत्र निराळी राहूं शकते व लग्नाची जबाबदारी तिच्याकडून पुरी करण्याचा हक्क तिच्या नवऱ्यास अंमलांत आणतां येत नाहीं. फारकत मिळाल्यावरहि स्त्री त्या पुरुषाची पत्नी म्हणून कायम राहते व तिला तो अन्नवस्त्र देण्यास जबाबदार असतो. फारकत मिळाली म्हणजे लग्नसंबंध व पतिपत्नीचें नातें नष्ट होत नसल्यामुळें बायकोस दुसऱ्याशीं लग्न करतां येत नाहीं. नवऱ्यास अनेक बायका करण्याचा जो हक्क कायद्यानें दिला आहे त्या हक्काच्या जोरावर तो अनेक लग्नें करूं शकेल. घटस्फोट पतिपत्नीसंबंधाचा छेद करितो, दोघांनाहि दुसऱ्याच्या हयातींत पुनर्लग्न करण्याचा हक्क देतो. पत्नी म्हणून पोसण्याची जबाबदारी अर्थात् घटस्फोटानंतर नवऱ्यावर राहात नाहीं. घटस्फोटानें तोडलेलें नातें कायमचेंच असतें. त्या उभयतांना पतिपत्नी म्हणून पुन्हा एकत्र राहतां येत नाहीं. पण फारकत मिळाल्यानंतरहि उभयतांची मर्जी असेल अगर त्यांच्यांतील बेबनांवाचें कारण नाहींसें झालें असेल तर पुन्हां पतिपत्नी म्हणून संसार करण्यास प्रत्यवाय नसतो.

### भेदाचें कारण—

फारकतीच्या मानानें घटस्फोट हा वैवाहिक दुःखावर जालीम उपाय समजला जातो. आणि असाध्य दुखणें असलें तरच शेवटचें जालीम औषध

द्यावयाचें असा जो नियम आहे तोच घटस्फोटाच्या इलाजाबद्दल लागू पडण्यासारखा आहे. वैवाहिक संबंधाच्या आड येणाऱ्या व कालांतरानेंहि दूर न होणाऱ्या अडचणी अगर आपत्ति उत्पन्न झाल्या असतां घटस्फोटाची जरूरी उत्पन्न होते, तर कालांतरानें दूर होणाऱ्या क्षणिक अगर क्षुल्लक अडचणी उपस्थित झाल्यास फारकतीचा उपाय अंमलांत आणण्याची मोकळीक कायद्यानें ठेवलेली असते. वैवाहिक संबंध घडून येण्यासच कायदेशीर अडथळे, वैवाहिक जबाबदाऱ्या पुऱ्या करण्यास जरूर असलेल्या गुणांचा अभाव, अगर पुन्हां एकत्र संसार होणें अशक्य कोटींतलें होईल, असे निर्वाणीचे प्रसंग जेव्हां उत्पन्न होतात त्या वेळेस घटस्फोटानें उभयतांना विवाहबंधनांतून मुक्त करण्यांत येतें. उदाहरणार्थ, वेड, क्लीबत्व व धर्मांतर या कारणांनीं उभयतांना वैवाहिक जीवन अनिष्ट वाटत असेल तेव्हां असा संबंध मोडून टाकला तरच हितकर आहे. याच्या उलट जीं कारणें क्षुल्लक आहेत, क्षणिक आहेत वा कालांतरानें नष्ट होणारीं आहेत अशीं कारणें उत्पन्न झालीं म्हणजे दोन भांडणाऱ्या लहान मुलांना वडील माणसें जशीं दोन्हीकडे बाजूस सारतात व कांहीं वेळ एकमेकांची गांठ पडूं देत नाहींत, तसाच कायदाहि या असंतुष्ट पतिपत्नींना एकमेकांपासून कांहीं वेळ सोडवितो. उद्देश हाच कीं, पाहिजे तर त्यांनीं ताळ्यावर येऊन सुखासमाधानानें पूर्ववत् एकत्र राहावें. उभयतांचें पटेनासें झालें म्हणजे वैरभाव विसरून जाण्यापुरती त्यांना कांहीं वेळ निरनिराळें ठेवण्याची सोय फारकतीच्या योगानें साधते व त्यांनीं पुन्हां एकत्र संसार करण्यास कोणत्याहि तऱ्हेची आडकाठी कायद्यानें ठेवलेली नाहीं. यावरून कायद्याला त्यांचें पुनर्मीलन होणें इष्ट; निदानपक्षीं शक्य तरी वाटतें हें उघड आहे. फारकत आणि घटस्फोट यांच्यांतील भेद स्पष्ट करण्यासाठीं आपण दाखला घेऊं. एकाद्या स्त्रीचा नवरा महाव्याधि वगैरे असाध्य रोगांनीं पछाडलेला असेल तर पतिपत्नींत उत्पन्न होणारी असंतुष्टता ही पतींत असलेल्या वैगुण्यामुळेंच उत्पन्न झालेली असते. आणि हीं वैगुण्यें कालांतरानेंहि नाहींशीं होणारीं नाहींत. अशा स्थितींत त्या अभागी स्त्रीचें बलिदान करण्याऐवजीं तिला घटस्फोटाची मोकळीक करून देणें हेंच योग्य ठरतें. पण नवरा व्यसनी आहे, व्यभिचारी आहे, अगर मारझोड करणारा आहे, तर कालांतरानें तो निवळेल असाहि संभव असतोच. तेव्हां या कारणांसाठीं त्याच्या

पत्नीस फारकत मिळवितां येते. फारकत मिळविण्याचीं कारणें आणि घटस्फोट मिळविण्याचीं कारणें हीं वर नमूद केलेल्या तत्त्वानुसार निरनिराळीं ठरविण्यांत आलीं असलीं तरी कांहीं कारणें दोहोंकडे सारखींच असतात. पतीची पशुता, निर्दयता अगर व्यभिचार हे दुर्गुण अशा तऱ्हेचेहि असू शकतील कीं जेणेंकरून तो पुन्हां ताळ्यावर येईल अशी आशासुद्धां पत्नीच्या मनांत शिल्लक राहिलेली नसेल. व तिला फारकतच काय पण घटस्फोटहि मागतां येईल. फारकत मिळवावयाची कां घटस्फोट मिळवावयाचा हें परिस्थितीप्रमाणें जिनें तिनें ठरवावयाचें असतें. नवऱ्यापासून पोटगी घेऊन वेगळें राहून सबंध आयुष्य विधवेप्रमाणें घालविण्याची जिची इच्छा असेल ती फारकतच घेईल. पण जिला योग्य पुरुषाबरोबर पुन्हां लग्न करून संसार करण्याची इच्छा व शक्यता असेल तिला घटस्फोट करून घेणेंच जास्त फायद्याचें आहे.

**घटस्फोटाची आवश्यकता—**

स्त्रीपुरुषांना विवाहबंधनांनीं एकत्र निगडित करून ठेवणें हें जितकें समाजरचनेच्या दृष्टीनें आवश्यक आहे, तितकेंच कांहीं कांहीं कारणांसाठीं विवाहबंधनाची बेडी मोकळी करून उभयतांना कांहीं प्रसंगीं ज्यांच्या त्यांच्या जबाबदाऱ्यांतून मुक्त करणें हें आवश्यक असतें. विवाहबंधनें तोडून टाकणें हें कित्येक वेळीं तीं बंधनें कायम ठेवण्यापेक्षां जास्त श्रेयस्कर असतें. जिचें वैवाहिक आयुष्य नवऱ्याच्या नादानपणामुळें कमालीचें खडतर झालें आहे, नवऱ्यांतील व्यंगामुळें जिला पतिसुखाची आशाहि उरलेली नाहीं, अशा अभागी स्त्रीस त्या नरकवासांतून सोडविणें अधिक श्रेयस्कर कीं तिला तेथें पिचत ठेवणें अधिक श्रेयस्कर ? नाइलाजानें वाईट मार्गाकडे मनुष्य खेंचला जाईल अशा स्थितींत त्याला कायमचा डांबून ठेवणें हें सामाजिक नीतीच्या विरुद्ध आहे. लग्नाची कल्पनाच स्त्रीपुरुषांच्या ऐहिक सुखासाठीं निर्माण झालेली आहे. पण प्रत्यक्ष अनुभवांत वैवाहिक सुखाऐवजीं दुःखाचाच आणि निराशेचाच वांटा पदरीं पडला तर ध्येयास विघातक म्हणून तत्त्वतः तो विवाह मोडून टाकण्याची सोडवणूक असली पाहिजे. अशी कोणतीहि सुखासाठीं निर्माण झालेली संस्था नाहीं कीं उच्च ध्येयाच्या नांवावर ती चौफेर दैन्य उधळीत कायमची राहूं शकली आहे. पुरुषांना असंख्य स्त्रिया करण्याचा

अधिकार हिंदुधर्मशास्त्रानें दिलेला आहे, तेव्हां घटस्फोटाच्या अभावाची जाचणूक त्यांना भासत नाहीं. पाश्चात्य धर्मीयांप्रमाणें हिंदु पुरुषांवर एकपत्नीकत्व लादण्यांत आलें तर घटस्फोटाचा कायदा नको असें म्हणणारे पुरुष बोटावर मोजण्याइतके तरी निघतील का? दैवानें दैत्यांशीं गांठी पडलेल्या दीन अबलांच्या भोंवतीं वैवाहिक बंधनाचा फास अडकून त्या ऐहिक सुखाच्या केवळ दर्शनाकरितां धापा टाकीत असतांहि त्यांच्या गळ्यांभोंवतीं पडलेला हा यमपाश जर कांहीं कारणामुळें सैल करतां आला नाहीं तर प्राणिमात्रांचें हित साधण्याकरितां आपलें अस्तित्व आहे ही धर्मशास्त्राची उक्ति दर्पोक्तीच नव्हे काय? प्राणिमात्रांचें ऐहिक सुख ज्याला साधत नाहीं त्या हिंदुधर्मशास्त्रानें पारलौकिक हित साधण्याचें आश्वासन देणें ही एक फसवणूक नव्हे काय? हिंदुधर्मशास्त्रास घटस्फोट मान्य नाहीं हें मान्य केलें तरी तेवढ्यावरून त्याची आज जरूरी नाहीं असें म्हणतां येईल काय? आपण सभोंवार नजर टाका. अशीं कित्येक दुर्दैवी जोडपीं आढळून येतील कीं, ज्यांना घटस्फोटाच्या योगानें मुक्त करून रौरवांतून सोडविणें अत्यंत जरूरीचें आहे असें आपणांस वाटेल. हिंदुधर्मशास्त्रांत घटस्फोट एके काळीं रूढ होता याबद्दल आम्ही पुढें लिहिणारच आहोंत. पण आज तो असणें अत्यंत आवश्यक झालें आहे एवढें मात्र खरें!

### परिस्थितींतील फेरबदल—

समाजाची स्थिति पार बदलून गेली आहे आणि पूर्वीच्या समाजरचनेंत ज्या अडचणींची कल्पनाहि आली नसेल त्या आज प्रत्यक्ष अनुभवास येऊं लागल्या आहेत. कुटुंबव्यवस्था विस्कळीत होऊं लागल्याबरोबर त्यांतील प्रत्येक घटक स्वतंत्र झाला. मुख्य कर्त्याचा त्याच्यावरचा पूर्वीचा दाब नाहींसा झाला आणि तो स्वैर बनला. त्याला स्वतःच्या एकट्याच्या सुखाची जास्त चटक लागूं लागली. त्यामुळें पूर्वीच्या काळीं मनासारखी बायको मिळाली नाहीं तरी खिन्न असलेल्या पुरुषांचे संसार होत असत; व त्याच्या बायकोचें आणि मुलांचें कुटुंबांत पालनपोषण होत असे. त्याच्या उलट आज स्वतःच्या पसंतीनें केलेली मनासारखी बायको आवडेनाशी झाली तर तिला घरांत राहण्याचीहि सोय नसते. जुनी साधी राहणी सुटली, पुरुषांच्या आवडी-

निवडी भलत्याच थराला जाऊन पोहोंचल्या, आणि त्या सर्व पत्नीकडून पुऱ्या पडणें शक्य नसल्यामुळें बेबनावाचे प्रसंग तितके अधिक उत्पन्न झाले. स्त्रियांच्या मनांत शिक्षणाबरोबर आत्मप्रतिष्ठेची जी जाणीव उत्पन्न झाली आहे तिजमुळें पति हा परमेश्वर समजून त्याच्या गुलामगिरींत निमूटपणें दिवस काढण्याची वृत्ति त्या झुगारून देऊं लागल्या आहेत. पतिव्रताधर्माला न्यायनीतीची कसोटी जेवढ्या कसोशीनें आजतागायत पुरुष लावीत आले त्याच कसोटीनें व तितक्याच कसोशीनें आजची पतिव्रता पतिधर्माची परीक्षा करूं लागली आहे. सोशीकपणाचे मूग गिळून बसलेल्यांच्या मनांत पतीच्या वर्तनाविषयीं असंतोष नसतो असें थोडेंच आहे ? तिनें तो बोलून दाखविला नाहीं तरी तिची एकादी फटकळ शेजारीण लेखिका वैवाहिक जीवनांतील पुरुषांचे अत्याचार वर्तमानपत्राच्या चव्हाट्यावर गोष्टींच्या रूपानें मांडतेच ना ? आणि हें कशाचें द्योतक आहे ? तर मुक्या स्त्रीजीवनास वाचा फुटल्याचेंच ! धर्माची भीति नाहींशी झाली; पुरुषांनींच धर्म सोडल्यावर स्त्रियांनीं तरी तो कां पाळायचा ? आणि कोणता पाळावयाचा ? वैवाहिक संबंधाच्या जबाबदाऱ्या झुगारून देण्यास पुरुषांना कधींच दिक्कत वाटली नाहीं, मग स्त्रियांनीं तरी कां कचरावें ? स्त्रीजात ही कमी प्रतीची अशी आजवरची जी नीति तिला शिक्षणांत आणि कर्तबगारींत पुरुषांशीं स्पर्धा करणाऱ्या स्त्रियांनीं धक्का दिला आहे. स्त्रिया समान हक्क प्रस्थापित करूं लागल्या, अशा स्थितींत कमी दर्जाच्या कल्पनेवर उभारलेली पुरुषांची बेगडी सत्ता डळमळून पडली तर नवल काय ? अमुक एक गोष्ट चांगली कीं वाईट हें पतीच्या आज्ञेवरून न ठरवितां स्वतःच्या कल्पनेप्रमाणें न्यायनीतीची कसोटी लावून पारख करण्याची वाढती प्रवृत्ति चालू काळांतील स्त्रियांत दिसून येत आहे. तेव्हां आंधळा आज्ञाधारकपणा तरी किती दिवस टिकेल ? जीवनकलह तीव्र होऊं लागला, पोटापाण्यासाठीं कुटुंबांतील कर्त्यावर अवलंबून राहणारे पुरुषच काय, परंतु पतीवर एके काळीं पोटाकरितां अवलंबून राहिलेल्या पत्नीस आज उदरनिर्वाहासाठीं स्वतः धडपड करावी लागते. अशा स्थितींत तिनें नवऱ्याच्या ताब्यांत तरी काय म्हणून राहावें ? या यांत्रिक युगांतील सुखसोयी झपाट्यानें वाढत आहेत त्याबरोबर कुटुंबावर पडणारा आर्थिक ताणहि सारखा वाढत आहे आणि आधुनिक राहण्याची पद्धति पाहिली

तर वैयक्तिक सुखाच्या कल्पनेची प्रमाणाबाहेर वाढ होत चालली आहे. आपलपोटे सुखार्थी पुरुष पत्नीच्या सुखाविषयीं बेफिकीर झाले तर पत्नीनें तरी पतीची आस्था कां म्हणून बाळगावयाची ? उदार मतांचा वारा जो विचारक्रांतीच्या वावटळी उठवीत आहे त्यानें स्त्रीपुरुषनीतिकल्पनांचे जीर्ण वृक्ष गदगदा हलवून स्त्रीविषयक जुन्या अनुदार कल्पनांचा पाचोळा खालीं पाडून उधळून दिला आणि स्त्री ही उपभोग्य वस्तु ह्या कल्पनेचा आधारस्तंभ तर यापूर्वीच उपटून फेंकून दिला आहे. विसंगत जोडपीं एकमेकांपासून दूर होण्यासाठीं विवाहरज्जूस हिसके देत आहेत. परिस्थिति अनुकूल नाहीं, समाजाची सहानुभूति नाहीं, कायद्याचें रक्षण नाहीं, रूढींत मार्ग नाहीं, म्हणन एकत्र जखडून ठेविलेले स्त्रीपुरुष सुखासमाधानांत आहेत असें मानणें हें वाजवी होईल का ? स्त्रियांची लग्नाविषयींची कल्पनाहि बदलली आहे. प्रजोत्पादन अगर आत्मरक्षण ही त्यांची लग्नाविषयींची कल्पना बदलत असून ऐहिक आयुष्यक्रमांत धर्मार्थकामाचे ठिकाणीं बरोबरीच्या नात्यानें वागणारा सखा म्हणजे पति या अपेक्षेनें पाहणारी आजची कुमारिका लग्नानंतर आपलें व्यक्तित्व सोडण्यास तयार नसते; आणि तिच्या अपेक्षेची निराशा होण्याचा प्रसंग अगर परिस्थिति उत्पन्न झाली तर लग्नसंस्काराच्या अभेद्यपणाचा बांध तिच्या प्रबळ इच्छाशक्तींचा कोंडमारा कितीसा करूं शकणार ? या एकंदर कारणांनीं आज घटस्फोटाचा प्रश्न अत्यंत निकडीचा झालेला आहे.

### घटस्फोट पूर्वीं रूढ होता—

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें लग्न हा एक अभंग असा संस्कार आहे. एकवार झालेलें लग्न कधींहि कोणत्याहि कारणानें रद्द होऊं शकत नाहीं असा सध्यांचा नियम असला तरी पूर्वींच्या काळीं पतीच्या हयातींत स्त्रीला पुनर्विवाह करण्याचा हक्क होता असें दिसतें. बऱ्याच ग्रंथकारांचाहि असाच अभिप्राय आहे; पण स्त्रियांच्या पावित्र्याबद्दलच्या कल्पनांनीं पुनर्विवाहाच्या या चालीचें उच्चाटण केलें. पुराणांतहि नलराजा बेपत्ता झाल्यावर दमयंतीनें पुन्हां स्वयंवर मांडिलें होतेंच ना ? बेपत्ता झालेला नवरा परत येण्यासाठींच तिनें स्वयंवर जाहीर केलें होतें. पुन्हां दुसरा नवरा करण्याची तिची इच्छाहि नव्हती असें कबूल केलें तरी बेपत्ता झालेल्या नवऱ्याच्या बायकोला पुन्हां

स्वयंवर मांडण्याचा हक्क त्या वेळेला असावाच. निदान पक्षीं हें करणें गर्हणीय समजत नसत असा निष्कर्ष या दाखल्यावरून निघण्यासारखा आहे. दमयंतीच्या या वर्तणुकीस स्मृतिग्रंथांत भरपूर आधार सांपडतो. या दृष्टीनें पाहतां हिंदुधर्मशास्त्रांत एके काळीं घटस्फोट रूढ होता असें म्हणावें लागेल. आणि घटस्फोट म्हणून पूर्वीचें लग्न मोडण्याचा विधि जरी प्राचीन काळीं मोजक्या प्रसंगीं अंमलांत आणीत असत, तरी विवाहित स्त्रियांचा पुनर्विवाह मात्र सरसहा रूढ होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. अपात्र अशा वराला कन्या दिली असली तरी तिला परत घेऊन सत्पात्र वरास देण्याचा कन्येच्या बापाचा हक्क वर्णन केलेला आढळतो. वसिष्ठ स्मृतींत सांगितलें आहे कीं, कुलहीन, शीलहीन, नपुंसक, अपस्मारी, रोगी, बैरागी अगर सगोत्र अशा वराशीं कन्येचा जर विवाह झाला असेल तर तिला परत आणावें.

कुलशीलविहीनस्य षंढादि पतितस्य च ।
अपस्मारी विधर्मस्य रोगिणां वेशधारिणाम् ।
दत्तामपि हरेत्कन्यां सगोत्राढां तथैव च ॥ —वसिष्ठ.

संस्कृत श्लोकांत 'दत्तामपि' याचा 'वाग्दत्तां' असा म्हणजे वाङ्‌निश्चय केला असेल तर असें मानून ह्या श्लोकांतील मथितार्थावर एखाद्या शास्त्रीबुवांना बोळा फिरवितां आला तरी कात्यायनाचें मत याविषयीं स्पष्ट आहे. कात्यायन म्हणतो, वेडा, पतित, कोड फुटलेला, नपुंसक, एकाच गोत्राचा, आंधळा, बहिरा, अपस्मारी हे सदोष वर होत. जर पति अन्य जातीचा असेल, पतित अगर पापी असेल, नपुंसक, आंधळा अगर बहिरा असेल, गुलाम असेल, जुनाट रोगानें जर्जर असेल तर तिचें त्याच्याशीं लग्न झालेलें असलें तरीसुद्धां तिच्या पित्यानें तिला वस्त्रालंकारानें मंडित करून तिचें दुसऱ्या योग्य वराशीं लग्न करून द्यावें.

उन्मत्तः पतितः कुष्टी षंढश्च वा सगोत्रजः ।
चक्षुःश्रोतृविहीनस्य तथापस्मार दूषितः ।
वरदोषाः स्मृता ह्येते । ........
स तु यदन्यजातीयः पतितः क्लीब एव वा ।
विकर्मस्थ सगोत्रो वा दासो दीर्घामयोऽपि वा ।
ऊढापि देया साऽन्यस्मै सप्रावरणभूषणा ॥

कन्येच्या बापाचा अधिकार असा असे कीं अपात्र वर मिळाल्यास मुलीला परत घेऊन येण्यास आणि तिचें योग्य वराबरोबर लग्न लावून टाकण्यास तो मुखत्यार असे. दुसरें लग्न लावण्यापूर्वी पहिलें लग्न यथाविधीनें नेहमींच रद्द करावें लागत नसावेंसें दिसतें. सध्यांच्या काळीं पतीच्या हयातींत स्त्रीला पुनर्लग्न करावयाचें असेल तर तिचें पहिलें लग्न कायद्यानें रद्द झालेलें असावें लागतें. तसा कांहीं निर्बंध पूर्वींच्या काळीं असावा असें दिसत नाहीं. उलट पहिल्यापेक्षां दुसरा चांगला नवरा मुलगा जर आढळण्यांत आला तर त्यास तिला देऊन टाकण्याचा अधिकार पित्याला होता. याज्ञवल्क्य म्हणतात, कन्यादान एकदांच होतें आणि त्यानंतर तिला घेऊन जाणारास चोर म्हणून शासन व्हावें. पण जर पूर्वींच्या वरापेक्षां अधिक गुणवान् वर आला तर दिलेली कन्याहि परत घ्यावी.

सकृत्प्रदीयते कन्या हरेस्तां चोरदण्डभाक् ।
दत्तामपि हरेत्पूर्वाच्छ्रेयांचेद्वर आव्रजेत ॥ ——याज्ञवल्क्य.

यावरून असें म्हणण्यास बिलकूल हरकत नाहीं कीं स्मृतिकालीं घटस्फोट अंमलांत होता. निदानपक्षीं अयोग्य वराशीं गांठ पडलेल्या स्त्रियांना नवऱ्याच्या जिवंतपणीं त्यास सोडून दुसऱ्या अनुरूप पुरुषाशीं लग्न करण्याची मोकळीक होती.

## पूर्वींच्या काळांतील घटस्फोटाचीं कारणें—

आतां पूर्वी कोणकोणत्या कारणांसाठीं दुसरें लग्न करण्याचा हक्क पोंचत होता तें पाहूं. गेल्या परिच्छेदांत वरांतील दोषांची यादी आलेलीच आहे. कुलहीनता, शीलहीनता, नपुंसकत्व, पतितत्व, अंधत्व, बधिरत्व, दास्यत्व, रोगीपणा, वगैरे दोष वरांत असतां तिला पुर्नविवाह करण्याचा हक्क वसिष्ठ आणि कात्यायन यांनीं दिला आहे, असा अभिप्राय नारदस्मृतींत व्यक्त केलेला आढळतो. नारद म्हणतो—वेडा, पतित, नपुंसक, कपाळकरंटा, बांधवांनीं टाकलेला व कन्येनें जे दोन दोष सांगितले, (जुनाट वाईट रोगानें जर्जर झालेला व व्यंग असलेला) त्यांनीं युक्त असा वर दुर्गुणी समजावा. दोषरहित कन्येचा विवाह दुर्गुणी वराशीं झाला व ज्याचे दुर्गुण मागाहून समजून आले अशा स्थितींत जर तिनें होऊन परपुरुषाचा आश्रय

केलेला नसेल तर तसें करण्यास तिच्या नातेवाइकांनीं तिला प्रवृत्त करावें. तिला जर कोणी नात्याचें नसेल तर तिनें परपुरुषासमवेत इच्छेप्रमाणें राहण्यास जावें. पति बेपत्ता झाला, मेला, संन्यासी झाला, नपुंसक असला, अगर पतित झालेला असला, तर या पांच प्रसंगीं स्त्रियांनीं दुसरा नवरा करावा.

उन्मत्तः पतितः क्लीबो दुर्भगस्त्यक्तबांधवः।
कन्यादोषौ च यौ पूर्वे एष दोषगणो वरे।
अज्ञातदोषेणोढा या निर्दोषानान्यमाश्रिता।
बंधुभिः साभियोक्तव्या निर्बंधु स्वयमाश्रयेत्॥
नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ।
पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते॥ ––नारद.

वसिष्ठानें नमूद केलें आहे कीं, जी स्त्री नपुंसक, पतित, वेडा अगर मृत पतीला सोडून दुसऱ्याशीं लग्न करते ती 'पुनर्भूवा' समजली जावी.

या वा क्लीबं पतितमुन्मत्तं वा भर्तारमुत्सृज्यान्यंपतिं
विन्दते मृते वा सा 'पुनर्भूः' भवति॥ ––वसिष्ठ.

देवल ऋषींनींहि घटस्फोटाबद्दल जो आपला अभिप्राय नमूद केला आहे, त्यांत पंचदोषांशिवायहि दुसरीं अनेक कारणें दिलीं आहेत. ते म्हणतात. बेपत्ता झालेला, बैरागी, नपुंसक, पतित, राजद्रोही अगर मृत, अशा पतीला त्याच्या स्त्रीनें टाकून द्यावें. नवऱ्याच्या निधनानंतर अगर त्याच्या हयातींत तिला दुसरा पति करावयाचा असेल तर वंशक्षय होऊं न देण्यासाठीं तिनें तो करावा. नवरा प्रवासास गेला असल्यास ब्राह्मणाच्या स्त्रीनें आठ वर्षांपर्यंत वाट पाहावी. त्या मुदतीनंतर तिनें दुसरा पति करावा. वंशवृद्धि होण्यासाठीं स्त्रियांनीं असें वागलें पाहिजे अशी शास्त्राची आज्ञा असल्यामुळें दुसरा नवरा करण्यांत स्त्रियांना मुळींच पाप लागत नाहीं.

नष्टः प्रव्रजितः क्लीबः पतितो राजकिल्बषी।
लोकान्तरगतो वापि परित्यज्यः पतिः स्त्रिया।
मृते भर्तरि जीवे वा विन्देतापरं पतिम्।
सन्तत्यनाशार्थाय न स्वातंत्रस्तु योषितः॥
अष्टो वर्षाण्युदीक्षेत ब्राह्मणी प्रोषितं पतिम्।
अप्रसूता च चत्वारी ततोऽन्यं समाश्रयेत्।

प्रजाप्रवृत्तौ नारीणां वृत्तिरेषा प्रजापतेः।
अतोऽन्यगमने स्त्रीणामेष दोषो न विद्यते ।। —देवल.

यावरून निरनिराळ्या कारणांकरितां आणि निरनिराळ्या निमित्तावरून पूर्वीच्या काळीं पहिल्या नवऱ्याच्या ह्यातींत दुसऱ्या पुरुषाबरोबर लग्न करून राहण्याचा स्त्रीला हक्क होता हें उघड दिसतें. एकाद्या इमारतीला आग लागावी व त्यांतून कांहीं जिनसा बाहेर काढतां आल्या म्हणून हातीं लागाव्यात, पण किमती आणि भारी जड जिनसा आगीच्या मुखीं पडाव्यात, तद्वतच अधोगतीच्या वणव्यानें घेरलेल्या हिंदु संस्कृतींतील ज्या कांहीं चांगल्या गोष्टी नष्ट झाल्या, त्यांतील घटस्फोटाच्या हक्काची किमती जिन्नस ही एक होती असें म्हणतां येईल. स्मृतिकालीन नीतितत्त्वें लुप्त झालीं आणि ज्या रूढीला स्मृतिकारांनीं फाजील महत्त्व दिलें, त्याच रूढीनें स्मृतिग्रंथांतील तीनचतुर्थांश चांगल्या नीतितत्त्वांना हरताळ फांसला. स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क नसणें हें एक उच्च वर्णीय संस्कृतीचें गमक होऊन बसलें. दुःखी सुवासिनींनाच काय पण विधवांनाहि पुनर्विवाह करण्याची बंदी ह्या रूढीनें केली. विधवांचा पुनर्विवाह १८५७ सालच्या कायद्यानें कायदेशीर ठरला. मात्र घटस्फोट अजून कायद्याला मान्य नाहीं.

**सांप्रतचा कायदा—**

आजचा हिंदु कायदा काय आहे तें आपण पाहूं. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें लग्नविधि हा करार नसून संस्कार आहे. आणि ह्या संस्कार शब्दाच्या पोतडींतून निरनिराळ्या प्रकारच्या उदार अनुदार कल्पनांचा बाजार शास्त्रकारांनीं बाहेर मांडला. लग्नाच्या पावित्र्याचें वर्णन करण्यास संस्कार हा शब्द करार ह्या शब्दापेक्षां उच्च दर्जाचा खरा; पण संस्कार म्हटला कीं तो अभंग असावयाचा आणि उभयतांना तो रद्द करतां यावयाचा नाहीं, हें जें एक उंटाचें पिल्लू त्या मयासुराच्या बाजारांत शब्दछलाच्या जादुगारानें सोडून दिलें तेंच संस्काराच्या पवित्र विधीचे तुकडे पाडूं लागलें. एकवार लग्न झालें मग तें कोणीहि केलेलें असो, कसेंहि झालेलें असो, पतिपत्नी लग्नविधीस लायक असोत वा नसोत, त्यांना वैवाहिक सुख मिळणें शक्य असो अगर अशक्य असो, तें लग्न रद्द होत नाहीं असा हा आजचा कायदा आहे.

आणि ह्या भलत्याच अट्टाहासाला संस्काराच्या कल्पनेनें हात घातल्यामुळें आपली लग्नसंस्था ही खिळखिळी होऊन मोडून पडण्याच्या बेतांत आली आहे. पुरुषांना एकापेक्षां अनेक लग्नें करण्याचा हक्क ज्या आमच्या पवित्र व उदात्त लग्नसंस्कारानें एका हातानें दिला आहे त्याच संस्कारानें दुसऱ्या हातानें स्त्रियांपासून दुसरा पति करण्याचा त्यांचा अधिकार हिसकून घेतला आहे; यामुळें घटस्फोटाची जरूरी पुरुषांच्यापेक्षां स्त्रियांनाच जास्त भासते. बायको आवडत नाहीं एवढ्या क्षुल्लक कारणावरून तिच्या नवऱ्यास एकच काय पण एका मागून एक अशीं अनेक लग्नें करण्याचा हक्क आहे, अशा स्थितींत वैवाहिक सुखाच्या आड येणाऱ्या पत्नीदोषांमुळें तो दुसरें लग्न केल्याशिवाय थोडाच राहणार आहे ? घटस्फोटाचा अभाव स्त्रियांना किती जाचक आहे हें आपण पाहूं. नवरा नपुंसक आहे अशा स्थितींतहि तिला लग्न रद्द करून दुसऱ्याशीं पुन्हां लग्न करण्याचा हक्क असूं नये हा केवढा वेडेपणा आहे ? एके काळीं विवाहित स्त्रीला नवऱ्याव्यतिरिक्त इतर पुरुषांशीं समागम करून प्रजोत्पत्ति करण्याची मोकळीक असे त्या वेळीं नपुंसकाशीं झालेलें लग्न त्याच्या पत्नीस टाळण्याचें कारणच नव्हतें. ती नियोगाची चाल बंद झाली तरी नपुंसक पतीच्या पत्नीला घटस्फोटाची मोकळीक नसावी म्हणजे धर्मशास्त्राला घटस्फोटितेच्या उघड उघड प्रामाणिक पुनर्विवाहित जीवनापेक्षां तिचा गुप्त व्यभिचार संमत आहे असेंच नव्हे का ? बेपत्ता झालेल्या नवऱ्याच्या बायकोनें किती दिवस वाट पाहावी याचाहि नियम नाहीं. एकादा मनुष्य फरारी झाला आहे आणि सात वर्षेपर्यंत निकटसंबंधीं नातेवाइकांना त्याची खबर कळली नाहीं तर पुराव्याच्या कायद्याप्रमाणें तो मेला आहे असें अनुमान निघतें. पण ह्या अनुमानावरून त्याच्या बायकोनें पुनर्विवाह केला तर तो चालणार नाहीं. तिनें आजन्म त्याच्या नांवावर विधवेप्रमाणें दिवस काढले पाहिजेत. नवरा मुसलमान झाला, किंवा ख्रिस्ती झाला व हिंदु धर्मांतून पार उठला तरी हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें त्याच्या पत्नीचें त्याच्याशीं झालेलें लग्न हें तसेंच कायम राहतें. आतां या कारणावरून तिला नवऱ्यापासून स्वतंत्र राहण्याचा हक्क मिळतो खरा, पण त्याच्या हयातींत दुसऱ्याशीं लग्न करूं म्हटलें तर आजचा कायदा तिला आडवा येईल. तिनें आमरण सुवासिनी विधवेचें आयुष्य कंठिलें पाहिजे, ही आपत्ति केवढी भयंकर आहे ? वास्तविक

धर्मांतून जो गृहस्थ उठला त्याचीं धर्मानें उत्पन्न केलेलीं नातींगोतीं नाहींशीं झालीं पाहिजेत. नवरा वेडा असला तरी तिला लग्न रद्द करतां येत नाहीं. कुष्टी अगर रोगी माणसाशीं झालेलें लग्नहि अभंगच ठरतें. नवरा व्यसनी, दुर्गुणी, दुराचारी, निष्ठुर आणि पशुवृत्तीचा असला आणि बायकोच्या जीवितास धोका पोहोंचेल अशा रीतीनें मारझोड करणारा असला तरी त्याच्या बायकोस त्याच्या मगरमिठींतून सुटून जाण्यास कसलाच मार्ग नाहीं. आतां या कारणांमुळें तिला वेगळें राहण्याचा हक्क कायद्यानें दिलेला आहे; पण त्या हक्कावरच स्त्रियांनीं संतुष्ट कां म्हणून राहावें? विषयवासना ही क्षुधेइतकीच तीव्र असून मनुष्याच्या प्रेरक शक्तीची जननी आहे. बऱ्या वाईट गोष्टी, भयंकर घातपात, तसेंच मोठमोठे पराक्रम केवळ या विषयवासनेच्या नादीं लागलेल्या सर्वसामान्य जनांकडून प्रत्यहीं घडत असतात. जीवंत मनुष्याच्या हाडामांसांत विधात्यानें जें हें विषयवासनेचें बीं रोविलें आहे त्याला तृप्त न करितां करपून टाकण्याचा कार्यक्रम समाजरचनेच्या दृष्टीनें अत्यंत घातक आहे. शारीरिक गरजा ज्या आहेत त्यांची मोजदाद घेऊनच मानवी नीतीचीं तत्त्वें घडवावीं लागतात. मनुष्यमात्रास न पाळतां येणारे भलतेच नीतिनियम धर्मग्रंथाच्या पुस्तकांतून लिहून ठेविले तरी त्या नियमांचें पालन त्यांचा भंग करण्यांतच होतें. स्त्रियांना पुरुषांच्यापेक्षां आठपट काम आहे असें म्हणणारेच त्यांची उपासमार करण्यास प्रवृत्त होतात. स्त्रियांच्या मानानें पुरुषाला एक अष्टमांश काम तर त्याला सवलत अनंत स्त्रिया करण्याची. एकंदरींत स्त्रियांच्या दृष्टीनें घटस्फोटाचा अभाव हा अत्यंत जाचक असा नियम आहे. लग्नाचा हेतु, प्रामाणिक वैवाहिक आयुष्यांतर्गत विषयवासनेची तृप्ति करण्याचा असता त्याचाच जर दुष्काळ असेल तर संस्काराच्या पोकळ ढगांकडे पाहून सारा जन्म उपासमारीच्या फुफाटयांत तडफडत काढावा असें म्हणणें कितीसें न्याय्य होईल?

वेड—

आजच्या कायद्याप्रमाणें महत्त्वाच्या पतिदोषांना लग्नविधींत काय महत्त्व आहे तें आपण पाहूं. प्रथम आपण वेडयाचा दाखला घेऊं. लग्नसंस्काराची जबाबदारी आपण स्वीकारून कन्यादान घेत आहोंत, इतकें समज-

पाने ११८
दा. नं. .........
ने. नं. २१/३/२०५

ण्याची तरी पात्रता त्याच्या अंगीं असली पाहिजे, हें उघड आहे. लग्नविधीच्या वैदिक मंत्रांवरून असें म्हणावें लागतें कीं, वैवाहिक जबाबदारीची त्याला नुसती कल्पना असून चालणार नाहीं, परंतु ती जबाबदारी स्वतःचे शिरावर घेतल्याची त्याला कबुली द्यावी लागते. वेडा हा कायद्यानें संमति देण्यास नालायक ठरलेला आहे. तेव्हां तो जर क्षणिक टिकणारे करार करण्यास नालायक असतो तर तो लग्नाची भारी आणि कायम टिकणारी जबाबदारी पत्करण्यास लायक कसा ठरणार ? पण आज कायदा म्हणतो कीं, वेड्यास इतर ऐहिक व्यवहार करण्याची पात्रता नसली तरी त्यास लग्न करण्याचा अधिकार असून त्याच्याशीं झालेलें लग्न कायदेशीरच होय.*

नगर वाचनालय, सातारा.

**नपुंसकत्व—**

तसेंच नपुंसकाचें उदाहरण घेतलें तरी प्रचलित कायद्याप्रमाणें नवरा नपुंसक असला तरी त्याच्याशीं लग्न रद्द होऊं शकत नाहीं.[१] वेडे, नपुंसक अशांची जर ही गति तर पतित, भ्रष्ट, रोगी, व्याधिष्ट अशांशीं झालेलें लग्न थोडेंच रद्द होणार आहे ? टीकाकारांच्या मतानें वेडा, नपुंसक अगर इतर दोषांनीं युक्त अशा पतीच्या पत्नीस दुसऱ्यापासून पुत्र उत्पन्न करण्याची मोकळीक असल्यानें अशा झालेल्या संततीस कुटुंबाच्या मिळकतींत भाग मिळूं शकतो. जीमूतवाहन, मिताक्षरा, विविधचिंतामणि, व्यवहारमयूख, स्मृतिचंद्रिका इत्यादि टीकाकारांचें असें मत आहे. परंतु लग्न कायदेशीर होतें कीं नाहीं आणि वैवाहिक जबाबदारी पार पाडण्याची शक्ति पतीच्या ठिकाणीं आहे किंवा नाहीं याचा विचार न करतां त्याच्या बायकोस झालेल्या मुलांस भाग मिळूं शकतो, या आधारावर असल्या लग्नांचें समर्थन कसें करतां येईल ? पूर्वीं नियोगाची (स्त्रियांनीं परपुरुषाकडून संतति उत्पन्न करण्याची) पद्धति अंमलांत होती त्या वेळीं कदाचित् या नियमाचें समर्थन होण्यासारखें होतें. तरीसुद्धां या नियमाचें प्रतिपालन अनीतिमूलक अशा व्यभिचाराच्या तत्त्वामुळें होत असे; ही गोष्ट त्या नियमांसहि कमीपणा आणणारी आहे. कलि-

---

* दाहीचरण मित्र वि. राधाचरण मित्र २ मो. ९९; नंदलाल वि. तापीदास १ मो. २८७; मधुसूदन वि. जबुदचन्द्र ३ वी. री. १९४.

१. पुरुषोत्तमदास वि. बाई मोती. २१ मुंबई ६१०.

युगांत नियोग वर्ज्य आहे तरी नियोगपद्धतीच्या आधारावर अवलंबून असलेले विवाह आजहि कायदेशीर होतात हें केवढें आश्चर्य आहे ? याशिवाय जास्त काय म्हणणार ? आंधळे, बहिरे, मुके, कुत्सित, रोगी यांना लग्नसंस्कारांत भाग घेतां येत नाहीं; अर्थात् अशांशीं झालेलें लग्न आपोआप निरर्थक ठरत असे. आजचा कायदा अशाच सर्व दोषयुक्त नवऱ्यांना लग्नाचा अधिकार देतो आणि त्यांच्याशीं झालेलें लग्न अभेद्य ठरवितो.[१]

**लग्नसंस्थेच्या मुळावर कुऱ्हाडीचा घाव—**

लग्न वैवाहिक सुखाकरितां करावयाचें तर त्यांत दोघेहि वैवाहिक जबाबदाऱ्या पुऱ्या पाडण्यास शरीरप्रकृतीनें योग्य असले पाहिजेत. अर्थात् नपुंसकास लग्नाचा अधिकार असतां कामा नये आणि त्याच्याशीं झालेलें लग्न हें लग्नच म्हणून समजतां कामा नये. नपुंसकाशीं झालेलें लग्न कायदेशीर धरलें जातें.[२] वास्तविक असें म्हणणें म्हणजे लग्नाच्या मूलभूत कल्पनेचा उपहास करणें होय. विषयवासना तृप्त करण्याचा हेतु लग्नसंस्थेच्या बुडाशीं आहे ही गोष्ट लपविण्यांत अर्थ नाहीं. लग्नसंस्थेची उत्पत्तिच मुळीं स्त्रीपुरुषांच्या स्वैराचारास एकाकी संबंधाचा व्यवस्थित मार्ग आंखून देण्यासाठीं आणि त्या मार्गानेंच स्त्रीपुरुषांच्या विषयवासनेची तृप्ति करण्यासाठीं झालेली आहे. श्वेतकेतु अगर सत्यकाम जाबाल यांपैकीं कोणाचीहि कथा घेतली तरी त्यांतून हेंच तत्त्व निघेल. असें असतां संस्काराचा डांगोरा मोठमोठ्यानें पिटून वैवाहिक सुखास अंतरलेल्या दीन अबलांचा आक्रोश त्याच्या आवाजापुढें दुसऱ्यास ऐकूं जाऊं दिला नाहीं तरी त्यांच्या तळतळाटानें काळवंडलेला लग्नसंस्कार आणखी किती दिवस टिकाव धरील ?

**धर्मांतर—**

धर्मांतराबद्दल तोच निर्दय नियम अंमलांत आहे. धर्मांतरानें लग्नबंधन तुटत नाहीं. पतिपत्नीपैकीं कोणीं धर्मांतर केलें, मुसलमानी धर्म स्वीकारला

१. बाई भूषण वि. भिका कल्याणजी. ५ मुं. हा. री. २०९.
२. पुरुषोत्तमदास वि. बाई मोती. २१ मुंबई ६१०.

नगर वाचनालय, सातारा



तरी त्यांचें लग्न रद्द होत नाहीं, असें आजचा कायदा बजावून सांगतो.[१] तसेंच जातींतून तो पतित झाला तरीसुद्धां त्याचें झालेलें लग्न रद्द समजलें जात नाहीं.[२] मुसलमान अगर ख्रिस्ती झालेल्या गृहस्थाला आपल्या नाखुष हिंदु पत्नीला लग्नबंधनाच्या फासानें परधर्मांत खेंचून नेतां यावें, निदान पक्षीं निराशेच्या खुंटास उपाशी डांबून ठेवतां यावें ही केवढी धर्माची अधोगति आहे ! ज्या हिंदु धर्मामुळें पतिपत्नी असे वैयक्तिक हक्क उत्पन्न झाले, तो धर्मच त्यानें झुगारून दिला तर अर्थात् पूर्वीचीं बंधनेंहि आपोआप झुगारून दिल्यासारखींच होत नाहींत काय ? आणि मग पतिपत्नीसंबंध तरी शिल्लक कसा राहतो ? त्यानें जो परधर्म स्वीकारला त्या धर्मांतील कायद्याप्रमाणें तो वागण्यास बांधलेला आहे. थोडक्यांत म्हणजे त्याचे वैयक्तिक हक्क आणि जबाबदाऱ्या नवीन पत्करलेल्या धर्माप्रमाणें निश्चित होतात. पण या तत्त्वाचाहि सरळ फायदा आमचें हिंदुधर्मशास्त्र परधर्मांत गेलेल्यांच्या बायकांना घेऊं देत नाहीं. एकादा मनुष्य ख्रिस्ती झाला तर त्याला एकीच्या हयातींत दुसरें लग्न करतां यावयाचें नाहीं; अगर बायकोचा त्याग, छळ हेंहि करतां यावयाचें नाहीं. तसें त्याच्या हातून झालें तर त्याच्या ख्रिस्ती बायकोस तावडतोब घटस्फोट मागतां येईल. तो मुसलमान झाला असें आपण मानलें तरी चारापेक्षां जास्त बायका त्याला करतां यावयाच्या नाहींत. परंतु ह्या एकाहि अटीचा फायदा त्याच्या पूर्वीच्या हिंदु बायकोस घेतां येत नाहीं व तिला झालेलें लग्न रद्द करतां येत नाहीं. कारण काय, तर आमचा लग्नसंस्कार अभंग अगर अभेद्य होय. परधर्मांत असेंहि कोठें तत्त्व नमूद केलेलें नाहीं कीं धर्मांतर केलें तरी पूर्वीचे हितसंबंध कायम राहतात. फक्त आमच्याच वेड्या हिंदुधर्मशास्त्रांत हें तत्त्व अभेद्य संस्काराच्या आश्रयानें शिरले आहे. परधर्मीयांचे हिंदुसमाजावर आणि संस्कृतीवर जोराचे हल्ले चढत आहेत, अशा स्थितींत लग्नबंधनें कायम ठेवणें म्हणजे गायीचें दावें आपल्या हातानें कसायाच्या हातीं देण्यासारखें आहे.

---

१. सुंदरी वि. पीतांबर. ३२ कलकत्ता ८७१.

२. गव्हर्नमेंट ऑफ बाँबे वि. गंगा. ४ मुं. ३३०. सरुडतर वि. फातमाबाई. २६ म. ला. ज. २६०.

**सगोत्र: सपिंड--**

सगोत्र वधूवरांचा विवाह हिंदु कायद्याप्रमाणें होत नाहीं. यद्यपि असा विवाह चुकून झाला तर कन्येचें पुनर्लग्न करून देण्याची मोकळीक असे. वसिष्ठानेंच सांगितलें आहे कीं, सगोत्र वराशीं कन्येचा विवाह झाला असेल तर तिला दुसऱ्या वरास देऊन टाकावी.* आजच्या कायद्याला पतीच्या हयातींत विवाहित स्त्रीचें पुनर्लग्न कबूल नाहीं. तेव्हां अर्थात् सगोत्रीं झालेलें लग्नहि रद्द होऊं शकत नाहीं. बरें, कायद्याच्या दृष्टीनें हें लग्न कायदेशीरहि ठरत नाहीं. सगोत्र पत्नी ही भगिनीप्रमाणें होय. तिचा पत्नी म्हणून स्वीकार करतां येत नाहीं म्हणजे ती पत्नी होऊं शकत नाहीं. अशा पत्नीपासून झालेली संतति ही अनौरस ठरते व त्यांना वारसाई हक्कानें मिळकत मिळत नाहीं. हा एक प्रकारचा अन्यायच आहे. लग्न लावणाऱ्या आईबापांच्या अगर पालकांच्या हलगर्जीपणामुळें सगोत्र अगर सपिंड विवाह झाला तर त्याबद्दल विवाहित स्त्रीवर केवढा अनर्थ कोसळतो ? वास्तविक सगोत्र विवाह जर कायदेशीर नाहीं तर तो रद्दच समजला पाहिजे.

**स्त्रियांनाच याचा खास जरूरी—**

वर नमूद केलेल्या आपत्तींत घटस्फोट स्त्रियांना घेतां यावा याचें एक मुख्य कारण आहे. विवाहित स्त्रीस नवऱ्याच्या हयातींत दुसऱ्या पुरुषाशीं लग्न लावतां येत नाहीं. असें लग्न तिनें केलें अगर केल्याचें उघडकीस आलें तर फौजदारी कायद्याप्रमाणें तिला व तिच्याशीं लग्न लावणाऱ्याला कैदेची शिक्षा होते. पुरुषास हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें एकापेक्षां अनेक लग्नें करण्याची मोकळीक आहे, तेव्हां त्याला घटस्फोटाच्या अभावाची आंच लागण्यासारखी नसते. बरें स्त्रीनें, परपुरुषाशीं लग्न न लावितां तसेंच राहावयाचें म्हटलें तरी विवाहित स्त्रीशीं प्रेमसंबंध ठेवणाऱ्या पुरुषाला व्यभिचाराच्या आरोपाखालीं शिक्षा होते. आई घरांत जेवायला घालीत नाहीं, बाप बाहेर भीक मागूं देत नाहीं, अशा प्रकारचा दुहेरी कोलदांडा आपद्ग्रस्त विवाहित स्त्रियांना कायद्यानें टाकलेला असतो.

---

* दत्तामपि हरेत्कन्यां सगोत्राणां तथैवच। —वसिष्ठ.

व्यभिचार--

लग्नविधीचें पावित्र्य स्त्रीपुरुषांच्या एकाकी संबंधावर अवलंबून आहे. हा एकाकी संबंधाचा निर्बंध पति अगर पत्नी या उभयतांना सारख्या तऱ्हेनें घातलेला असला तरच त्याची किंमत. परंतु हा एकाकी संबंध हिंदु-धर्मशास्त्रास फक्त स्त्रियांच्या बाबतींपुरताच मान्य आहे. विवाहित स्त्रीला नवऱ्याच्या हयातींत दुसरें लग्न करतां यावयाचें नाहीं, तसाच परपुरुषाशीं प्रेमसंबंध ठेवतां यावयाचा नाहीं. असा कडक निर्बंध पुरुषांच्यासाठीं मात्र नाहीं. पुरुषाला पहिल्या पत्नीच्या हयातींत अनेक लग्नें एका पाठोपाठ करितां येतात. इतकेंच काय, पण त्याला बेफाम व्यभिचाराच्या चिखलांत मनमुराद लोळतां येतें. आणि या सवलतीचा फायदा पुरुषवर्ग आमच्या पवित्र संस्काराच्या छायेखालीं बसून यथेच्छ घेत आहे. एकाकी संबंधाची पवित्र कल्पना लग्नविधीच्या बुडाशीं असली पाहिजे असा सर्व सुधारलेल्या धर्मांचा उद्देश आहे. या तत्त्वाची कसोटी आमच्या लग्नसंस्कारास लाविल्यास त्याला पवित्रतेचें स्तोम मिरवितां येईल काय ? ख्रिश्चन धर्मानें घटस्फोट मान्य केला त्याबरोबर पाश्चात्य राष्ट्रांत अनीतीचा वर्षाव झाला आहे, असा आपण घटस्फोटाच्या विरुद्ध नेहमींचा एक मुद्दा मांडीत असतों. पण ख्रिश्चन धर्मालाहि एकाकी संबंध हाच मान्य असून त्या संबंधाच्या बाहेरच स्वैराचार हा व्यभिचार गणला जातो. त्यांच्याकडचीं लग्नें थोडा वेळ टिकणारीं असतील, घटस्फोटाच्या सवलतीचा फायदा बारीकसारीक कारणां-वरून घेण्याची प्रत्येकाची इच्छा असेल, परंतु एक गोष्ट कबूल करावी लागेल कीं, विवाहित स्थितींत उभयतांना एकाकी संबंधाचा निर्बंध घातलेला असतो. पत्नीनें परपुरुषाशीं संबंध ठेविला तर तें कायद्यानें जितकें आक्षेपार्ह समजलें जातें, तितकेंच पुरुषानें परस्त्रीशीं संबंध ठेविला तर तें त्याचें करणें गर्हणीय समजलें जातें. दोघांचें पूर्वचरित्र कांहींहि असो, पुढील बेतहि कांहीं असोत, पण पतिपत्नी म्हणून विवाहित स्थितींत ते एकत्र राहात आहेत तोंवर उभय-तांना प्रामाणिकपणानें राहण्याचा दंडक कायद्यानें घातलेला आहे. या नियमाचें पालन कितपत होतें याचा कीस काढीत बसण्यांत अर्थ नाहीं. सांग-ण्याचा मुद्दा इतकाच कीं, पाश्चिमात्यांची लग्नसंस्था ही वस्तुतः आणि तत्त्वतः आमच्या लग्नसंस्कारापेक्षां खात्रीनें अधिक वंदनीय आहे. कायद्यानेंच स्त्री-

पुरुषांच्या हक्कांत पक्षभेद केला आहे. त्यांपैकीं पुरुषास व्यभिचार करण्यास व इतर लग्नें करण्यास आडकाठी नाहीं, अशा समाजाची नीतिमत्ता कोणत्या प्रकारची असेल ? आणि असा पक्षपाती धर्म डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या आम्हां हिंदु लोकांना परकीयांची टवाळी करण्याचा तरी काय हक्क पोहोंचतो ? पुरुषांच्या स्वैर वर्तनावर फक्त फौजदारी कायद्याचें एकच नियंत्रण आहे आणि तें असें कीं त्यानें नवऱ्याच्या बायकोशीं संबंध ठेविल्यास त्याला शिक्षा होते. नवऱ्याची बायको कोणास म्हणावें याबद्दल निर्णय होऊन चुकले आहेत व त्याचा अर्थ असा कीं जिवंत असलेल्या नवऱ्याची बायको. जिचें लग्न झालें नाहीं अशी कुमारिका कोणाचीच बायको नाहीं; जिचा नवरा वारला आहे, अशी विधवाहि पण त्या व्याख्येंत येऊं शकत नाहीं. म्हणजे विवाहित पुरुषानें कुमारिका आणि विधवा यांच्याशीं स्वैर वर्तन केलें तरी कायद्यानें त्याला मुळींच आडकाठी नाहीं. दुसऱ्या विवाहित स्त्रीशीं त्यानें गैर वर्तन केलें तरी त्याला न्यायासनापुढें ओढण्याचा हक्क त्या स्त्रीच्या नवऱ्यास दिलेला असतो आणि त्यानें त्याच्या वर्तनाकडे कानाडोळा केला तर त्याला कसलीच आडकाठी नाहीं. त्याच्या पत्नीस त्याच्या दुराचारास आळा घालतां येत नाहीं, अगर लग्न रद्द करून घेतां येत नाहीं. वैवाहिक पावित्र्य ही अशी कांहीं चीज आहे कीं त्याला परस्थाचा चुकून विटाळ झाला आहे असा नुसता संशय-देखील उभयतांपैकीं कोणा एकाद्याच्या मनांत उत्पन्न झाला, तर तें संशय-पिशाच्च नंदनवनाचें स्मशान बनवितें. पत्नी व्यभिचारी असेल अशा वेळीं पतीचें माथें भणाणून जाईल, तितक्याच तीव्रतेनें पति व्यभिचारी असेल तर त्यांच्यांतील सलोखा नष्ट होऊन दिवसेंदिवस वितुष्ट वाढत जाणार. अशा स्थितींत दुराचारी माणसापासून आपणांस सोडवून घेण्याचा हक्क त्यांना असावा. निदान पक्षीं सध्यांच्या परिस्थितींत व्यभिचारी नवऱ्यापासून काडीमोड करून घेण्याचा हक्क स्त्रियांना असावा, हें उघड आहे. व्यभिचारी वर्तनाचा मक्ता पुरुषांना हिंदुधर्मशास्त्रानें दिलेला आहे. तो त्यांचा एक हक्क आहे असें तरी कोणी पुराणाभिमानी म्हणत नाहींत हें भाग्यच आहे. वास्तविक त्यांनीं वहिवाटीचा हक्क सांगितला तर हजारों वर्षे चालत आलेल्या रूढीचा त्यांच्या म्हणण्यास पाठिंबा मिळेल.

निर्दयता—

याशिवाय पशुवृत्ति आणि छळ करणाऱ्या पुरुषांपासून बायकांना कांहीं कमी यातना भोगाव्या लागत नाहींत ! मारझोड करणें, शिवीगाळ करणें, उपाशी ठेवणें, इत्यादि छळणुकीच्या प्रकारांची उजळणी बऱ्याच ठिकाणीं नेहमीं चाललेली आपण पाहतों. कित्येक वेळेला या छळणुकीचे शेवट खून अगर आत्महत्या यांनीं झालेले आहेत. जगांत प्राणाइतकी प्रिय वस्तु दुसरी कोणतीच नाहीं. प्राणावर बेतेल अशा शारीरिक यातना सहन करणें म्हणजे मनुष्याच्या सहनशीलतेची मर्यादा गांठणें होय आणि ही सहनशीलतेची मर्यादा हिंदु स्त्रियांच्या इतकी कोणीच नेकीनें आजवर गांठलेली नाहीं हें खरें आहे. पण अशा दुर्धर क्लेशांतून त्यांना सोडविण्याचा मार्ग असावा कीं नसावा याचा विचार सहृदयतेनें आणि न्यायानें केला पाहिजे. नवरा क्रूरकर्मी असेल, निष्ठुर असेल, फार काय पण बायकोच्या जिवावर उठलेला असेल, तर तशा पुरुषाशीं तिचा लग्नसंबंध चालू ठेवणें हें केव्हांहि न्याय्य होणार नाहीं. ज्याला दयामाया नाहीं, पत्नी म्हणून नव्हे पण एक मानवी प्राणी म्हणूनसुद्धां बायकोच्या जिवाची वा देहाची जो पर्वा करीत नाहीं, अशा नरपशूच्या तावडींतून स्त्रियांना सोडविणें हें श्रेयस्कर, कीं त्यांना त्याच्या रौरवांत पिचत ठेवणें चांगलें ? नवरा बायकोला मारूं लागला तर तिसरा माणूस मध्यें पडण्यास धजत नाहीं. शिवाय बऱ्याच वेळीं त्यांची मारझोड एकांतांतच होते. जेवढे म्हणून नवऱ्यांनीं बायकांचे खून केलेले आहेत, त्यांतले शेंकडा ९० एकांतांत झालेले आहेत. तेव्हां मारझोड होत असतां तिचा शेवट खुनांत होईतोंपर्यंत बायकोला दुसऱ्या कोणाची मदत मिळणेंहि अशक्य असतें. तेव्हां अशा बिकट परिस्थितींत त्यांनीं हातावर शिर घेऊन नांदावें पण त्या नराधमापासून लग्नसंबंध तोडून त्यांना मोकळें होतां येऊं नये असें बजावून सांगणारें आमचें हिंदुधर्मशास्त्र शीलवान हिंदूंच्यासाठीं लिहिलेला धर्मग्रंथ नसून कसाईखान्याच्या नियमांचें पुस्तक आहे असेंच म्हणावें लागेल. मुक्या जनावरांची पाहिजे तर कत्तल करावी पण त्यांचे जिवंतपणीं हालहाल करतां कामा नये, असा कायद्यानें निर्बंध घातलेला आहे. तेवढासुद्धां निर्बंध हिंदु नवऱ्यावर घातलेला नाहीं. याचप्रमाणें नवरा अघोरकर्मी असेल अगर पशुवृत्ति असेल किंवा मद्यादि व्यसनांनीं बेहोष झालेला

असेल तर तो आपल्या बायकोची जी विटंबना करतो ती पाहणारांसहि पाहवत नाहीं, तर सोसणाऱ्यास कशी सहन होत असेल याची कल्पनाच करावी! अशा पुरुषांशीं सत्त्वशील स्त्रियांनीं कायमचें चिकटून राहणें म्हणजे त्यांनीं स्वतःची अधोगति करून घेण्यासारखें आहे. पति हा परमेश्वर खरा; पण देव झाला म्हणून ज्याच्या त्याच्या दर्जाप्रमाणेंच त्याची पूजा होते ना? आणि चांभाराच्या देवाला खेटरांची पूजा ही म्हण तरी त्याचेंच द्योतक नव्हे कां? पति हा वंदनीय असेल तरच तो परमेश्वर. तो जर साध्या माणुसकीलाहि विसरला असेल तर अशा राक्षसाला परमेश्वर कसें म्हणतां येईल? आणि त्या राक्षसापासून सुटका करून घेणें हें केव्हांहि शास्त्रसंमतच ठरेल.

### निरर्थक लग्न—

वर केलेल्या विवेचनाच्या धोरणानें सूचनांचे दोन विभाग पडतात. ज्या ठिकाणीं खरोखर कायद्याप्रमाणें लग्नच होऊं शकत नाहीं तें लग्न निरर्थक असून तें रद्द करून घेण्याची जरूरी राहात नाहीं. जें लग्न कायदेशीर आहे, तेथें घटस्फोटानें तें रद्द करावें लागेल. तेव्हां लग्न निरर्थक केव्हां समजावें याबद्दलची सूचना अशी कीं—

१. लग्नाच्या वेळीं उभयतांपैकीं कोणी

(अ) रक्तपिती अगर अशाच कुत्सित रोगानें पीडित असेल,

(आ) बहिरें, मुकें, आंधळें, भ्रांतचित्त, वेडें अगर पतित असेल,

(इ) दुसऱ्याचे सगोत्रज अगर सपिंड अगर नजीकचे नात्याचें असेल, आणि ह्या गोष्टी समजूनसुद्धां उभयतांनीं तें लग्न मान्य ठेविलें नसेल तर अगर

२. तें लग्न कपटानें-बळजबरीनें घडवून आणिलें असेल तर तें लग्न कायद्यानें निरर्थक समजलें जावें.

जें लग्न निरर्थकच आहे तें रद्द ठरवून घेण्याचें कारणच नाहीं. जें लग्न इतर रीतीनें कायदेशीर समजलें जाईल, असलेंच लग्न रद्द करून घेण्याची जरूरी आहे. तेव्हां घटस्फोटाबद्दल खालीलप्रमाणें सूचना करितां येईल कीं—

१. पति नष्ट झाला असेल म्हणजे सात वर्षेपर्यंत नापत्ता झाला असेल,

२. साधु अगर संन्याशी झाला असेल,

३. पतित झाला असेल, म्हणजे त्यानें परधर्म स्वीकारला असेल,

४. निर्दयपणें वागत असेल,

५. पत्नीचा त्यानें योग्य कारणांखेरीज तीन वर्षांपेक्षां जास्त मुदतीपर्यंत त्याग केला असेल,

६. व्यसनी असून वैवाहिक जबाबदारी पुरी पाडण्यांत असमर्थ झाला असेल,

७. पशुवृत्ति असेल,

८. व्यभिचारी असेल, (व्यभिचार याची व्याख्या अशी : स्वतःच्या पत्नीखेरीज दुसऱ्या कोणत्याहि स्त्रीशीं संबंध ठेवणें व्यभिचार समजला जावा.)

९. नपुंसक असेल,

तर पत्नीला त्याच्याशीं झालेलें लग्न रद्द करून घेण्याचा हक्क असावा.

पहिलें लग्न रद्द करून घेतल्यावर स्त्रीला पुनर्लग्न करण्याचा अधिकार असावा.

वरील सूचना बडोद्याच्या घटस्फोटाच्या कायद्याच्या अनुरोधानें केली आहे. लग्न रद्द करण्यासाठीं फिर्याद कशी असावी, कोणापुढें काम चालावें, पंच नेमावे आणि दारें लावून काम करावें, स्त्रीला कायमची अगर उचक नुकसानी म्हणून रक्कम किती बांधून द्यावी, वगैरे मुद्दे तपशिलाचे आहेत; परंतु त्यांची चर्चा येथें करण्याचें कारण नाहीं. ज्यांना त्याबद्दल जास्त माहिती पाहिजे असेल त्यांनीं बडोदें राज्यांत नुकताच अंमलांत आलेला घटस्फोटाचा कायदा पाहावा.

# प्रकरण ५ वें

# बहुपत्नीकत्व

## एकाकी लग्नसंबंध—

अनेक बायका करण्याची पुरुषाला जी कायद्यानें मोकळीक दिली आहे, तिचें थोडेंफार दिग्दर्शन यापूर्वी केलेलेंच आहे. स्त्रीपुरुषसंबंध वैवाहिक बंधनानें शाश्वत व्हावा ही एक सामुदायिक नीतीच्या उत्क्रांतीची वरची पायरी तर खरीच; पण तिच्याहि वरची पायरी स्त्रीपुरुषसंबंध एकाकी असावा ही होय. बहुपतिकत्व आणि बहुपत्नीकत्व हे दोन्ही प्रकार लग्न-संस्थेच्या स्थापनेनंतर थोड्या फार प्रमाणांत मनुष्यजातीच्या रानटी अवस्थेंत निरनिराळ्या समाजांतून प्रचारांत होते. पण एकपतिकत्व आणि एकपत्नी-कत्व म्हणजे स्त्रीपुरुषांचा एकाकी संबंध असणें ही वैवाहिक घटनेचीं अंतिम ध्येयें म्हणून आजच्या सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं मान्य केलीं आहेत व बहु-पतिकत्व आणि बहुपत्नीकत्व हे दोन्ही प्रकार सारखेच दंडनीय ठरविण्यांत आले आहेत.

मुसलमानी धर्मांत एका वेळीं जास्तींत जास्त चार बायका एका पुरु-षाला करतां येतात. पण ह्या सवलतीसहि तुर्कस्थानसारख्या मुसलमानी राष्ट्रानेंच थप्पड मारून मुसलमानी कायद्यास एकपत्नीकत्वाच्या मार्गावर आणून सोडलें. एका पुरुषास एका वेळीं एका स्त्रीचा पत्नी म्हणून स्वीकार करतां येईल व एका स्त्रीस एका वेळीं एकाच पुरुषास पति म्हणून वरण्याची मोकळीक असेल, यालाच एकाकी लग्नसंबंध म्हणून संबोधतां येईल. लग्न-संबंध मोडून टाकल्यास त्यांपैकीं कोणास दुसऱ्याशीं लग्नसंबंध करतां येईल, नाहीं असें नाहीं. पण जोंपर्यंत लग्नसंबंध कायद्याप्रमाणें रद्द करून घेतलेला नाहीं तोंपर्यंत त्यांच्यापैकीं कोणालाच दुसरें लग्न करतां येत नाहीं. ही नैतिक उन्नतीची कसोटी जर प्रचलित हिंदुधर्मशास्त्रास लावली तर काय दिसेल बरें ? बहुपत्नीकत्वाच्या कलंकानें काळवंडलेली आमची विवाहसंस्था परधर्मीयांच्या विवाहसंस्थांपुढें हिणकस दिसेल, नव्हे टाकाऊ भासेल. ज्यानें विवाहसंस्था

निर्माण केली त्या श्वेतकेतूनें पुरुष आणि स्त्री या दोघांनाहि एकाकी संबंधाचा सारखाच नियम घालून दिलेला आहे. पण हिंदुसमाजाची जी अवनति झाली त्या अवनतीच्या काळीं त्यानें केवळ राजकीय जरूरीमुळें बहुपत्नीकत्वाची चाल अनार्य लोकांपासून उचलली असावी असें कांहींचें म्हणणें आहे.

## पूर्वी एकपत्नीकत्व होतें—

पूर्वी एक पत्नी हयात असतांना दुसरें लग्न करणें हा गुन्हा समजला जात असे. नारद म्हणतो, आज्ञाधारक, प्रिय भाषण करणारी, सुग्रण, पतिव्रता व पुत्रवती अशा भार्येस सोडून जो दुसरीशीं लग्न करतो त्याला राजानें कडक शिक्षा करावी.

अनुकूलामनाग्दुष्टां दक्षां साध्वीं प्रजावतीम् ।
त्यजन् भार्यामवस्थाप्यो राजा दण्डेन भूयसा ॥

दुसरें लग्न करणारानें पहिल्या बायकोस विविक्षित मिळकत द्यावी असा नियम याज्ञवल्क्यानें घालून दिला. तो म्हणतो, आज्ञाधारक, प्रिय बोलणारी, दक्ष व पुत्रवती अशा भार्येचा जो त्याग करतो त्याच्याकडून राजानें मिळकतीपैकीं तिसरा हिस्सा तिला देववावा. पण तो निर्धन असेल तर त्याजकडून अन्न-वस्त्र देववावें.

आज्ञासंपादिनीं दक्षां वीरसूं प्रियवादिनीम् ।
त्यजन् दाप्यस्तृतीयांशमद्रव्यो भरणं स्त्रियः ॥

या दोन वचनांवरून योग्य कारणांवांचून पहिल्या भार्येस टाकून देणें शास्त्रास संमत नव्हतें असें दिसतें. प्रजोत्पादन करून जात जिवंत ठेवण्याचा उद्देश प्रत्येक देशांतील लग्नसंस्थेच्या बुडाशीं असतो. आणि पहिली बायको जिवंत असतांना दुसरें लग्न करण्याची मोकळीक हिंदुधर्मशास्त्रानें प्रथमतः या कारणासाठींच ठेवलेली असावी. मनूच्या मताप्रमाणें वांझ स्त्रीची आठ वर्षें, मुलें होऊन मरणाऱ्या स्त्रीचीं दहा वर्षें, केवळ मुली होणाऱ्या स्त्रीचीं अकरा वर्षें वाट पाहून पतीनें दुसरें लग्न करावें. तशांत पुत्ररहित असून ती जर कजाग असेल तर तिचा तत्काळ त्याग करावा.

वन्ध्याष्टमेऽधिवेद्याब्दे दशमे तु मृतप्रजा ।
एकादशे स्त्रीजननीं सध्यस्त्व प्रियवादिनी ॥

आपस्तंब लिहितो, धर्मकृत्यांत दक्ष अशी पुत्रवती भार्या असतांना पुरुषानें दुसरा विवाह करतां कामा नये. पण तिच्यांत कांहीं न्यून असेल तर त्यानें ताबडतोब दुसरा विवाह करावा.

धर्मप्रजासंपन्ने दारे नान्यां कुर्वीत ।
अन्यतराभावे मत्या प्राग्न्याध्येयात् ।। आ. ।।

विवाहानें उभयतांच्या सुखाची वृद्धि व्हावयाची त्याच्या उलट जर तापच होऊं लागला तर अशा तापदायक भार्येशीं आमरण झुंजत आयुष्य कंठिलें पाहिजे असला कडक आणि अशक्य नीतिनियम स्मृतिकारांनीं घालून दिला नव्हता, म्हणून दुसरें लग्न करण्यास योग्य अशीं कारणें त्यांनीं दिलीं आहेत. मनु म्हणतो, मद्य पिणारी, दुष्टाचरणी, पतीच्या मर्जीविरुद्ध वागणारी, रोगी, खराब व ऐपतीबाहेर खर्च करणारी भार्या असेल तर पुरुषानें दुसरा विवाह करावा. स्त्री रोगी आहे परंतु पतीच्या विरुद्ध वागत नाहीं, शील शुद्ध ठेवते असें असल्यास तिच्या परवानगीनेंच पतीनें दुसरा विवाह करावा व तिचा कधींहि अपमान करूं नये. याप्रमाणें अडीअडचणीमुळें पतीनें दुसरा विवाह केल्यानें जर स्त्री रागानें घर सोडण्यास तयार होईल तर तिला नवऱ्यानें मोडता घालावा किंवा माहेरच्या माणसांना बोलावून त्यांच्या स्वाधीन तिला करावें. याज्ञवल्क्याचेंहि मत असें आहे कीं, भार्या, मद्यपी, रोगी, विरुद्ध वागणारी, वांझ, उधळी, कजाग, कन्याप्रसवा अगर नवऱ्याचें अहित करणारी असेल तर पुरुषानें दुसरें लग्न करावें.

सुरापी व्याधिता धूर्ता वन्ध्याऽर्थघ्न्य प्रियंवदा ।
स्त्री प्रसूता श्वाधिवेतव्या पुरुषद्वेषिणी तथा ।
मद्यपासाधुवृत्ता च प्रतिकूला च या भवेत् ।
व्याधिता व्याधिवेतव्या हिंस्रार्थघ्नी च सर्वदा ।
या रोगिणी स्यात्त हितासंपन्ना चैव शीलतः ।
सानुज्ञाप्याधिवेतव्या नावमन्या हि कर्हिचित् ।
अधिविन्ना तु या नारी निर्गच्छेद्रुषिता गृहात् ।
सा सद्यः सन्निरोद्धव्या त्याज्या वा कुलसंनिधौ ।। —मनु.

तथापि प्रथम भार्येचा आदरसत्कार ठेवावा असेंहि सांगितलें आहे.

अधिविन्ना तु भर्तव्या महदेनोऽन्यथा भवेत् ।
यत्रानुकुल्यं दम्पत्योस्त्रिवर्गस्तत्र वर्धते ।।

पहिल्या भार्येचें मानसन्मानानें पूर्ववत् पालनपोषण करावें, नाहीं तर मोठें पाप लागतें. पतिपत्नीचें चित्तैक्य असेल अशा ठिकाणींच धर्मार्थ कामाची अभिवृद्धि होत असते. गुणवती भार्येचा त्याग करणारास दण्ड होत असे. 'तत्र भर्तुः सगुणपत्नीत्यागे दण्डमाह' असें व्यवहारमयूख म्हणतो. केवळ कामार्थ दुसरें लग्न करणारे पुरुषहि त्या काळीं कांहीं कमी नव्हते; पण त्यांच्यावरहि थोडेंबहुत कायद्याचें नियंत्रण होतेंच. केवळ कामार्थ दुसरी भार्या करूं इच्छिणाऱ्या पुरुषानें पहिल्या भार्येस द्रव्य देऊन संतुष्ट करावें व नंतर दुसरीशीं विवाह करावा असें देवल ऋषींचें मत आहे.

एकामुत्क्रम्य कामार्थमन्यां लब्धुं यदिच्छति ।
समर्थस्तोषयित्वाऽर्थैः पूर्वोढामपरां वहेत् ।। —देवल.

दुसऱ्या लग्नाच्या वेळीं पहिल्या भार्येस द्रव्य द्यावें असें याज्ञवल्क्याचेंहि मत आहे. स्त्रीधन मिळालेलें नसेल तर पहिल्या भार्येस दुसऱ्या लग्नाच्या निमित्तानें होणाऱ्या खर्चाच्या बरोबरीनें पैसे द्यावेत. स्त्रीधन मिळालेलें असेल तर त्याच्या निम्मे द्यावें.

अधिविन्नस्त्रियै दद्यादाधिवेदनिकं समम् ।
न दत्तं स्त्रीधनं यस्यै दत्ते त्वर्धं प्रकीर्तितम् ।।

स्मृति-चन्द्रिकेंत असें म्हटलें आहे कीं, शास्त्रांत सांगितलेल्या कारणांवांचून केवळ मोहानें जो आपल्या भार्येचा त्याग करितो तो धर्मकार्याचा आणि पुत्रसंतानाचा त्याग करतो; आणि त्याच्या ह्या पापाचें क्षालन होत नाहीं. या लोकींहि राजानें त्याला चोराप्रमाणें शासन करावें. विष्णूनेंहि निर्दोष भार्येस टाकून देणारास चोराप्रमाणें दंड सांगितलेला आहे. शास्त्राप्रमाणें ज्या दोषामुळें पत्नीचा त्याग करतां येतो असे दोष जिच्यांत नाहींत, तिचा त्याग करणारांस चोराप्रमाणें शिक्षा करावी असा अर्थ उघड होतो. यावरून गुणवती भार्येचा त्याग करणारास जबर शिक्षा करून जर्जर करावें आणि त्याच भार्येबरोबर संसार करण्यास त्याला भाग पाडावें.

तत्र देवलः स्वदारांस्त्यज्यतो मोहान्नरस्यान्यायामोचिनः । धर्मवंशपरित्यक्तुर्निष्कृतिर्न विधीयते । शास्त्रोक्तत्यागहेतून् विनैव यो मोहादिना

स्वयं त्यजति तस्यान्यायेन स्वदारमोचिनस्तन्मोचद्वारेण तथा सहत्रिदित श्रौतस्मार्तादि धर्मस्य तस्यामुत्पाद्य संतानस्य च त्यक्तुर्दुष्कृतनिष्कृतिर्नास्तीत्यर्थः। इह लोकेऽपि तस्य राज्ञा चोरवद्दण्डनं कार्यम्। तथा च चोरवच्छास्य इत्यनुवृत्तौ विष्णुः "निर्दोषायां परित्यजन्पत्नीं च" इति। त्यागहेतुभूतदोषरहितां भार्यां परित्यजन्नपि चोरवद्दण्डय इत्यर्थः। गुणवतीं पुनः परित्यजन्महता दण्डेन वशीकृत्य तस्यामेव भार्यायामवस्थायाः॥

याप्रमाणें पूर्वीच्या काळीं पुरुषांनीं अनेक लग्नें करण्याच्या प्रघातावर कायद्यानें नियंत्रणें घातली होतीं.

## आजची स्थिति—

आज अनेक बायका करण्याऱ्या पुरुषांच्या हक्कांवर दारिद्र्याशिवाय कसलेंच नैतिक अगर कायद्याचें नियंत्रण राहिलें नाहीं. पूर्वी कारणावांचून दुसरें लग्न करणाऱ्या पुरुषास शिक्षा भोगावी लागत असे. आज एक बायको असतांना दुसरी बायको करणें हा फौजदारी कायद्यानें गुन्हा होत नाहीं; उलट हिंदुधर्मशास्त्रास तें संमत आहे असें सिद्ध झालें आहे. पतीच्या हयातींत दुसरें लग्न करणाऱ्या स्त्रीला आज शिक्षा ठेवलेली आहे. अनेक बायका करण्याचा हक्क पुरुष कांहीं कारण नसतांना अगर क्षुल्लक कारण असतांना बजावतो. कोणाला पहिली बायको पसंत नाहीं, तर कोणाला अधिक रूपवती भार्या असावी अशी इच्छा होते, कोठें सासूला सून पसंत नाहीं म्हणून, तर कोठें लग्नांतील भांडणांचा सूड घेण्यासाठीं म्हणून, कोठें अशिक्षित म्हणून, तर कोठें तिच्या वर्तनाबद्दल खोट्या कंड्या पिकल्या म्हणून, कोठें दुरुत्तर करते असें वाटून तर कोठें नवऱ्याच्या तंतोतंत आज्ञेंत राहात नाहीं म्हणून, अशा अगदीं क्षुल्लक कारणांवरूनहि एक पत्नी हयात असतां दुसरीशीं लग्न केल्याचीं उदाहरणें वाटेल तेवढीं सांपडतात. गुलामांच्या संख्येवरून मालकाची प्रतिष्ठा तर बायकांच्या संख्येवरून पुरुषांचा बडेजाव जुन्या काळीं ठरविण्यांत येत असे. जुन्या पिढींत हा अनेक लग्नें करण्याचा नाद विशेष होता. तथापि अनेक बायका करणें हा एक शोकाचा प्रश्न असल्यानें अनेक गायींचा सांभाळ करणाऱ्या हौशी गोपाळाप्रमाणें जुनी-नवी दोघींचाहि सारख्याच आस्थेनें सांभाळ होत असे.

दोघींचेहि संसार होत असत. पण आज एकीस टाकून दुसरी करण्याचा सपाटा चाललेला दिसतो. पतिपत्नीसंबंध एकाकी असला पाहिजे. पति-प्रेमाची विभागणी आवडती नावडतीच्या झगड्यांत कोणाच्या वांट्यास येईल हें निश्चित नसल्यामुळें पतिप्रेमाच्या भरतीओहोटीकडे चातकाप्रमाणें दृष्टि लावून बसण्याची वेळ पत्नीवर यावी यासारखी उद्वेगकारक आणि अप-मानास्पद दुसरी कोणती गोष्ट असणार? अगणित जीवांनीं ह्या सवति-मत्सराच्या होमकुंडांत आपल्या प्राणांच्या आहुती दिल्या आहेत तर बाकीच्यांवर आत्महत्या करण्याचें धैर्य न झाल्यामुळें पश्चात्तापांत आयुष्य कंठण्याची पाळी आली आहे. बायकोला वाटेल तेव्हां आणि कांहीं कारण नसतांना टाकून देऊन दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करण्याची जी मुभा पुरुषांना कायद्यानें दिलेली आहे त्यामुळें तिच्या गृहसौख्यावर या अरिष्टाची तरवार सारखी लटकत राहिलेली असते. आणि अशा लटकत्या तरवारीखालीं अहर्निश वावरणाऱ्या स्त्रिया कितीशा धीट राहणार? गृहकृत्यांत अगर दुसऱ्या व्यवहारांत स्त्रियांना आपलें मतहि जोरानें पुढें मांडतां येत नाहीं. दुर्गुणी पतीस आळा घालतां येत नाहीं, स्वतःची व मुलाबाळांची लाजहि रक्षण करतां येत नाहीं. या सर्व भित्रेपणाच्या पाठीशीं पुरुषांच्याजवळ असलेली त्यागाच्या अमोघ शक्तीची पडछाया भुताप्रमाणें वावरत असते.

जुनी पिढी अशिक्षित होती खरी; पण ती लोकनिंदेच्या दडपणाखालीं दडपलेली असे. पत्नीस टाकून दिल्याचे प्रकार घडले तरी वडिलधाऱ्या व सोयऱ्याधायऱ्यांच्या मध्यस्थीनें त्यांचे संसार होत असत. अविभक्त कुटुंबांत निरनिराळ्या प्रकृतीच्या व्यक्ती इतक्या दाटीनें कोंबलेल्या असत कीं, त्यांच्या आवडीनिवडीचा चोळामोळाच होऊन जात असे. कर्त्याच्या करड्या हुकमतीखालीं वाघ आणि शेळी हीं धाकानें दूध पीत, कालांतरानें द्वेष विसरत, आणि शेवटीं परस्परांचे सहधर्मचारी होत. नवीन पिढी स्वतंत्र विचारानें हेकेखोर बनली आहे. शिक्षणानें आणि अनुकरणानें त्यांच्या आवडीनिवडी भलत्याच थराला जाऊन पोहोंचल्या आहेत आणि त्या सर्वच परिपूर्ण होण्या-सारख्या नसतात. तेव्हां ते कोणत्या क्षुल्लक कारणांवरून भार्येचा त्याग करतील हें सांगतां येत नाहीं. तिच्याशीं संसार तरी ते पुन्हां करतील कीं नाहीं हें भविष्य करणेंहि धोक्याचें होऊन राहतें. या विषयाबद्दल विस्तृत लिहा-

वयाचें तर तो एक मोठाच ग्रंथ होईल. एवढें थोडक्यांत नमूद करतों कीं, कित्येक चांगले शिकलेले, परदेशांत जाऊन पावन होऊन आलेले, लठ्ठ पगारावर पोसलेले प्रतिष्ठित गृहस्थ पहिली भार्या जिवंत असतांना दुसरीं लग्नें करून राहिलेले आहेत. ही परिस्थिति कशामुळें उत्पन्न झाली बरें? बहुपत्नीकत्वाचें पाप हें व्यभिचाराच्या पापापेक्षांहि जास्त गर्हणीय आहे. आतां बहुपत्नीकत्वाच्या रूढीखालीं दडपून गेलेल्या मंद हिंदु लोकांना हें आमचें म्हणणें चमत्कारिक वाटेल. पण पुरुष दुराचारी असला तरी सहसा तो ठेवलेल्या दुसऱ्या बाईस घरांत घेऊन येत नाहीं. आणि चोवीस तास घरीं राहण्यास कुलटांना आणलेल्यांचीं उदाहरणें क्वचित् असतात. तेव्हां दुराचारी पुरुषाच्या पत्नीला घरांत असा जाच अगर मानखंडना अनुभवावी लागत नाहीं. त्याच्या उलट घरांत सवत आली कीं पदोपदीं तिला अपमानाचे प्रसंग येतात आणि तिच्या आवडीनिवडीच्या लहरीनें नवरा वागणारा असला म्हणजे तर तिच्या दैन्यास पारावारच नसतो. दुराचारी पुरुष तारुण्याचा आणि पैशाचा जोर ओसरल्यावर पत्नीसमवेत संसार करूं लागतो तर दुसऱ्या बायकोशीं लग्न लावलेला पुरुष पत्नीच्या हातांतून कायमचाच निसटतो. सापत्नभाव, भाऊबंदकी, ' माझं तुझं ' ह्यांची कीड कुटुंबाला पोखरून टाकते तें निराळेंच. एकंदरींत बहुपत्नीकत्वाची चाल जेवढी लवकर बंद होईल तेवढी जरूर आहे. तथापि आजच या रूढीचें समूळ उच्चाटण होणें शक्य नाहीं. स्त्रियांच्या हक्काला जेवढा पुरुषांनीं विरोध केला नसेल तितका विरोध ही चाल बंद करण्याच्या मागणीला पुरुषांकडून होईल.

तेव्हां ही गोष्ट लक्षांत घेऊन अशी सूचना करावीशी वाटते कीं, एका भार्येच्या हयातींत पुरुषास खालीं नमूद केलेल्या कारणांशिवाय दुसरें लग्न करण्याचा हक्क नसावा. असें लग्न केल्यास तें गैरकायदेशीर समजावें. तसेंच तें घटस्फोट मिळविण्याचें एक कारण समजण्यांत यावें.

(अ) पहिल्या पत्नीच्या संमतीनेंच दुसरें लग्न करावें व

(१) तें तिला वयांत आल्यानंतर मूल झालेलें नसेल,

(२) स्त्री रोगानें अगर शारीरिक व्यंगानें संसार करण्यास कायमची निरुपयोगी झाली असेल तर,

(आ) स्त्री दुर्वृत्त असेल, कर्कशा असेल पतीचें अनहित करीत असेल तर,

नगर वाचनालय, सातारा



(इ) पहिल्या बायकोस योग्य कारणानें फारकत दिलेली असेल अगर तिनें मिळविली असेल तर.

पहिल्या पत्नीच्या पोटापाण्याचा बंदोबस्त पतीनें योग्य रीतीनें केला असला पाहिजे. पत्नीची संमति ही स्वतंत्र आणि निःपक्षपाती असणें जरूर आहे. पतिव्रताधर्मानें भारलेल्या आमच्या बायका पतीची लहर पुरी करण्यासाठीं स्वतःच्या रक्ताचा अर्घ्यसुद्धां देतील; तेव्हां संमति मिळविणें पुरुषांना फारसें कठीण होणार नाहीं.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

---

## प्रकरण ६ वें

# कन्येचे आर्थिक हक्क

### विवेचनाचे भाग—

स्त्रियांच्या आर्थिक हक्कांचा विचार करतांना विषयाचे दोन भाग प्रथमतः पडतात. एक अविवाहित आणि दुसरी विवाहित, अशा दोन अवस्था स्त्रियांना असतात. अविवाहित स्त्री म्हणजे (१) कन्या होय. विवाहित स्त्रियांत (१) सुवासिनी आणि (२) विधवा अशा दोन अवस्थांचा समावेश होतो. यांशिवाय वारसा हक्क, स्त्रीधन आणि भरणपोषणाचा हक्क, असे इतर विभागहि या विषयाचे करावे लागतील. तूर्त आपण कन्येबद्दल विचार करूं.

### कन्या—

कन्या या शब्दाचा अर्थ कायद्याच्या दृष्टीनें काय होतो तें पाहूं. मातापितरांच्या अगर जन्मदात्या कुटुंबाच्या दृष्टीनें जेव्हां एकाद्या स्त्रीच्या हक्कांचा विचार करावयाचा असतो त्या वेळीं कायद्यांत तिला कन्या म्हणून संबोधितात. मग ती स्त्री विवाहित असो अगर विधवा असो; ज्या कुटुंबांत ती जन्मली त्या कुटुंबाची ती कन्याच होय. तेव्हां आतां कन्येचे हक्क काय काय आहेत तें पाहूं.

### कन्येचे आजचे आर्थिक हक्क—

अविवाहित कन्येचें भरणपोषण करण्याची जबाबदारी कुटुंबावर असते. तसेंच तिचें लग्नहि कुटुंबाच्या मिळकतींतून आणि खर्चानें व्हावयाचें असतें. फार काय पण मुलीच्या लग्नखर्चासाठीं कुटुंबाची मिळकतहि विकणें ग्राजवी समजलें जातें. कुटुंबाच्या नांवलौकिकाप्रमाणें खर्च व्हावयाचा असतांहि लग्नखर्च किती करावा याविषयीं निश्चित धोरण ठरलेलें नसतें. लग्न झाल्यानंतर तिचें भरणपोषण करण्याची जबाबदारी तिच्या सासरच्या कुटुंबावर पडते. सासरची अत्यंत हलाखी असली व माहेरची संपन्न स्थिति

असली तरीसुद्धां तिला माहेरच्या मिळकतींतून अन्नवस्त्रहि मिळूं शकत नाहीं, मात्र बंगालमध्यें अन्नवस्त्र मिळतें. तिचे वडील अविभक्त असतील तर त्यांची सर्व इस्टेट त्यांचे इतर बंधु अगर पुतणे वारसाहक्कानें घेतात, व ते विभक्त असतील आणि त्यास मुलगे असतील तर मिळकत मुलांकडे जाते. विभक्त स्थितींत निपुत्रिक पित्याच्या मरणानंतर आणि मुलीची आई हयात नसेल तर मुलीला वडिलांच्या इस्टेटीचा वारसा मिळतो. आई हयात असेल तर तो तिच्या हयातीनंतर मिळतो. ती अविवाहित असेल आणि तिचे भाऊ वडिलांच्या इस्टेटीची वांटणी करीत असतील तर एका भावाचा चौथा हिस्सा मिळकत तिला लग्नखर्चाबद्दल म्हणून मिळण्याचा हक्क आहे. मुंबई इलाख्यांत मुलीला मिळणाऱ्या इस्टेटीवर तिचा संपूर्ण हक्क असतो. पण बाकीच्या सर्व प्रांतांत तिचा हक्क मर्यादित समजला जातो. मर्यादित हक्क म्हणजे काय याचें विवेचन पुढें येणार आहे.

**ऐतिहासिक समालोचन—**

वैदिक काळीं कन्या आणि पुत्र यांचे हक्क सारखेच होते. अविवाहित मुलीला स्वतःचा हिस्सा वांटणी करून मागण्याचा हक्क होता असें ऋग्वेदाच्या एका ऋचेवरून म्हणण्यास आधार मिळतो. हे इंद्रा, आईबापांपाशीं राहणारी मुलगी ज्याप्रमाणें वडिलांच्या कुटुंबांतून आपल्या हिश्शाची मिळकत मागून घेते—वगैरे.

अमाजूरिव पिता सचा सती समानादा सदस्तामिये भगम्। —ऋ. २–१०.

मुली आजन्म अविवाहित राहात असत आणि जोंपर्यंत त्या अविवाहित राहात तोंपर्यंत त्यांना कुटुंबाचे अगदीं पुरुषांप्रमाणें घटक समजून वांटणींत त्यांना हिस्सा मिळत असे. नारद म्हणतो कीं, वडील मुलाला मोठा हिस्सा आणि सर्वांत धाकट्याला लहान हिस्सा द्यावा. बाकीच्या मुलांना आणि त्यांच्या अविवाहित बहिणींना सारख्या हिश्शानें मिळकत वांटून द्यावी.

जेष्ठस्यांशोऽधिको देयः कनिष्ठस्यावरः स्मृतः।
समांजसमाज शेषाः स्युरदत्ताभगिनी तथा॥ —नारद.

विष्णुहि त्याचप्रमाणें अभिप्राय देतो. तो म्हणतो, आयांना मुलांच्या बरोबरीनें भाग मिळावा आणि त्याचप्रमाणें अविवाहित बहिणींनाहि मिळावा.

मातरः पुत्रभागानुसारिणः भाग हारिण्यः। अनूढाश्च दुहितरः। —विष्णु.

मुलींना मिळणारा भाग मुलांच्या बरोबरीनें असावा कीं कमी असावा असा वाद नंतर उपस्थित झालेला दिसतो आणि शेवटीं मुलीला मुलाच्या चौथा हिस्सा भाग मिळावा असा नियम मनु आणि याज्ञवल्क्य यांनीं घालून दिलेला आहे.

स्वेभ्यांऽभ्यस्तु कन्याभ्यः प्रदद्युर्भ्रातरः पृथक्।
स्वात्स्वादंशाच्चतुर्मागं पतिताः स्युरदित्सवः ॥ —मनु.
तदभावे तु जननी तनयांशसमांशिनी ।
समांशा मातरस्तेषां चतुर्थश्च कन्यकाः ॥ —याज्ञवल्क्यः

कन्येचें लग्न होईपर्यंत जन्मदात्या कुटुंबांत ती कुटुंबाचा एक घटक म्हणून समजली जात असे, आणि लग्नानंतर ती नवऱ्याच्या कुटुंबाचा घटक म्हणून समजली जाई. मेधातिथीनें दिलेलें शास्त्रवचन याच अर्थाचें आहे. तें असें कीं, "लग्न होईपर्यंत मुलगी अगर भगिनी हिला भाग मिळतो; लग्नानंतर तिच्या नवऱ्यानें तिचें पोषण करावयाचें असतें.

आसंस्कारादृहरेद्भागं परतो विभृयात् पतिः।

कन्येला मिळणारी मुलाच्या चौथ्या हिश्शाची मिळकत ही तिला वास्तविक पाहतां कुटुंबांत जन्म घेतला या अधिकारानेंच मिळत असे. मुलांत आणि मुलींत हिस्से कमीजास्त असतांनाहि हक्काच्या स्वरूपाच्या दृष्टीनें समता होती. वडिलार्जित मिळकतींत उभयतांनाहि केवळ जन्मानें आणि जन्मापासून मालकी हक्काचा अंश प्राप्त होत असे. परंतु प्रतिगामी विचाराच्या वावटळीनें कन्येच्याहि हक्काला घेरलें. मुलीला जो चौथा हिस्सा मिळकत मिळावयाची ती लग्नखर्चाबद्दल मिळावयाची असते असा वाद नवीनच सुरू झाला.

विज्ञानेश्वरानें आपल्या मिताक्षरी ग्रंथांत या वादाचा खरपूस समाचार घेतला आहे. त्याचा सारांश येथें देणें अवश्य वाटतें. कारण विज्ञानेश्वरानें चुकीचें ठरविलेलें तत्त्व आज कायद्याचें कलम झालें आहे. तो सारांश असा—"मुलींनाहि पित्याच्या मरणानंतर त्याच्या मिळकतींत भाग मिळतो. तिला भावाच्या चौथा हिस्सा मिळकत मिळते, या वाक्यांतील 'चौथा हिस्सा' या शब्दाचा अर्थ लग्नखर्चापुरतें द्रव्य असा लावणें चुकीचें आहे. अशा कर-

ण्यानें चौथा आणि हिस्सा हे दोन शब्दप्रयोग निरर्थक ठरतात. लग्नखर्चा-पुरतेंच द्रव्य द्यावें असा अभिप्राय कुठेंहि धर्मशास्त्रांत व्यक्त केलेला आढळून येत नाहीं. म्हणून अविवाहित कन्येला पित्याच्या पश्चात् भाग मिळायला पाहिजे."

अनेन दुहितरोपि पितुरूर्ध्वं अंशभागिन्य इति गम्यते । न च निजादंशात् 'दत्वांऽशं तु तुरीयकमिति' तुरीयांशा विवक्षया संस्कारमात्रोपयोगी द्रव्यं दत्वेति व्याख्यानं युक्तम् । अत्रापि चतुर्भोगवचनमविवक्षितं संस्कारोपयोगी द्रव्यदानमेव विवक्षितम् इति चेत् न । स्मृतिद्वयेऽपि चतुर्थांशदानाविवक्षायां प्रमाणाभावददाने प्रत्यवायश्रवणाच्चेति । तस्मात् पितुरूर्ध्वे कन्याऽप्यंश-भागिनी ॥ —मिताक्षरा.

वीर मित्रोदय याच्या मतें लग्नखर्च आणि त्याशिवाय मिळकतींतील चौथा हिस्सा कन्येला मिळावा. सुबय्या वि. अनंतरामय्या ५३ मद्रास, पृष्ठ ८४ या 'फुलबेंच' ठरावांत न्यायमूर्ति रामेसम् यांनीं मुलीच्या सुखाबद्दल सुंदर विवेचन केलें आहे, त्यांचा अभिप्राय असा आहे. "पुत्र आणि कन्या यांचे वडिलांच्या मिळकतींत हक्क समान दर्जाचे होते. वडिलांच्या हयातींत मुलीचा हक्क उत्पन्न झालेला असतो. म्हणूनच तिला पित्याच्या हयातीनंतर चौथा हिस्सा मिळकत मिळत असावी. चौथा हिस्सा मिळकत लग्नखर्चा-करितां म्हणून द्यावी असा आज जो कायद्याचा नियम आहे तो कन्येच्या एका काळच्या पुत्राच्या बरोबरीच्या हक्काचा अवशेष आहे." कन्या आणि पुत्र यांच्या हक्काचें स्वरूप एकसारखें आहे हा मुद्दा विशेष लक्षांत ठेवण्या-सारखा आहे. हें झालें पित्याच्या मिळकतींत कन्येच्या हक्काबद्दलचें विवेचन. कन्येला पित्याची मिळकत वारशांत मिळते कीं नाहीं याबद्दल स्मृतिकाळीं एकमत नव्हतें. मिळकतीचा विनियोग यज्ञकार्याकडे केला पाहिजे असें मानण्यांत येऊं लागलें होतें. ज्यांना यज्ञ करण्याचा अधिकार त्यांनाच मिळकत मिळावी असें शास्त्र ठरलें. त्यापूर्वींच स्त्रियांचाहि यज्ञाचा अधिकार काढून घेण्यांत आला होता. त्याचें विवेचन पुनः पुढें येणार आहे. रूढीवर भावना जय मिळवीत असतात आणि अपत्यप्रेमालाहि प्रतिगामी सामाजिक परि-स्थिति मूठमाती देऊं शकली नाहीं. शेवटीं बृहस्पतीनें कन्येच्या हक्काचा

पुरस्कार केला. तो म्हणतो, आपण तसेंच आपला मुलगा आणि मुलगी असें असतांनाहि इतर भाऊबंदांनीं कां म्हणून आपलें धन घ्यावें ?

यथैवात्मा तथः पुत्रः पुत्रेण दुहितासमा।
तस्यामात्मनि तिष्ठायां कथमन्यो धनं हरेत् ।।

या काळीं बायको आणि मुलगी यांच्या तोंडाला पानें पुसून निपुत्रिक पुरुषाचें द्रव्य त्याच्या मृत्यूनंतर त्याचे बाप, भाऊ, पुतणे, लांबचे भाऊबंद घेत असत. या लांबच्या नातेवाईकांना दूर लोटून प्रथम बायको आणि नंतर मुलगी असा मृताच्या भावनेची जोपासना करणारा वारसाक्रम याज्ञवल्क्यानें घालून दिला. तो असा—पहिल्यानें पत्नी, नंतर मुलगी, नंतर आईबाप, नंतर भाऊ, नंतर त्यांचे मुलगे, भाऊबंद आणि आप्त.

पत्नी दुहितरश्चैव पितरो भ्रातरस्तथा।
तत्सुता गोत्रजा बंधुः शिष्यः स ब्रह्मचारिणः।
एषामभावे पूर्वस्य धनमागुत्तरोत्तरः। —याज्ञवल्क्यः

कन्येला वारसा हक्क मिळाला खरा, पण मुंबई इलाख्याखेरीज तिला वारशांत मिळणाऱ्या मिळकतीवर मर्यादित हक्क जीमूतवाहनाच्या योजनेप्रमाण देण्यांत आला. मर्यादित हक्काचा अर्थ असा. तिनें मिळकतीच्या उत्पन्नाचा उपभोग घ्यावा. मिळकत तिला दुसऱ्यास देतां येत नाहीं व तिच्या पश्चात् मूळ धारण करणाऱ्याच्या वारसास मिळकत जावी. सुदैवानें मुंबई इलाख्यांत तिला संपूर्ण मालकी हक्क मिळतो.

### चालू हक्काचा अपुरेपणा—

कन्येला कायद्यानें जो वडिलाच्या मिळकतींत हक्क दिला आहे तो चालू काळावर दृष्टि ठेवतां अपुरा आहे. तें कसें तें आपण पाहूं. लग्नखर्च कुटुंबांतून करावा अशी आज्ञा असतांहि तिच्या प्रीत्यर्थ योग्य प्रमाणांत खर्च होईल कीं नाहीं याची ग्वाही देतां येत नाहीं. वडिलांनींच तिचें लग्न केलें तर मुलीच्या हिताची दक्षता ठेवून जरूर तो खर्च ते करतात आणि म्हणूनच पित्याच्या हयातींत तिला भाग मागण्याचा हक्क मिताक्षरेंत कबूल केलेला नसावा. पित्याव्यतिरिक्त जेव्हां इतर नातेवाईकांवर तिचें लग्न करण्याची जबाबदारी येऊन पडते, अशा वेळीं तिच्या चौथ्या हिश्शाच्या मानानें सहसा कोणी खर्च

करीत नाहीं. मुलीच्या वडिलांनीं लाखों रुपये मिळविलेले असावेत ते त्याच्या बंधूंना मिळावेत आणि पोटच्या मुलीला त्यांतील कांहींहि अंश मिळू नये अशी कायद्याची आज व्यवस्था आहे, ती अन्यायमूलक आहे. समाजसत्तावादाचीं तत्त्वें कायद्याच्या अंगणांत डोकावूं लागल्याबरोबर सुधारलेल्या सर्व राष्ट्रांत पुत्र आणि कन्या यांचे हिस्से आणि हक्क सारखे ठरवावे लागले आहेत. लग्न-खर्च हजारों रुपये जरी केला तरी खुद्द कन्येच्या हातीं त्यांतील कपर्दिकहि जात नाहीं. हुंड्याच्या रकमेवरहि वरपक्षाकडील मंडळींचा हक्क! अशा स्थितींत त्या मुलीवर बरा वाईट प्रसंग ओढवला तर तिला कांहींच आधार राहात नाहीं. दुसरी एक अडचण विचार करण्यासारखी आहे. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुली अविवाहित राहण्याची वहिवाट जास्त रूढ होऊं लागली आहे. पालकांच्या इच्छेविरुद्ध अविवाहित राहणाऱ्या मुलीला कुटुंबांतून पोटगीहि मिळेल कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. तेव्हां अशा अविवाहित राहणाऱ्या मुलींची तरतूद कायद्यानें अवश्य केली पाहिजे. पंगु, रोगी, अशक्त अशा मुलींचीं लग्नें होणेंहि दुरापास्त असतें व वेळीं लग्नाच्या निमित्तानें मुलीनें मृत्यूच्या गळ्यांत माळ घातल्यासारखेंच असतें. अशा मुलींना हिस्सा म्हणून मिळकत मिळाली पाहिजे. अशा मुलींना आश्रित म्हणून पोटगी मिळेल पण पोटगीचा हक्क इतका ठिसूळ असतो कीं त्याच्या केव्हांच ठिकऱ्या उडतात. आज भावानें वांटणी केली तर अविवाहित मुलीला लग्नखर्च म्हणून भावाच्या चौथा हिस्सा मिळकत मिळते खरी; पण भावां-मध्यें वांटणी करण्याचा प्रसंगच आला नाहीं म्हणजे तिची काय वाट? आणि एकटाच भाऊ असेल तर वांटणी कधींच होणार नाहीं! तेव्हां मुलींना जन्मदात्या पित्याच्या मिळकतींत कांहींतरी हिस्सा देणें कालौघानें प्राप्त झालें आहे.

### कितवा हिस्सा मिळावा—

तिला मिळणारा हिस्सा काय प्रमाणांत असावा हा प्रश्न आहे. लग्ना-नंतर तिला नवऱ्याच्या मिळकतींत समान हक्क मिळावा अशी सूचना पुढें येणार आहे. मुलाच्या हातीं असणारी मिळकत, त्याच्यापासून उत्पन्न होणाऱ्या कुटुंबाच्या वाढत्या पसाऱ्याचें भांडवल होऊं शकतें. यास्तव मुलाला तीन

हिस्से व मुलीला एक हिस्सा मिळकत देण्यानें मुलाला अन्याय व्हावयाचा नाहीं आणि मुलीलाहि जास्त हक्क मिळतील. मिताक्षरेची आणि पूर्वीच्या स्मृतिग्रंथांची योजना लक्षांत घेतां तिला भावाच्या चौथा हिस्सा मिळकत मिळावी असें सुचवावेंसें वाटतें.

## हिस्सा लहान पण हक्काचा दर्जा सारखाच—

तिच्या हक्काची व्याख्या केली पाहिजे. तिचा हिस्सा लहान असला तरी तिचा हक्क हा मुलाच्या हक्काच्या सारखाच समजण्यांत यावा. ऐतिहासिक समालोचनांत मुलीला मुलांप्रमाणें वडिलांच्या मिळकतींत जन्मजात हक्क उत्पन्न होतो असें दिग्दर्शित केलें आहे. विज्ञानेश्वराचें मत तसेंच आहे. फार काय पण न्यायमूर्ति रामेसम् यांचाहि अभिप्राय तसाच पडतो. एवंच वडिलार्जित मिळकतींत मुलाप्रमाणें तिला सहभागीदार गणण्यांत यावें आणि तिला वांटणी मागण्याचा हक्क असावा. वडिलांची स्वतःची स्वसंपादित मिळकत असेल तर अर्थात् त्यांच्या हयातीनंतर मुलांच्या हातांत येणारी मिळकत वडिलार्जित समजली जाते. अशा वेळीं मुलीलाहि त्यांत हक्क मिळेलच.

म्हणून अशी सूचना करावीशी वाटते कीं—

(अ) कन्येला वडिलांच्या अगर बंधूंच्या हातीं असलेल्या वडिलार्जित मिळकतींतून भाग मागण्याचा हक्क असावा.

(आ) तिचा भाग, भाऊ हयात असेल अगर हयात असता तर त्याला जो हिस्सा मिळाला असता त्याच्या चौथा हिस्सा मिळकत तिला मिळावी.

(इ) मात्र तिच्या लग्नाप्रीत्यर्थ झालेला खर्च हा तिच्या भागांतून वळता करून घ्यावा.

## हुंडा—

हुंड्याची एक बाबत राहिली. लग्नानिमित्तानें मुलीच्या वडिलांकडून जें जें काय मुलाला देण्यांत येतें त्यावर मुलीचा हक्क आहे असें स्मृतिग्रंथांचें मत आहे. अर्थात् हुंड्यावर तिचा हक्क चालला पाहिजे. हुंड्याची बाबत प्रत्यक्ष व्यवहारांत मुलाची किंमत म्हणून अलीकडे ठरविली गेलेली आहे.

पाने ११५ दा नं. ८८२५३ ता. २१।३।७५

तशांत वरदक्षिणा या मोठ्या नांवानें ती नवऱ्याच्या एकट्याच्या मालकीची ठरवितां येईल. लग्नव्यवहारांत फायदेबाजी शिरली आहे; अशा स्थितींत हुंड्याच्या रकमेवर मुलीचा हक्क ठरविला तरी दुसऱ्या कांहीं अंतस्थ योजनेनें त्या हक्काला धाब्यावर बसवितां येईलच. म्हणन हुंड्याच्या रकमेबद्दल कांहीं ठराव करूनहि फलनिष्पत्ति होणार नाहीं. मुलीला चौथा हिस्सा मिळकत मिळण्याची आशा असली तर नवरामुलगाहि हुंड्याच्या रकमेसाठीं अडून बसणार नाहीं. हुंड्याची रक्कम लग्नखर्चाच्या मेजवान्या, आणि मिरवणुकी अशा वायफळ बाबतींत खर्च होतेच. शिवाय मुलाच्या शिक्षणाकरितां काढलेलें कर्ज त्यांतून फेडल्याचीं जशीं उदाहरणें आहेत, तसेंच त्यांतून स्वतःच्या मुलीचा लग्नखर्चहि भागविल्याचे दाखले आहेत. हुंड्याच्या रकमेची अशी वाताहत दिसत असतां त्याला शिकलेले लोकहि चिकटून राहतात याचें कारण हेंच कीं लग्नाच्या निमित्तानें जास्त पैसा मुलीच्या बापाकडून पिळून काढतां येतो व त्यानंतर पुढें एक पैहि तिला मागण्याचा हक्क नसतो.

## अंमलांत आणतां येईल अशी सुधारणा—

कायद्यांत सुधारणा होईतोंपावेतों वाट न पाहतां व्यक्तिमात्राला या बाबतींत काय करतां येईल याचें थोडें दिग्दर्शन करूं. हुंड्याची रक्कम खुद्द मुलाला न देतां वधूवरांच्या नांवानें मिळून बँकेंत टाकावी आणि तेवढ्याच रकमेचा विमा वरानें उतरावा व अशा एकंदर रकमेची लग्नयोजना निश्चित करावी. सदर रकमेचे नवरा-बायको हे उभयतां ‘ ट्रस्टी ’ म्हणून राहतील आणि त्या रकमेचा फायदा उभयतांना कुटुंबखर्चाकरितां अडीअडचणीच्या प्रसंगीं करतां येईल. तसाच त्यांच्या मुलांबाळांना तो एक आधार होईल.

## प्रकरण ७ वें

# सुवासिनीचे आर्थिक हक्क

### सुवासिनीचे सांप्रतचे हक्क--

सुवासिनीचे हक्क काय आहेत तें आपण पाहूं.

लग्न होतांच तिचें जन्मदात्या कुटुंबाशीं असलेलें नातेंगोतें, हक्क, जबाबदाऱ्या हीं नाहींशीं होऊन जणूं काय तिचा जन्म लग्नघटकेपासून पतीच्या कुटुंबांत झाला, अशा प्रकारें तिच्या हक्कांची वासलात लावण्यांत येते. लिखितानें म्हटल्याप्रमाणें भार्या ही पतीशीं पिंड-गोत्र-सुतक ह्या बाबतींत एकरूप होते (एकत्वं सा गताभर्तुः पिण्डगोत्रेच सूतके). तेव्हां आजच्या कायद्याप्रमाणें तिचे हक्क काय आहेत तें आपण पाहूं. भार्येला नवऱ्याच्या मिळकतींत गौण प्रकारचें स्वामित्व मिळतें; पण हें स्वामित्व कसें आहे तें पुढें दिसेल. नवऱ्याच्या मिळकतींत त्याच्या हयातींत तिला कांहींच स्वतंत्र हक्क नसतो. तिला पोसण्याची नवऱ्यावर जबाबदारी आहे आणि योग्य कारणावरून ती निराळी राहात असल्यास तिला स्वतंत्रपणें अन्नवस्त्र मागतां येतें. आपल्या भार्येच्या अन्नवस्त्राचा हक्क डुबविण्याच्या हेतूनें स्वतःची सर्व मिळकत दुसऱ्यास विकून टाकण्याचा अगर मृत्युपत्रानें देऊन टाकण्याचा तिच्या पतीला हक्क नसतो. तिचा अन्नवस्त्राचा आणि घरांत राहण्याचा हक्क यांचा कायदेशीर बोजा तिच्या नवऱ्याच्या मिळकतीवर उत्पन्न झाल्याचें मानण्यांत येत नाहीं. त्यामुळें नवऱ्याची मिळकत त्याच्या कर्जापायीं विकली गेली तर त्याबद्दल तिला कांहीं तक्रार करतां येत नाहीं व तिच्या अन्नवस्त्राच्या हक्काचें तिला रक्षण करतां येत नाहीं. नवऱ्याच्या मिळकतींतून तिला निराळा भाग मागतां येत नाहीं, पण जर नवऱ्याच्या हयातींत अगर पश्चात् तिच्या मुलांच्यांत मिळकतीची वांटणी झाली तर तिला आपल्या एका मुलाएवढा हिस्सा मिळण्याचा हक्क असतो. मिळकतीची वांटणी झाली नाहीं तर तिला फक्त अन्नवस्त्रच मिळतें. अविभक्त कुटुंबांत तिला नेहमीं फक्त अन्नवस्त्रच मिळतें. लग्नाच्या अगोदर अगर लग्नाच्या वेळीं तिला मिळालेल्या

मिळकतीची ती पूर्ण मालक असते व हें तिचें स्त्रीधन म्हणून समजतात. पण सणावारीं वापरण्याचे किंमती–ठेवणीचे दागदागिने आणि कपडेलत्ते यांचा समावेश या स्त्रीधनांत होत नाहीं. विवाहित स्थितींत तिला स्वकौशल्यानें, श्रमानें अगर तिऱ्हाइतांकडून देणगीरूपानें मिळणाऱ्या मिळकतीवर तिची मालकी असली तरी नवऱ्याच्या संमतीशिवाय तिला तिची विल्हेवाट लावतां यावयाची नाहीं. मात्र नवऱ्याच्या पश्चात् अशी मिळकत तिच्या स्वतंत्र मालकीची होते. तिच्या स्त्रीधनाच्या मिळकतीचा उपयोग नवऱ्यानें अगदीं निकडीच्या वेळीं पाहिजे तर करावा, पण जर नवऱ्यानें तिचा त्याग केला असेल तर तिला नवऱ्यापासून ती मिळकत परत मागतां येते.

वेदकालीन स्त्रियांना मिळकतीचे संपूर्ण हक्क होते, इतकेंच नव्हे तर नवऱ्याच्या मिळकतींत त्यांची बरोबरीची मालकी ग्राह्य करण्यांत आली होती.

फलोत्साहाविशेषात्तु अर्थेन च समवेतत्वात् । जैमिनी ६०१, ३, १४,१७.

## पतिपत्नींची समसमान मालकी—

स्मृतिकारांच्या म्हणण्याप्रमाणें तिला पतीच्या मिळकतींत समसमान मालकी मिळते. तसेंच सर्व मिळकत पतिपत्नी यांची समाईक समजावी असें दत्त याचें म्हणणें आहे (दम्पत्तोर्मध्यगं धनम्). पत्नी या शब्दाचा अर्थहि नवऱ्याच्या समसमान हक्क असणारी असा केलेला आढळतो. ‘दंपत्यो सहाधिकारात्.’ मिळकतींत दोघांचे समसमान हक्क आहेत असें मानण्यांत येत होतें. इतकेंच नव्हे तर, कुटुंबाच्या मिळकतीची वांटणी करण्याचे प्रसंग ज्या ज्या वेळीं उत्पन्न होत, त्या त्या वेळीं भार्या अगर माता म्हणून तिला अगदीं पुरुषाप्रमाणें भागीदार म्हणून एका मुलाएवढा भाग देण्यांत येत असे. याज्ञवल्क्य म्हणतात त्याप्रमाणें जर त्यानें (पुरुषानें) समसमान भाग केले तर ज्यांना सासरकडून स्त्रीधन मिळालेलें नाहीं अशा भार्यांना समभाग मिळकत द्यावी. पित्याच्या मरणानंतर होणाऱ्या वांटणींत मातेला समान भाग मिळावा.

यदि कुर्यात् समानंशान् पत्न्यः कार्याः समांशिकाः ।
न दत्तं स्त्रीधनं यासां भर्त्रा वा श्वशुरेण वा ।
पितुरुध्वं विभजतां माताऽप्यंशं समं हरेत् —याज्ञवल्क्य २,११५,१५३.

विष्णु, व्यास वगैरे स्मृतिकारांनीं मुलांच्या बरोबरीनें पत्नीला अगर आईला हक्क मिळावा असें म्हटलें आहे व हें तत्त्व आजच्या कायद्यांत अस्तित्वांत आहे. भार्येला अगर मातेला मिळणारा हा भाग अन्नवस्त्राच्या ऐवजीं मिळतो असें आज समजण्यांत येते; पण वस्तुतः ती समजूत चुकीची आहे. स्मृतिचंद्रिकेचा कर्ता देवाण्णभट्ट यानें हाच युक्तिवाद अकराव्या शतकांत पुढें मांडला होता व त्यानें असा निष्कर्ष काढला कीं, मिळकत थोडी असेल तेव्हां भाग द्यावा, पण मिळकत फार मोठी असेल तर अन्नवस्त्र द्यावें. त्याचा समकालीन विज्ञानेश्वर यानें या त्याच्या म्हणण्याचा येणेंप्रमाणें खरपूस समाचार घेतला आहे. असें प्रतिपादन करण्यांत येतें कीं, ‘धर्मशास्त्राप्रमाणें पत्नीला व मातेला समभाग द्यावेत असें जें सांगण्यांत आलें आहे त्याचा अर्थ त्या स्त्रीला भरणपोषणापुरती मिळकत मिळावी असा होतो.’ परंतु हें म्हणणें चुकीचें आहे. **सम** आणि **भाग** हे स्मृतिकारांचे शब्द निरर्थक ठरतात. असेंहि कोणी म्हणेल कीं, मिळकत पुष्कळ असेल तर तिच्या अन्नवस्त्रापुरती मिळकत तिला मिळावी आणि मिळकत थोडी असेल तर तिला मुलांच्या बरोबरीनें भाग मिळावा. पण हेंहि म्हणणें तितकेंच चुकीचें आहे. **सम** आणि **भाग** या शब्दांचे जरूरीप्रमाणें निरनिराळे अर्थ लावण्याचें अशास्त्रीय धोरण स्वीकारावें लागेल. तेव्हां हे दोन्ही तर्क चुकीचे आहेत.

तथा ह्यौरसेषु पुत्रेषु सत्स्वपि जीवद्विभागे अजीवद्विभागे च पत्न्याः पुत्रसमांशग्रहणमुक्तम्। अथ पत्न्यः कार्याः समांशिका इत्यत्र माताप्यंशं समं हरेदित्यत्र च जीवनोपयुक्तमेव धनं स्त्री हरतीति मतं तदसत्। अंशशब्दस्य समशब्दस्य चानर्थक्यप्रसंगात्। स्यान्मतं बहु धने जीवनोपयुक्तं धनं गृण्हाति अल्पे तु पुत्रांशसमांश गृण्हातीति तच्च न। विधिवैषम्यप्रसंगात्॥

तेव्हां अन्नवस्त्राची तरतूद म्हणून हा भाग देण्यांत येतो असें जें अलीकडच्या कित्येक निकालांत गृहीत धरण्यांत येतें तें किती चुकीचें आहे हें न्यायकचेऱ्यांनाहि शिरसावंद्य असलेल्या मिताक्षरा ग्रंथानें स्पष्ट शब्दांत नमूद केलें आहे.

### हक्कांचा आधार सहमालकी—

पत्नीची पतीच्या मिळकतींत समसमान मालकी उत्पन्न होते, ही

कल्पना स्मृतिग्रंथ व निबंधग्रंथांतून आधारभूत धरण्यांत आली आहे आणि याच मूलभूत कल्पनेवर पत्नीला वांटणींत हिस्सा देण्याचें तत्त्व व नवऱ्याच्या मिळकतीचा वारसा तिजकडे येण्याची योजना हीं घट्ट बसविलीं आहेत. **दाय** आणि **विभाग** या दोन शब्दांनीं पत्नीस वांटणींत हिस्सा मिळण्याचा हक्क जो निबंधांत वर्णन केला आहे, त्याची आपण युक्तता पाहूं. दाय याची व्याख्या मिताक्षरेनें अशी केली आहे कीं, मिळकतीच्या मालकाशीं असलेल्या केवळ नात्याच्या योगेंकरून जी मिळकत दुसऱ्या मनुष्यास मिळते त्याला दाय असें म्हणतात.

दाय शब्देन यद्धनं स्वामिसंबंधादेव निमित्तादन्यस्य स्वं भवति तदुच्यते ।

तेव्हां पति हा मिळकतीचा मालक धरला तर त्याच्याशीं असलेल्या नात्याच्या आधारानें त्याच्या मिळकतींत पत्नीचा हक्क उत्पन्न होतो हें या व्याख्येवरून स्पष्ट होतें. पत्नीला नवऱ्याच्या बरोबर विभाग द्यावा. याच्या बुडाशीं तरी समाइकीची कल्पनाच गृहीत धरलेली आहे. नेहमीं ज्या ज्या व्यक्तींची एकाद्या मिळकतींत मालकी असते अशामध्येंच तिची वांटणी होते. समाईक मिळकतींत असलेले निरनिराळे हक्क फोडून त्या मिळकतीचे अलगअलग भाग पाडून ज्या त्या हिस्सेदारांना त्यांचे स्वतंत्र भाग देणें याचाच अर्थ वांटणी करणें अगर विभाग पाडणें होय. आणि हीच व्याख्या विज्ञानेश्वरानें दिलेली आहे.

विभागो नाम द्रव्यसमुदायविषयाणामनेकस्वाम्यानां तदेकदेशेषु द्रव्यस्य व्यवस्थापनम् ।

चार भावांच्यांत एका घराची वांटणी झाली असें आपण म्हणतों, त्याचा अर्थ असा कीं, त्या दरेक भावाचा संबंध घरावर जो समाईक मालकी-हक्क होतो त्या मालकीहक्काची फोड करून त्या घराचे चार तुकडे केले आणि दरेकाच्या ताब्यांत एक एक भाग दिला. ते चौघेहि भाऊ पूर्वी हिस्सेदार होते म्हणूनच त्यांच्यांत वांटणी होऊं शकली. हाच तर्कवाद पत्नीला अगर मातेला मुलांच्या वांटणींत समान हिस्सा मिळण्याचें जें कायद्याचें धोरण आहे त्याला आपण लावूं. तिचा मिळकतींत हक्क असतो, ती हिस्सेदार असते म्हणूनच तिला वांटणींत एक भाग मिळतो, असेंच म्हणावें लागेल. अन्नवस्त्राची तरतूद म्हणन भाग देण्याचें कारण नव्हतें. आजहि कुटुंबावर

अवलंबून असलेल्या आश्रित नातेवाईकांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था वांटणीच्या वेळेस जशी करण्यांत येते तशी व्यवस्था पत्नीबद्दल करावी असें ठरविलें असतें तरी पुरें होतें. पण तिला हिस्सेदार म्हणून मुलांच्या बरोबरीनें वांटणी देण्याचें ठरविलें याचें कारण तिची मालकी नवऱ्याच्या मिळकतींत समसमान होय हेंच आहे. मिताक्षरा ग्रंथांत हें मत स्पष्टच केलें आहे. मिळकतीच्या मालकींतसुद्धां समाईकपणा आहे कीं काय अशी शंका घेतल्यास त्याचें उत्तर 'होय' असें आहे. 'नवऱ्याच्या मिळकतीवर त्याच्या बायकोची मालकी शास्त्रांत सांगितली आहे, तेव्हां अर्थात् त्या मिळकतीची मालकी पत्नीची मानली पाहिजे.'

ननु द्रव्यस्वामित्वेपि सहत्वमुक्तं। द्रव्यस्वामित्वं पत्न्या दर्शितमनेन तस्मात् भार्यायामपि द्रव्यस्वामित्वमस्ति॥

निपुत्रिक पतीच्या मरणानंतर त्याच्या पत्नीस मिळकतीचा वारसा उतरतो याचें कारणहि पतीच्या मिळकतींत तिचा जो लग्नघटकेपासून मालकी-हक्क उत्पन्न होतो हेंच होय. जीमूतवाहन यानें याच आधारावर विधवेस वारसाचा हक्क मिळावा असें प्रतिपादन केलें. तो म्हणतो, 'लग्ननिमित्तानें नवऱ्याच्या मिळकतींत जो त्याच्या पत्नीचा मालकीहक्क उत्पन्न होतो, तो त्याच्या मरणासरशी नष्ट होतो, या सिद्धान्ताला शास्त्रांत प्रमाण नाहीं.'

परिणयनोत्पन्नं भर्तृधने पत्न्याः स्वामित्वं भर्तृभरणात् नश्यतीत्यत्र च प्रमाणाभावात् सति।

तेव्हां पतीच्या मिळकतींत पत्नीची समसमान मालकी लग्नघटकेपासून उत्पन्न होते असा जुन्या धर्मग्रंथांचा अभिप्राय आहे.

**मालकी खरी पण गौण—**

पतीच्या मिळकतींत मालकी आहे पण ती गौण प्रकारची आहे असें सध्यांच्या कायद्यांत ठरलें आहे. आणि या गौण मालकीचा अर्थ काय याबद्दल मुंबई हायकोर्टानें नर्मदाबाई विरुद्ध महादेव नारायण ५ मुंबई १०३, या ठरावांत असा खुलासा केला आहे कीं, मालकी या शब्दाच्या कक्षेंत स्वतंत्र अगर समान हक्कानें मिळकतीची विल्हेवाट अगर स्वतंत्र उपभोग करण्याचा हक्क येत नाहीं. आणि सर्वसाधारणपणें मालकी या शब्दांत व्यक्त होणारा

अधिकार या गौण मालकांत समाविष्ट होत नाहीं. या विषयासंबंधीं न्यायमूर्ति ढवळे यांचा श्रीमती सावित्री ठकराणी विरुद्ध मिसेस एफ्. ए. सावी १९३३ पाटणा ३०६, हा ठराव जिज्ञासूंनीं वाचावा. त्यांत धर्मशास्त्रांतील वचनें व कोर्टाच्या ठरावांचे सांप्रतचे सिद्धांत यांचें परिश्रमपूर्वक सुंदर परिशीलन केलेलें आहे.

## पूर्वीची सहमालकी जाऊन ती आज आश्रित बनली—

नवऱ्यापासून पोटगी मिळविण्याचा हक्क आणि त्याच्या घरांत राहण्याचा हक्क हा तरी तिला असलेल्या सहमालकीच्याच अनुरोधानें मिळतो. कुटुंब एकत्र असतें त्या वेळेस पुरुष हिस्सेदारांना तरी अन्नवस्त्र आणि राहण्यास जागा यापेक्षां कांहींच जास्त मिळत नाहीं. पण असा विपरीत अर्थ करण्यांत आला आहे कीं, पत्नीला भरणपोषण आणि निवासहक्क एवढाच कायद्यानें दिलेला आहे. ती नवऱ्याची हिस्सेदारीण खरी, पण पतिपत्नींत वांटणी होऊं नये, निदान नवऱ्यास वाटल्यास त्यानें पत्नीस विभाग द्यावा पण तिला स्वतःला वांटणी मागतां येऊं नये असा मिताक्षरा ग्रंथांत स्पष्ट उल्लेख आहे.

जायापत्योर्विभागो न विद्यते । आपस्तंबः । तस्माद्भर्तुरिच्छया भार्यायाऽपि द्रव्यविभागो भवत्येव न स्वेच्छया । —मिताक्षरा.

तिला स्वतः होऊन वांटणी मागतां येत नसली म्हणजे तिला हक्क नाहीं असें थोडेंच आहे? आणि नवऱ्यानें वांटणी केली म्हणजे मुलाच्या बरोबरीनें तिला विभाग मिळाला पाहिजे याचा दुसरा अर्थ तरी काय करणार? नवऱ्याच्या हयातींत तिला वांटणी मागतां येत नाहीं; तथापि तिचें भरणपोषण नवऱ्यानें करावयाचें तें ती एक सहमालकीण आहे म्हणूनच आणि ज्या ज्या वेळीं, उदाहरणार्थ, वांटणीच्या वेळीं अगर दुसरें लग्न करण्याच्या वेळीं तिच्या हक्काचा निर्णय करण्याचा प्रसंग येई त्या वेळीं तिला नुसतें अन्नवस्त्र न देता नवऱ्याच्या मिळकतींत—जर कांहीं मिळकत असेल तर—हिस्सा देण्यांत येत असे.

यदि कुर्यात्समानंशान् पत्न्यः कार्याः समांशिकाः ।
आज्ञा संपादिनीं दक्षां वीरसूं प्रियवादिनीम् ।
त्यजन्दाप्यस्तृतीयांशमद्रव्यो भरणं स्त्रियाः ।—याज्ञवल्क्य.

मिळकत असो अगर नसो, पुरुषानें आपल्या भार्येचें भरणपोषण केलें

पाहिजे या शास्त्राज्ञेचा विपरीत अर्थ करण्यांत आला. भरणपोषणाची जबाबदारी फक्त नवऱ्यावरच व्यक्तिशः पडते, आणि त्याच्या मिळकतीवर कोणत्याहि तऱ्हेचा या जबाबदारीचा बोजा पडत नाहीं असें ठरविण्यांत आलें. याचा परिणाम फार अनिष्ट झाला आहे. नवऱ्यानें सर्व इस्टेट विकून टाकली अगर सट्टे, जुगार, मद्यादि व्यसनांत होणाऱ्या कर्जापायीं त्याची मिळकत विकली गेली तरी त्याच्या पत्नीस कोणत्याच प्रकारची दाद मिळूं शकत नाहीं. अन्नवस्त्राचा माझा हक्क आहे असें म्हणून तिला मिळकतीचें, निदान पक्षीं स्वतःच्या हक्काचें कोणत्याच तऱ्हेनें संरक्षण करतां येत नाहीं. कायदा तिला सांगेल कीं, ' बाई ग, अन्नवस्त्र देण्यास तुझा नवरा व्यक्तिशः जबाबदार आहे; पण त्याच्या मिळकतीवर तुझा कांहींच हक्क नाहीं; ' त्याच बाईला जर मुलगा असेल तर तो बापाचे व्यवहार अनीतीचे आहेत अगर कुटुंबाच्या जरूरी खर्चाकरितां नाहींत अशी तक्रार करूं शकतो आणि बापाचा हिस्सा गेला तरी कुटुंबाच्या मिळकतींतील मुलाचा हिस्सा सावकारापासून निर्धास्त राहूं शकतो. वास्तविक मुलगा आणि पत्नी या दोघांचा मिळकतींत हक्क सारखाच, दोघेहि हिस्सेदार, पण पत्नीचें नवऱ्याच्या मिळकतीवरील स्वामित्व गौण प्रकारचें; तिचा नवऱ्याच्या मिळकतींत फक्त अन्नवस्त्रापुरता हक्क; अन्नवस्त्राची जबाबदारी हीहि नवऱ्याच्या मिळकतीवर न पडतां नवऱ्यावर व्यक्तिशः पडणारी; या दरेक चुकीच्या सिद्धांताचा त्रिवेणी संगम कायद्यानें घडवून आणला आणि त्या संगमाच्या डोहांत सुवासिनींना आजन्म लोटून त्यांना गटांगळ्या खात ठेविलें आहे. आजच्या कायद्यानें तिचे मालकीहक्क ओरबाडून काढून घेतले आणि तिला आश्रित बनविलें आहे. कायद्याच्या परिभाषेंतहि तिला आज आश्रित म्हणून संबोधण्यांत येतें.

### सहमालकी हक्क हाच खरा हक्क—

पतीपत्नीची मिळकतीवर समसमान मालकी शास्त्रानें जी मान्य केली आहे ती लौकिक दृष्टीनेंहि योग्यच वाटते. कुटुंबाच्या संपत्तींत नवऱ्याच्या कमाईचा भाग किती आणि त्याच्या पत्नीच्या काटकसरीचा भाग किती याचें पृथक्करण केल्यास दोघांनाहि सारखेंच श्रेय द्यावें लागल. ही सहमालकीची कल्पना धर्मशास्त्रास सम्मत आहे. विभक्त कुटुंब अगर एकत्र कुटुंब यांपैकीं

कोणतेंहि कुटुंब घ्या, त्यास हें तत्त्व सहज लागू पडणारें आहे. कुटुंबव्यवस्थेंत कोणत्याहि तऱ्हेचा बखेडा न माजवितां याच एका तत्त्वाच्या आधारानें इतर भागीदार आणि विवाहित स्त्रिया यांचे हक्क समतेच्या पातळींत सहज बसवतां येतील. सुवासिनी आणि विधवा या दोघींनाहि सारखाच तरणोपायाचा हा एक अचूक हक्क आहे. हें तत्त्व इतकें सुटसुटीत आहे कीं, तें वाटेल त्या परिस्थितींत लावतां येईल. आणि स्त्रियांच्या आर्थिक हक्कांची केविलवाणी स्थिति अचूकपणें नाहींशी करण्यांत रामबाणाप्रमाणें तें अमोघ आहे. म्हणून सूचना अशी करणें कीं––लग्नघटकेपासून विवाहित स्त्री नवऱ्याची सह-भागीदारीण आहे, असें समजण्यांत यावें. आणि तिला मुलगा असल्यास अगर असता तर एका मुलाच्या बरोबरीनें सहभागीदारपणाचे सर्व हक्क मिळावेत. मात्र नवऱ्याच्या हयातींत आणि त्याच्या इच्छेविरुद्ध एक सह-भागीदार म्हणून तिला वांटणी मागतां यावयाची नाहीं.

या सूचनेंत तिचा हक्क एका मुलाएवढा ठरविण्यांत आल्यानें तो निश्चित आणि स्पष्ट आहे. आज मुलाच्या हक्कावर जी त्याची व त्याच्या बापाची सत्ता आहे त्या सत्तेच्याच आधीन पत्नीचा हक्क राहणार. तेव्हां कुटुंबव्यवस्था सुरळीत चालण्यास व्यत्यय येणार नाहीं. शिवाय अयोग्य कारणानें तिचा हक्क नष्ट होण्याची भीतिहि उरणार नाहीं. नवऱ्याच्या हयातींत वांटणी होणें कुटुंबाच्या स्थैर्याच्या व अपत्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीनें अयोग्य होय; करितां पतिपत्नींच्यांत वांटणी होत नाहीं, निदान पतिपत्नीस वांटणी मागण्याचा हक्क नाहीं हें तत्त्व यांत नमूद केलेलें असल्यानें या हक्कदानानें पति-पत्नीसंबंधांत वितुष्ट, घोंटाळे आणि अनर्थ यांचीं काल्पनिक भुतेंहि उभीं राहूं शकणार नाहींत.

---

## प्रकरण ८ वें

# विधवेचे आर्थिक हक्क

### विधवेचे हक्क : विभक्त कुटुंब—

डॉ. देशमुख यांचें विधवा वारसाबिल अंमलांत येण्यापूर्वी, विधवेचे हक्क विभक्त कुटुंब आणि एकत्र कुटुंब यांत निरनिराळे होते. विभक्त कुटुंबांत तिला मुलगे असतील तर नवऱ्याच्या पश्चात् नवऱ्याचा वारसा मुलांना मिळे आणि तिला मुलांपासून अन्नवस्त्र मिळण्याचा हक्क असे. मुलांनीं वांटणी केली तर तिला एका मुलाएवढा भाग मिळे, पण मुलांनीं वांटणी केली नाहीं अगर एकुलता एक मुलगा असेल तर वांटणी होणें शक्य नव्हतें, अशा दोन्ही प्रसंगीं तिला फक्त अन्नवस्त्रच मागतां येत असे, पण वांटणी मागण्याचा हक्क तिला नसे. तिचा नवरा निपुत्रिक असेल तर नवऱ्याच्या मिळकतीचा वारसा तिला मिळे पण आतां नवऱ्याच्या पश्चात् त्याच्या विधवेस विभक्त अगर अविभक्त कुटुंबांत त्याचा वारसा मुलांच्या बरोबरीनें मिळतो, तिचा हिस्सा एका मुलाएवढा असून तिला वांटणी मागतां येते. वारशांत मिळणाऱ्या मिळकतीवर अगर वांटणींत मिळणाऱ्या मिळकतीवर विधवेचें स्वामित्व मर्यादित असतें. त्याचा अर्थ असा कीं, मिळालेल्या मिळकतीच्या उत्पन्नाचाच फक्त तिला विनियोग करतां येतो. तथापि खालील कारणांसाठीं ती मिळकत अगर मिळकतीचा भाग तिला मिळण्याचा हक्क मिळतो. आणि या कारणांना कायदेशीर जरूरीचीं कारणें म्हणतात. आणि तीं अशीं : कुटुंबाचें अगर कुटुंबांच्या मिळकतीचें संरक्षण, कुटुंबांतील मंडळींचें भरणपोषण, शिक्षण व त्यांच्या आवश्यक धर्मक्रिया, कुटुंबांतील मुलींचीं लग्नें इत्यादि कारणांसाठीं पैशाची जरूरी असेल तर तिला मिळकत विकण्याचा हक्क आहे. या कारणांशिवाय तिनें इतर कारणांसाठीं मिळकत विकली अगर मिळकतीची योग्य ती निगा ठेविली नाहीं तर तिच्या नवऱ्याचे सतरा पिढ्यांपर्यंतचे वारस कोर्टांत दावे लावूं शकतात आणि योग्य कारणांच्या अभावीं केलेले व्यवहार कोर्ट रद्द करतें आणि मिळकतीची अफरातफर

थांबविण्यासाठीं तिच्या कबजांतून मिळकतहि केव्हां केव्हां काढून घेण्यांत येते. नवऱ्याचे जे वारस त्यांना उत्तराधिकारी वारस म्हणतात. विधवेच्या मरणानंतर तिच्या ताब्यांतील मिळकत नवऱ्याच्या वारसांना जाते.

### विधवेचे हक्क: एकत्र कुटुंब—

एकत्र कुटुंबांत तिचा नवरा पुत्रवान स्थितींत वारला काय अगर निपुत्रिक वारला काय, तिला फक्त कुटुंबाच्या मिळकतींतून अन्नवस्त्र आणि राहण्यापुरती जागा मिळते. निपुत्रिक नवऱ्याचा हिस्सा त्याच्या भावांकडे अगर पुतण्यांकड जातो. पुरुषहिस्सेदार आणि जवळचे नातेवाईक यांच्या अभावीं मिळकतीचा वारसा तिला कधीं काळीं मिळे खरा, पण अशा मिळकतीवर तिची सत्ता मर्यादित असे.

### वारसा हक्काचें ऐतिहासिक समालोचन—

विधवेस तिच्या नवऱ्याचा वारसा मिळण्यासंबंधींचा इतिहास आपण पाहूं. वैदिक काळीं नवऱ्याच्या पश्चात् त्याच्या विधवा पत्नीस त्याची मिळकत मिळत असे. परंतु त्यानंतरच्या स्मृतिकालांत विशेषतः यज्ञयागाचें स्तोम ज्या काळांत अवास्तव माजलें होतें, अशा त्या कर्मठ कालांत, स्त्रियांना यज्ञाचा अधिकार नाहीं, म्हणून मिळकत धारण करण्याचा हक्कहि नाहीं असा युक्तिवाद मान्य झाला आणि विधवेस वारसा हक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें. तथापि याज्ञवल्क्यानें प्रथमतः तिच्या हक्कांचा पुरस्कार केला आणि पुत्रांच्या नंतर तिलाच वारस ठरविलें (पत्नीदुहितरश्चैव पितरौ....). त्यानंतर वृद्धमनु यानें दण्डक घालून दिला कीं, सदाचरणी निपुत्रिक विधवेनेंच मृत पतीस पिण्डदान द्यावें आणि मिळकतीचा त्याचा हिस्सा तिनें घ्यावा.

अपुत्राशयनं भर्तुः पालयन्ती व्रते स्थिता ।
पत्न्येव दद्यात् तत् पिण्डं कृत्स्नमंशं लभेत च ।

पतिपत्नी यांच्यापैकीं पत्नी अगोदर वारली तर ती अग्निहोत्र घेऊन जाते; पण पति जर अगोदर मयत झाला तर पत्नीस त्याची मिळकत मिळते असें बृहस्पतीनें सांगितलें आहे.

पूर्व प्रमीताग्निहोत्रं मृते भर्तरि तद्धनम् ।
विन्देत्पतिव्रता नारी एष धर्मं सनातनः ।। —बृहस्पतिः

अशा स्थितींत नवऱ्याच्या मरणासरशीं तिची सहमालकी नष्ट होते, व नवरा बायको या दोघांच्या मालकीची मिळकत एकट्या मुलींकडे अगर दिरांकडे जाते हें तर्कशास्त्रास पटत नाहीं. बृहस्पतीनें हा प्रश्न सोडवितांना सांगितलें आहे कीं, वेदांनीं, स्मृतिधर्मानें आणि लोकाचारानें पापपुण्याच्या फलांत पुरुषाची अर्धांगी ही समसमान भागीदारीण ठरविलेली आहे. ज्याची बायको मागें जिवंत आहे त्याचा अर्धा देह जिवंत आहेच. तेव्हां अर्धा देह जिवंत असतांना दुसरा त्याची मिळकत कसा घेऊं शकेल ? मरणाराचे नातेवाईक, मातापितर, सख्खे भाऊ जिवंत असतांनाहि मरणाराच्या निपुत्रिक बायकोस त्याचा हिस्सा मिळावा.

आम्नाये स्मृतितंत्रे च लोकाचारे च सूरिभिः ।
शरीरार्धं स्मृता जाया पुण्यापुण्यफले समाः' ।।
यस्य नोपरता भार्या देहार्धं तस्य जीवति ।
जीवत्यर्धशरीरेऽर्थं कथमन्यं समाप्नुयात् ।।
सकुल्यैः विद्यमानस्तु पितृमातृसमानभिः ।
असुतस्य प्रमीतस्य पत्नी तत्भागहारिणी ।।

या स्मृतिवचनांत विभक्त अगर अविभक्त कुटुंब असा कोठेंच भेद केलेला नव्हता. उलट त्याचा हिस्सा या शब्दानें हीं शास्त्रवचनें एकत्र कुटुंबासहि लागू पडणारीं होतीं. विशेषतः स्मृतिकालीं एकत्र कुटुंबपद्धतीच अमलांत होती. विज्ञानेश्वरानें यांत एक तोड काढली. त्यानें परस्परविरोधी धर्मशास्त्रांचा समेट घडवून आणला. विभक्त कुटुंबांत निपुत्रिक नवऱ्याचा हिस्सा त्याच्या विधवेस मिळतो, पण एकत्र कुटुंबांत त्याचा हक्क नष्ट होतो असा त्यानें निर्णय दिला. एकत्र कुटुंब आणि विभक्त कुटुंब असा भेद करून विधवेच्या वारसाहक्कास निरनिराळे नियम लावणें कसें चुकीचें आहे हें जीमूतवाहन या निबंधकारानें सिद्ध केलें आहे. त्याचें म्हणणें असें कीं, एकत्र कुटुंबांतील प्रत्येक पुरुषाचा कांहीं ठराविक हिस्सा हा असतोच आणि तो त्याच्या मरणानें नष्ट होतो व दुसऱ्या पुरुषमनुष्यास प्राप्त होतो हें म्हणणें पटत नाहीं. त्याचा हिस्सा मरणानें नष्ट होत नाहीं असें मानिलें म्हणजे तो त्याच्या बायकोकडे

गेला पाहिजे. जीमूतवाहनानें शेवटीं असा तर्कवाद केला कीं, लग्ननिमित्तानें स्त्री पतीच्या मिळकतीची सहमालक बनली, तेव्हां तिचा जो हक्कहितसंबंध मिळकतींत उत्पन्न झाला तो नवऱ्याच्या मरणानें नष्ट झाला असें म्हणणें बुद्धीला पटत नाहींच; पण शास्त्रांतहि त्याला प्रमाण नाहीं. एकत्र कुटुंबांत निपुत्रिक पुरुषाचा हिस्सा त्याचे भाऊ व पुतणे यांच्याकडे जाई पण त्याच्या विधवेला तो मिळत नाहीं अशी जी कायद्याची योजना होती तिचें समर्थन तर्कानें अगर शास्त्रप्रामाण्यानें करतां येण्यासारखें नव्हतें आणि हीच कल्पना जीमूतवाहनानें पुढें मांडली आहे. तो म्हणतो, पत्नीच्या वारसाहक्काचा निर्णय करतांना विभक्त अविभक्त अगर संसृष्ट स्थिति पाहण्याची जरूरी ठेवणें गौण होय. तिचा पति विभक्त होता, अविभक्त होता कीं संसृष्ट होता हें न पाहतां त्याची सर्व मिळकत त्याच्या पत्नीस मिळावी हा जो जितेंद्रियाचा सिद्धांत आहे तोच ग्रहण करावा.

**विभक्त व एकत्र कुटुंब म्हणजे काय ?—**

विभक्त आणि एकत्र कुटुंब यांतील भेद सांगतों. बाप, त्याचे चार मुलगे आणि त्या मुलांचे मुलगे एकत्र राहात असतील असें कुटुंब अविभक्त अगर एकत्र कुटुंब समजावें. एकत्र कुटुंबांत दरेक पुरुषव्यक्तीस सहभागदार म्हणून म्हणतात. भरणपोषण, मिळकतीचा उपभोग आणि मिळकतीची मालकी सगळ्यांची सारखीच समजली जाते. या चार मुलांच्या बायका, मूळ पुरुषाची बायको व त्या कुटुंबांतील अविवाहित मुलगी या सर्व स्त्रिया आश्रित म्हणून समजल्या जातात आणि त्यांचा हक्क फक्त अन्नवस्त्रापुरताच असतो. त्या चार मुलांपैकीं एका मुलाचा हिस्सा निराळा पाडलाच तर चार मुलांचे चार व बापाचा एक आणि आईचा एक असे सहा हिस्से वांटणींत पड-तील. म्हणजे एका मुलास सहावा भाग मिळेल. पण तो वांटणी न करतां मेला, त्याला मुलगा नाहीं पण मुली व बायको आहेत अशा स्थितींत त्याचा हिस्सा त्याचे भाऊ व बाप यांच्याकडे जाईल. त्याची बायको आणि मुली यांना फक्त अन्नवस्त्रच मिळेल. त्यानें वांटणी करून घेतली आणि नंतर तो जर वारला तर त्याची मिळकत पहिल्यानें त्याच्या बायकोस मिळेल व बायकोच्या हयातीनंतर त्याच्या मुलींना मिळेल. एकत्र कुटुंबांतून कोणीहि पुरुष हिस्सेदार

फुटून वेगळा झाला म्हणजे तो विभक्त झाला असें म्हणतात व त्याचें जें निराळें कुटुंब होतें तें विभक्त कुटुंब समजतात. अविभक्त कुटुंबांत किंवा एकत्र कुटुंबांत वारसाहक्काचा प्रश्न उपस्थित होत नाहीं. कोणी हिस्सेदार मेला म्हणजे इतरांचे हिस्से आपोआप वाढतात आणि दरेक पुत्रजन्मागणिक असलेले हिस्से कमी होतात. विभक्त कुटुंबांतच वारसाहक्काचा प्रश्न उभा राहतो. मिळकतीचा मालक वारला म्हणजे त्याच्या मिळकतीचा वारस प्रथम त्याचे मुलगे, नंतर त्याची बायको, नंतर मुलगी, आई, बाप, भाऊ, पुतणे, बहीण असा उत्तरोत्तर वारसांचा क्रम ठरलेला आहे. आणि एकाच्या अभावीं वारसा दुसऱ्याकडे जातो. मयताची मिळकत नात्यांच्या जोरावर दुसऱ्या व्यक्तीस मिळण्याचा जो हक्क त्यास वारसाहक्क म्हणतात. विभक्त कुटुंबांतील पुरुष हा मिळकतीचा संपूर्ण मालक असतो.

## सहमालकी नष्ट न व्हावी—

विभक्त आणि एकत्र कुटुंब यांत स्त्रियांच्या हक्कांची स्थापना पूर्वी ज्या तत्त्वावर करण्यांत आली होती त्याचें विवेचन मागें येऊन गेलेंच आहे. पण स्त्री ही आपल्या पतीच्या मिळकतीची सहमालकीण आहे, या आधारभूत कल्पनेसच सांप्रतच्या कायद्यानें तिलांजलि दिली. तेव्हां विभक्त कुटुंबांत मुलगा असेल, तर आणि अविभक्त कुटुंबांत नेहमींच, तिला आश्रित समजण्यांत येतें. वास्तविक पाहतां ती जर नवऱ्याची सहभागीदारीण असते तर तिचा तो मालकी हिस्सा नवऱ्याच्या मृत्यूनें नष्ट होतां कामा नये. नवऱ्याला मुलगा नसेल तर अविभक्त कुटुंबांतहि नवऱ्याचा संपूर्ण हिस्सा तिला मिळाला पाहिजे. तिला मुलगा असेल तर मुलाच्या बरोबर तिला स्वतःचा हिस्सा मागतां आला पाहिजे. नवऱ्याच्या अर्ध्या हिश्श्याच्या ठिकाणीं मुलगे आले तरी पण तिचा मूळचा हक्क कायम राहिलाच पाहिजे.

## अन्नवस्त्राच्या हक्काचा बुडबुडा—

आजच्या कायद्याप्रमाणें विधवेस ज्या वेळेला वारशांत मिळकत मिळत नाहीं तेव्हां, व अविभक्त कुटुंबांत नेहमींच तिला कुटुंबाच्या मिळकतींतून अन्नवस्त्र व कुटुंबाच्या घरांत राहण्यापुरती जागा मिळण्याचा हक्क आहे. या

हक्काची मिळकतीवर जबाबदारी पडत असली तरी त्याचा कायदेशीर बोजा उत्पन्न झाला असें मानण्यांत येत नाहीं. दस्तऐवज करून अगर कोर्टांतून निर्णय करून घेऊन मिळकतीवर अशा हक्कांचा बोजा उत्पन्न केला असेल तर ती गोष्ट निराळी; पण असा बोजा आपोआप उत्पन्न होत नाहीं. त्याचा परिणाम काय होतो तो पहा. विधवेच्या नवऱ्यानेंच एकत्रपणांत खूप संपत्ति मिळविली अशा स्थितींत तो वारला तर त्याची मिळकत त्याच्या इतर भावांकडे अगर मुलांकडे जाईल आणि त्या विधवेस फक्त अन्नवस्त्रच मिळेल. औरस मुलगे असतील तर त्यांना दयेचा पाझर तरी फुटेल; पण सावत्र मुलगे हे दीरपुतण्यांना बरे म्हणवतात! तेव्हां तिच्या मुलांनीं अगर दिरांनीं मिळकत उडवण्याचा सपाटा चालविला—मग ती व्यसनापायीं असो, सट्टयापायीं असो, मूर्खपणामुळें असो, किंवा फसवणुकीमुळें असो—तर ती सर्व इस्टेट सावकार अगर विकत घेणारा खुशाल घेऊन जातो. इस्टेट कुटुंबाच्या मालकीची राहिली नाहीं म्हणजे अन्नवस्त्र देण्याचें साधन व कारणच उरत नाहीं. अशा तऱ्हेनें या अन्नवस्त्राच्या आणि राहण्याच्या हक्कांचा बोजवारा होतो. त्याच्या उलट, समजा, अन्नवस्त्राचा बोजा दस्तऐवज करून उत्पन्न केला आहे तर मग सावकारानें मिळकत विकावयास काढली अगर दुसऱ्या कोणीं ती विकत घेतली तरी अन्नवस्त्राचा हक्क नष्ट होत नाहीं. पण जो ती मिळकत विकत घेतो त्याला तिला अन्नवस्त्र द्यावें लागतें. तेव्हां अन्नवस्त्राचा हक्क देऊन विधवा स्त्रियांचा कायद्यानें योग्य बंदोबस्त केलेला आहे अशीं आश्वासनें देऊन या चळवळीला नामोहरम करणारांचें म्हणणें किती फोल असतें याचा ज्यानें त्यानें विचार करावा. अन्नवस्त्राचा हक्क हा आजमितीस बुडबुड्याप्रमाणें क्षणिक आहे. तो केव्हां फुटेल आणि नाहींसा होईल याचा नेम नसतो.

### किमान हक्क सहमालकीचा होय—

अन्नवस्त्राच्या हक्काचा पाहिजे तर कायदेशीर बोजा उत्पन्न होतो असें ठरवा, म्हणजे तर झालें ना? असें म्हणून समान हक्काच्या मागणीची तीव्रता विरोधक नाहींशी करूं शकतात. पण या कांगाव्यानें फसण्यांत अर्थ नाहीं. अन्नवस्त्र मिळणें हा आश्रितांचाच अधिकार आहे, नव्हे त्याच्यावर दया आहे. स्त्रियांना स्वतःला आश्रितांच्या पंक्तींतून उठून मालकांच्या

पंक्तींत बसण्याची इच्छाच नसेल तर दुर्दैव त्यांचें आणि त्यांच्या अज्ञानाचें ! ! वेदकालापासून तों इंग्रज सरकारचीं न्यायासनें स्थापन होईपर्यंत स्त्रिया या पुरुषांच्या सहहिस्सेदार गणल्या गेल्या होत्या. नवीन हक्क पाहिजे तर मागू नका; पण जुने हक्क जे दुसऱ्यांनीं हिसकावून घेतले ते तरी परत मिळवा. यांशिवाय नुसत्या अन्नवस्त्राची कायद्यानें तरतूद केली तर स्त्रियांच्या आकांक्षा तृप्त होतील का ? याचा आपण विचार करूं. अन्नवस्त्राचा हक्क म्हणजे मिळकतीपैकीं सुतळीच्या तोडयावरहि स्त्रीचा हक्क नसतो. पोटापुरतें घ्यावें व स्वस्थ बसावें अशी आज एकत्र कुटुंबांतील विधवांची जी स्थिति असते ती स्थिति कायम राहिली तर एवढा हक्काच्या झगडयांचा डोंगर पोखरून उंदीर काढण्याचा खटाटोप तरी कशाला हवा ? विभक्त कुटुंब अगर अविभक्त कुटुंब यांत मुलाच्या बरोबरीनें त्यांना हक्क मिळाला तरच विधवांची केंविलवाणी स्थिति एकदम पालटून त्यांची मर्जी इतर कुटुंबीय लोक संभाळण्याची शिकस्त करतील.

एकत्र कुटुंबांत अगदीं टाकाऊ आणि नादान पुरुष कांहीं थोडे नसतात ! कदाचित् अशांचाच भरणा विशेष असतो. पण त्यांच्या वाटेस कोणी जातो का ? ज्याला त्याला भीति वाटते कीं, यांनीं डोक्यांत राख घातली व वांटणी मागितली तर काय करतां ! स्त्रियांना हिस्सा दिला तर मिळकतीचे तुकडे पडतील, स्त्रिया फसतील आणि तिऱ्हाइतांच्या घरांत मिळकत जाईल असा एक मोठा आक्षेप घेण्यांत येतो. जास्त मुलगे झाल्यानें मिळकतीचे लहान लहान भाग पडतील याची कोणीं फिकीर वाहिली आहे का ? मग विधवेमुळें एक एक हिस्सा जास्त पडेल म्हणून कासावीस होण्याचें काय कारण ? विधवांना त्यांचे न्याय्य हक्क देऊन सन्मानानें इतर पुरुषहिस्सेदार जर वागतील तर तिसरा माणूस मधें शिरेल तरी कसा आणि कशासाठीं ? व विधवा फसून त्याला मिळकती देतील तरी कशा ? इतउप्पर समजा, एकाद्या विधवेनें आपला हिस्सा तुटक करून घेतला आणि माहेरच्या माणसांना दिला, तरी त्यांत एवढी खंत बाळगण्याचें कारण नाहीं. पुरुष हिस्सेदार आपल्या सासुरवाडीचीच काय पण रखेलीचीहि धन करतात त्याचें काय ? अमुक मिळकत एकदां एका व्यक्तीच्या मालकीची झाली म्हणजे तिचा विनियोग कसा करावा याबद्दल कायद्याचें नियंत्रण तिच्यावर असूं नये. मिळकत ही नेहमीं उप-

भोगाकरितां आहे आणि परिस्थिति जशी असेल त्याप्रमाणें तिचा विनियोग व्हावा हें उचित आहे. पुरुषांच्या मालकीवर नियंत्रण नाहीं. स्त्रियांना हिस्सा न दिल्यानें मिळकत कुटुंबांत राहण्याचा उद्देश आज तरी पार पडतो का? पुरुष हिस्सेदार ती एका क्षणांत उडवूं शकतातच ना? म्हणून स्त्रियांनीं एकमुखानें सहभागीदारीहक्कांचीच मागणी करावी. सुवासिनी-बद्दल मागील प्रकरणीं जी सूचना केली आहे तीच विधवेलाहि लागू आहे. तथापि सध्यांच्या विपरीत कायद्याच्या धोरणानें विधवेच्या हक्कांबद्दल सूचना कराव्या लागत आहेत, त्या अशा—

पत्नी म्हणून जो तिला सहभागीदारीचा हक्क मिळावयाचा तो पतीच्या मरणानें नष्ट होऊं शकत नाहीं.

नवऱ्याला मुलगा नसेल तर एकत्र कुटुंबांतील त्याच्या हिश्श्याची मालकी त्याच्या विधवेकडे यावी.

तिच्या नवऱ्यास मुलगे असतील तर मग तो विभक्त असो अगर अविभक्त असो त्याच्या विधवेस एका मुलाइतका हिस्सा मिळावा.

विधवेस मिळणारा हिस्सा अगर अंश वांटणीनें निराळा करून मागण्याचा हक्क तिला मिळावा.

डॉ. देशमुख यांनीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत आणलेलें स्त्रियांच्या हक्कां-संबंधींचें बिल वरिष्ठ कायदेकौन्सिलांत बहुमतानें पास झालें. त्यास गव्हर्नर जनरलांनीं मंजुरी दिली आहे व तो आतां कायदा म्हणून अंमलांत आला आहे.

बिलाची भाषा थोडक्यांत अशी—

(१) (अ) सन १९३७ सालच्या हिंदु स्त्रियांच्या मिळकतीच्या हक्कासंबंधींचा हा कायदा होय. (२) त्याची व्याप्ति बलुचिस्थान आणि सोथल परगण्यासुद्धां सर्व ब्रिटिश हिंदुस्थानांत राहील. (संस्थानांत हा कायदा लागूं पडणार नाहीं हें उघड आहे.)

(२) हिंदु कायद्याचा नियम, धोरण व रीतिरिवाज कसेहि विरुद्ध असोत, कलम ३ यांत नमूद केलेलें धोरण कोणीहि हिंदु मनुष्य मृत्युपत्र केल्याशिवाय विधवा पत्नीस मागें ठेवून मृत झाला तर त्यास लागूं पडेल.

(३) (१) कोणी हिंदु मृत्युपत्र न करतां स्वसंपादित मिळकत मागें ठेवून मरण पावेल तर ती त्याची स्वसंपादित मिळकत त्याची विधवा आणि

मुलगे यांना वारसाई हक्कानें मिळेल. जणूं विधवाहि मुलगाच होय. प्रथम मयत झालेल्या मुलाच्या विधवेस मुलाप्रमाणेंच वारसा मिळेल. पण तिला मुलगा असेल तर त्या मुलाबरोबरीनें तिला वारसा मिळेल. मयत नातवाच्या विधवेसहि हाच नियम लागू पडेल. (२) मयत इसमाचा अविभक्त हिंदु कुटुंबाच्या समाईक मिळकतींत जो कांहीं हक्कहितसंबंध असेल तो त्याच्या पश्चात् त्याच्या विधवेस मिळावयाचा आहे. ( ३ ) या कायद्याखालीं स्त्रियांना मिळणारें मिळकतीवरचें स्वामित्व मर्यादित राहील, पण पुरुष-मालकाप्रमाणें वांटणी मागण्याचा त्यांना हक्क राहील.

(४) हा कायदा अंमलांत येण्याच्या अगोदर जो कोणी हिंदु मयत झाला असेल, त्याच्या मिळकतीस यांतील धोरण लागू पडणार नाहीं.

येणेंप्रमाणें या नवीन कायद्याची भाषा आहे. बंगालमध्यें दायभाग-पद्धति अंमलांत आहे व त्या पद्धतीला धरून ठरविलेलें धोरण कलम ३ पैकीं पोटकलम १ यांतलेंच लागू आहे. पण त्याविषयीं जास्त विस्तारानें लिहि-ण्याचें कारण नाहीं.

**बिलांतील प्रमुख बाबती—**

या कायद्यांत प्रमुख अशा गोष्टी पाहूं गेलें तर त्या अशा —

(१) मयताची स्वसंपादित मिळकत पुत्रांबरोबर विधवेस वारसांत सारख्या हक्कानें मिळते.

(२) विधवा सून अगर विधवा नातसून यांना मुलाच्या अगर नात-वाच्या ठिकाणीं वारसाई हक्कासाठीं गणण्यांत येईल.

(३) अविभक्त हिंदु कुटुंबांतील मयताचा समाईक मिळकतींतील हक्कहितसंबंध त्याच्या विधवेस मिळेल.

(४) स्त्रियांना मिळणारें मिळकतीवरील स्वामित्व हें मर्यादित असेल.

(५) विधवेला वांटणी मागण्याचा हक्क राहील.

(६) हा कायदा अंमलांत येण्यापूर्वी झालेल्या विधवांना याचा फायदा मिळणार नाहीं.

या प्रमुख सहा बाबती निवडल्या आणि त्यांचा बारकाईनें विचार केला तर, व मर्यादित स्वामित्वाची नंबर ४ ची बाब वगळली तर, हिंदु

इंग्रज वाचनालय, सातारा



विधवांचा प्रश्न बऱ्याच कुशलतेनें आणि यशस्वीपणें सोडविण्यांत आला आहे असें म्हणावें लागेल.

## नवीन धोरण--

नवीन बिलानें मुख्य जर कोणती गोष्ट केली असेल तर विधवेला आश्रितांच्या मालिकेंतून काढून सहभागीदाराच्या मानाच्या दर्जावर आणून तिला बसविलें. नवऱ्याच्या स्वसंपादित मिळकतींत मुलांच्या बरोबरीनें तिचा हक्क मानण्यांत आला आहे. आणि एकत्र कुटुंबांत नवऱ्याच्या पश्चात् नवऱ्याच्या जागीं तिला आणून बसविलें आहे. एकत्र कुटुंबांत तिचा नवरा जर निपुत्रिक वारला तर त्याचा सर्व हिस्सा त्याच्या विधवेस आतां मिळेल आणि त्यांत मुलगे असले तर एका मुलाच्या बरोबरीनें तिला हक्क मिळेल. तिला पुरुष सहभागीदारांच्या बरोबरीनें आणून बसविल्यामुळें अन्नवस्त्र व घरांत राहण्याचा हक्क या बाबती आपोआपच चुटकीसरशा सुटल्या. अन्न-वस्त्र किती द्यावें, अन्नवस्त्राच्या हक्काचा कायदेशीर बोजा मिळकतीवर ठेवावा कीं नाहीं, आणि तो हक्क सुरक्षित करण्यासाठीं कोणत्या तऱ्हेची उपाययोजना करावी, हे जिकीरीचे प्रश्न आपोआपच सुटले. विधवेला सर्वसाधारणपणें मुलाबरोबर आणि मुलाप्रमाणें हक्क दिल्यामुळें ती मिळ-कतीची वांटणी करून घेईल आणि त्यांतच तिला निर्वाह करावा लागेल. मिळकत विकत घेणारे यापुढें विक्रीच्या व्यवहारास कुटुंबांतील विधवांची संमति आहे कीं नाहीं त्याची चौकशी करतील; पुष्कळ व्यवहारांत त्यांच्या सह्या मागतील. पूर्वीप्रमाणें विधवांना वगळून व्यवहार होणार नाहींत आणि त्यांना वगळून अगर त्यांच्या संमतीवांचून केलेल्या व्यवहारांनीं त्यांच्या हक्कावर कोणत्याहि प्रकारचा घाला पडणार नाहीं.

विधवेला पुरुषसहभागीदाराच्या पंक्तीला आणून बसविल्यानें तिच्या हक्कांचें पुरुषाच्या बरोबरीनें संरक्षण होईल. कुटुंबाचा कर्ता म्हणून जे कांहीं अधिकार प्रमुख व्यक्तीला (यापुढें विधवा हीसुद्धां कुटुंबाचा व्यवस्थापक होऊं शकेल) असतात, जसें--कुटुंबाच्या पोषणार्थ, संरक्षणार्थ, अवश्य धर्म-क्रिया, अविवाहित मुलींचीं लग्नें, इत्यादि कारणांसाठीं सर्व मिळकत विकण्याचा अगर गहाण टाकण्याचा त्याला अधिकार असतो--त्या अधिकारांत कुटुंबाचे

जरूरीचे व्यवहार ती व्यक्ति करील त्या त्या वेळीं त्या विधवेच्या हक्कावर-सुद्धां परिणाम होईल. म्हणजे या बिलानें आजच्या कुटुंबव्यवस्थेची घडी यत्किंचित्हि न बिघडवितां पुरुषांच्या बरोबरीनें विधवेला अगदीं समानहक्क दिला आहे, हें या बिलाचें विशेष आहे. विधवा ही कुटुंबांत सहभागीदार होते हें तत्त्व एवढें सर्वव्यापि आणि सर्वक्षम आहे कीं त्यांतूनच सर्व समान हक्कांचा पसारा सहजासहजीं विकास पावेल. आजचा मर्यादित अधिकार जो या बिलांत कायम ठेवला आहे, तोहि आपोआपच कालांतरानें नष्ट होईल. मर्यादित अधिकाराचें हें गालबोट या बिलास कमीपणा आणतें, पण या चिमकुल्या बिलास दृष्ट पडूं नये (अनुमोदक आणि विरोधक या दोघांची) म्हणूनच कीं काय, हें गालबोट सिलेक्ट कमिटीनें त्याला लावलें आहे.

या बिलांत मर्यादित स्वामित्वाचें धोरण कायम ठेवल्याचें जाहीर केल्यानें स्त्रियांची बरीच निराशा होईल. मुलींबद्दल कांहींच तजवीज यांत केलेली नाहीं, हीहि एक असमाधानाची दुसरी बाब होय. पण या दोन्ही बाबतींत डॉ. देशमुखांचें पहिलें बिल पूर्ण हक्कदान करणारें होतें. सिलेक्ट कमिटीकडे बिल पाठविण्याच्या वेळींच, मुलींच्याबद्दलचा प्रश्न सध्यां गाळून टाकला तरच सर्व सभासदांचा पाठिंबा मिळेल, असें बजावण्यांत आल्यावरून तेवढी बाबत खास गाळावी लागली. खुद्द सिलेक्ट कमिटींत ओढाताण होऊन कांहींतरी तडजोडीनें हें बिल घडविण्यासाठीं मर्यादित स्वामित्वाचें तत्त्व त्यांत कायम ठेवावें लागलें असें वाटतें. एका अर्थीं हें तत्त्व कायम ठेवलें होतें म्हणून त्या बिलास विशेष विरोध झाला नाहीं, हेंहि तितकेंच खरें.

स्त्रियांच्या हक्कासंबंधीं हें बिल कायदा म्हणून आतां अंमलांत आलें आहे. त्यांतील मर्यादित स्वामित्वाचें कलम गाळणें हें पुढील कायदेकौन्सिलांना अगदीं सोपें जाईल. या कायद्याचा अंमल होण्यापूर्वीं ज्या विधवा झाल्या असतील त्यांना याचा फायदा मिळावयाचा नाहीं, हा उघड उघड अन्याय दिसतो खरा; पण त्याला उपाय नाहीं. नवीन हक्क उत्पन्न करणाऱ्या काय-द्याचा पश्चात्दर्शी अंमल कधींच असूं शकत नाहीं. पूर्वींच तिऱ्हाईत माणसाचे हक्कहितसंबंध प्रस्थापित झाले ते नवीन कायद्याला काढून घेतां येत नाहींत; नाहीं तर अनवस्था प्रसंग ओढवेल. म्हणून यांत दिसणारा अन्याय सर्वसाधारण रीतीला न्याय्यच वाटेल.

# प्रकरण ९ वें

# मालकीहक्काचें स्वरूप

## मर्यादित स्वामित्व—

वर मर्यादित स्वामित्व याचें थोडें दिग्दर्शन केलें आहे. आणि विधवेस मिळणाऱ्या मिळकतीवर तिचें स्वामित्व मर्यादित असतें असें म्हटलें आहे. मर्यादित स्वामित्व याचा अर्थ असा कीं, त्या स्त्रीला त्या मिळकतीचें उत्पन्न असेल तेंच खर्च करण्याचा अधिकार. खद्द मिळकतीपैकीं एक कवडीहि तिला दुसऱ्याला देऊन टाकतां येत नाहीं. कल्पना अशी आहे कीं, तिनें ती मिळकत जशीच्या तशी संभाळून ठेवावी व तिच्या मरणानंतर तिच्या नवऱ्याच्या वारसाला ती मिळकत मिळावी. हे जे वारस त्यांना कायद्यांत उत्तराधिकारी म्हणतात. कांहीं कांहीं कारणांसाठीं, उदाहरणार्थ, कुटुंबाच्या व स्वतःच्या पोषणासाठीं, मिळकतीचें संरक्षण करण्यासाठीं, आवश्यक धर्मक्रियेसाठीं, मुलींच्या लग्नासाठीं, तिला मिळकतीवर कर्ज काढण्याचा व मिळकत गहाण-खरेदी देण्याचा हक्क असतो. आणि हें तिच्या मालकीवर घातलेलें नियंत्रण व जरूरीच्या कारणासाठीं मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा तिचा हा अधिकार हींच भांडणाचीं मुळें होत. तीं भांडणें कशा तऱ्हेचीं असतात तें आपण पाहूं.

## तंट्याचें व नुकसानीचें मूळ—

विधवेनें कोणताहि व्यवहार केला अगर कांहीं मिळकत कोणास लिहून दिली तर असा व्यवहार तिनें योग्य कारणांवांचून केलेला आहे म्हणून विधवेच्या पश्चात् तो मला बंधनकारक नाहीं, असें ठरवून घेण्यासाठीं उत्तराधिकारी दावे आणूं शकतात. त्यांत विधवेनें केलेले व्यवहार कायम ठरतात अगर रद्द होतात. विधवेचें म्हणणें असें असतें कीं, योग्य कारणासाठींच तिनें तो व्यवहार केलेला आहे. उत्तराधिकारी यानें आणलेल्या दाव्यांत सदर व्यवहार रद्द ठरला तरी विधवेला तो तिच्या हयातीपर्यंत बंधनकारक

असतोच. समजा, एकादें शेत तिनें कारणांवांचून विकलें व तिला किंमतहि योग्य मिळाली नाहीं; तरी विक्री तिच्या हयातीपर्यंत कायम राहते व खरेदी ठेवणारा मिळकतीचा कबजा घेतो व उत्पन्नहि खातो. तिला संपूर्ण मालकी नाहीं म्हणून खोटीं कारणें दाखवून, मिळकत विकून हातांत रोकड जमवण्याच्या मोहानें पुष्कळ वेळां असे व्यवहार ती करते. विधवेला साधारणतः मिळकत विकण्याचा हक्क नाहीं हें सर्व लोक जाणून असतात, म्हणून भर किंमत देऊन विधवेपासून मिळकत विकत घेण्यास चांगल्या माणसांतून कोणी धजत नाहीं. खटपटी, लबाड, कावेबाज सावकार पुढें येतात. मिळकतीची पुरीपुरी किंमत सहसा उपजत नाहींच; फार काय–पण प्रत्यक्ष लिहिलेल्या किंमतीपैकीं अर्धीहि रक्कम विधवेच्या पदरांत पडते कीं नाहीं याची शंकाच असते. आणि सावकारानें तरी काय करावें? उत्तराधिकारी यानें दावा आणला आणि तो व्यवहार रद्द ठरला म्हणजे त्याचें नुकसानच. तेव्हां या धास्तीच्या व्यवहारांत तो पडतो तेव्हां स्वतः न फसेल अशा बेतानेंच सावकार पैसे मोजतो. या मर्यादित स्वामित्वामुळें जितके खोटे, फसवाफसवीचे व्यवहार घडून येतात तितके इतरत्र घडून येत नाहींत. त्यांत विधवा आणि उत्तराधिकारी यांपैकीं कोणासहि फायदा होत नाहीं. मात्र असल्या निष्फळ दाव्यांचा कोर्टांत पूर लोटतो. त्यापायीं जनतेचा पैसा आणि सरकारचा काळ यांचा अगदीं अपव्यय होतो. मुलीला मिळणारी मिळकत ही संपूर्ण मालकीची असते आणि त्या मिळकतीचे व्यवहार करीत असतांना ती फसली आहे अगर योग्य किंमत तिला उपजली नाहीं असें क्वचितच आढळेल. तात्पर्यार्थ एवढाच कीं, मिळकत संरक्षणाकरितां काढलेलें हें मर्यादित स्वामित्वाचें तत्त्व मिळकतीची वाताहात लावण्यासच कारणीभत होतें.

## ऐतिहासिक समालोचन—

या हक्काचा आपण थोडा इतिहास पाहूं. जुन्या काळीं स्त्रीधन म्हणून जी मालकीची कल्पना हिंदु कायद्यानें मान्य केली, तिच्यांतील उदार धोरण आजच्या सुधारलेल्या पाश्चात्य कायद्यांत तत्सम धोरणावर मात करणारें आहे. स्त्रीधन म्हणजे नवऱ्याच्या इच्छेला न जुमानतां ज्या मिळकतीचें दान, विक्री आणि उपभोग स्त्रीला स्वतंत्रपणें घेतां येतो ती मिळकत.

तदेव च स्त्रीधनं यद् भर्तृतः स्वातंत्रेण दानविक्रयभोगान्कर्तुमधिकरोस्ति दायभागः ॥

स्त्रियांच्या मिळकतीवरच्या स्वतंत्र मालकी हक्कास हिंदु समाजाच्या अवनतीचें ग्रहण घेरूं लागलें आणि असा एक काळ येऊन ठेपला कीं, तिला हक्क असावा कीं नाहीं हाच मुळीं वादग्रस्त प्रश्न होऊन बसला. वेदकालानंतरचा धर्मशास्त्रकार बौद्धायन यानें वैदिक धर्मांतहि स्त्रियांना मिळकतीचें स्वामित्व देण्यांत आलें नव्हतें असें प्रतिपादन केलें. तैत्तिरीय संहितेंतील एका ऋचेचा भलताच अर्थ करून स्त्रिया ह्या अशक्त आहेत म्हणून त्यांना भाग मिळत नाहीं असें प्रतिपादन केलें. बौद्धायनाचा सिद्धान्त हा (तस्मात्स्त्रिया निरिन्द्रिया अदायादाः) वेदांतील स्पष्ट अर्थाविरुद्ध आहे असें विद्यारण्यानें प्रस्थापित केलें. इंद्रिय या शब्दाचा संदर्भ मिळकतीच्या मालकीहक्काकडे नसून सोमरस कोणीं घ्यावा याकडे आहे. (इंद्रिय शब्दस्य इंद्रियं वै सोमपीतः) म्हणजे इंद्रिय याचा अर्थ जो सोमरस पितो तो. तेव्हां स्त्रियांना सोमरस फार चढतो म्हणून त्यांना तो देऊं नये, एवढाच त्या ऋचेचा अर्थ. जैमिनीनें हा धर्मशास्त्राचा भ्रष्टाकार थांबविण्याची शिकस्त केली, पण अनीतीच्या उतरंडीला लागलेला हिंदुसमाज अगदीं रसातळाला यऊन पोहोंचला होता. तेव्हां त्याचें म्हणणें कोणाला पटेना. नंतरच्या स्मृतिकालांत स्त्रीधन या व्याख्येंत कोणकोणच्या तऱ्हेची मिळकत येऊं शकते हा एक मोठाच वादाचा विषय होऊन राहिला होता. एक पक्ष स्त्रीधनाच्या व्याख्येची कक्षा वाढवा असा हट्ट धरीत होता तर दुसरा पक्ष स्त्रीधनाच्या शब्दाची व्याप्ति संकुचित करून मालकीचें तत्त्वच धुळीस मिळविण्यासाठीं चंग बांधून उभा होता. स्त्रियांना वारसा मिळूं नये असा सिद्धांत मान्य झाला. तथापि अपत्यप्रेमापुढें निष्ठुर कायद्यानें कच खाल्ली आणि मुलीचा वारसाहक्क पहिल्यानें मान्य करण्यांत आला. तिच्या पाठोपाठ विधवेचा वारसा हक्क वृद्धमनु, नारद, मनु, शंख इत्यादि स्मृतिकारांनीं कबूल केला तरी याज्ञवल्क्य यांनीं स्पष्टोक्तीचा आधार घेऊन खऱ्या वारसाहक्काचा पुरस्कार (पत्नीदुहितरश्चैव पितरौ) धर्मपत्नी, मुली, आईबाप वगैरे हे वारस आहेत या श्लोकांत केला. तथापि स्त्रियांच्या हक्काचा पुरस्कार मिताक्षरा या टीकेचा कर्ता विज्ञानेश्वर यानें निर्भयपणानें केला. स्त्रीधनाची व्याख्या याज्ञवल्क्यांनीं अशी केली आहे

कीं, बाप, आई, नवरा, भाऊ यांनीं अग्नीसमक्ष दिलेलें तसेंच नंतर दिलेलें इत्यादि धन स्त्रीधन समजावें.

पितृमातृपतिभ्रातृदत्तमध्यग्न्युपागतम् ।
आधिवेदनिकाद्यं च स्त्रीधनं परिकीर्तितम् ।। —याज्ञवल्क्य.

विज्ञानेश्वरानें कायद्यांत सुधारणा करण्याची सोन्यासारखी चालून आलेली संधि वांया जाऊं दिली नाहीं. त्यानें स्त्रियांना स्वतंत्र स्वामित्व मिळतें असा सिद्धांत प्रस्थापित केला. याज्ञवल्क्यस्मृतीवर मिताक्षरा हा टीकाग्रंथ आहे. तेव्हां याज्ञवल्क्याच्या मूळच्या ह्या श्लोकांतील संस्कृत आद्य, कीं ज्याचा मराठींत अर्थ 'इत्यादि' केला आहे, त्या शब्दाचा अर्थ लावतांना त्यानें सांगितलें कीं, आद्य किंवा इत्यादि शब्दांत स्त्रीला वारशानें, परोक्तामुळें, विक्रीमुळें, वांटणीमुळें, सांपडल्यामुळें किंवा संपादल्यामुळें जी मिळकत मिळते ती मिळकत तिचें स्त्रीधन आहे; व

आद्य शब्देन रिक्थक्रयसंविभागपरिग्रहाधिगमप्राप्तमेतस्त्रीधनम् ।। मिता.

विज्ञानेश्वरानें लावलेला हा अर्थ चुकीचा आहे, मनुस्मृति आणि कात्यायनस्मृति यांचा अर्थ लक्षांत न घेतां त्यानें हें ठोकून दिलें आहे असें त्यावर एकच काहूर उठलें. पण वीरमित्रोदय, सरस्वतीविलास या ग्रंथांनीं, तसेंच अपरार्क, कमलाकर, नंदपंडित यांनीं विज्ञानेश्वराची व्याख्या मान्य केली आहे. विज्ञानेश्वरानें केलेली सुधारणा त्या काळाला झेंपणारी नव्हती आणि जीमूतवाहनासारख्या कायदेसुधारकानें जेव्हां त्यावर शस्त्र उचललें तेव्हां त्याचें म्हणणें लोकांनीं आतुरतेनें ग्रहण केलें. मिताक्षरेचा अधिकार मोठा, तेव्हां जीमूतवाहनानें आपलें म्हणणें सिद्ध करण्यासाठीं कात्यायनाचे दोन श्लोक आधार म्हणून घेतले. ते असे, पतीनें दिलेलें धन त्याच्या पश्चात् पत्नीनें मर्जीस येईल त्याप्रमाणें खर्च करावें. परंतु त्याच्या हयातींत तें रक्षण करावें किंवा त्याच्या नातेवाइकांच्या हवालीं करावें. शुद्धाचरण ठेवणाऱ्या निपुत्रिक विधवेस पतीच्या मिळकतीचा यथास्थित उपभोग घेण्याचा आमरण हक्क आहे आणि त्यानंतर मिळकत वारस घेतात.

भर्तृदायं मृते पत्यै विन्यसेत् स्त्री यथेष्टतः ।
विद्यमाने तु संरक्षेत् क्षपयेत् तत्कुलेऽन्यथा ।।

अपुत्रा शयनं भर्तुः पालयन्ती गुरौ स्थिता ।
भुंजीतामरणात्क्षांता दायादा ऊर्ध्वमाप्नुयुः ॥

हे दोन्ही श्लोक पतीनें पत्नीस बक्षीस दिलेल्या मिळकतीसंबंधानें आहेत. वारसावांटणींत, विक्रींत, मिळालेल्या मिळकतीसंबंधानें ते नाहींत. कात्यायनस्मृति संपूर्ण उपलब्ध नाहीं. तेव्हां वांटणी आणि वारसा यांस त्यानें काय धोरण लाविलें होतें तें कळण्यास मार्ग नाहीं आणि यांनाहि हेंच धोरण लावण्याचा त्याचा अभिप्राय होता असेंहि म्हणतां येत नाहीं. 'भर्तृदाय' या शब्दाची ओढाताण करून भलताच अर्थ टीकाकारांनीं त्यांतून काढला आहे. दाय या शब्दाचे अर्थ दोन, बक्षीस आणि वारसा. तेव्हां बक्षीस आणि वारसा या दोन्ही अर्थांचा समावेश करूनच कात्यायनानें धोरण ठरविलें असलें पाहिजे असें टीकाकारानें नमूद केलें. तो म्हणतो, अशा प्रकारें नवऱ्याची मिळकत त्याच्या विधवेकडे आली असतां तिला तिची विल्हेवाट लावण्याचें स्वातंत्र्य नाहीं असें ठरविल्यानें शब्दार्थामुळें इतर आकांक्षा मनांत उत्पन्न होतात. इतर प्रसंगीं मिळकतीची काय व्यवस्था होईल ही आकांक्षा अतृप्त राहील. तेव्हां ज्याप्रमाणें नवऱ्यानें बक्षीस दिलेल्या स्थावर मिळकतीवर तिचा अधिकार नाहीं, तसा नवऱ्यानंतर मिळालेल्या स्थावर मिळकतीवरहि अधिकार नाहीं.

एवं च मृतस्य पत्युः स्थावरे भार्यासंक्रावन्तेऽपि न तस्यादीनादौ स्वातंत्र्यम् आकांक्षातौल्यात् । अन्यथा तत्र कीदृशी व्यवस्था स्यात् इत्याकांक्षा अपूर्णैव तिष्ठत् । यथा पति दत्ते स्थावरे अनाधिकारः तथा पत्युः स्थावरेऽपि स्त्रीसंक्रान्ते ॥ —विवादचिंतामणिः

एकाच शब्दाचे दोन अर्थ होत असले म्हणजे एक अर्थ धरून जें उचित तेंच दुसऱ्या अर्थालाहि लागू करावें. सैंधव याचे अर्थ मीठ आणि घोडा असे आहेत. सैंधव खाण्याचा खारट पदार्थ आहे, हा मिठाबद्दल उल्लेख झाला. पण घोड्याचें काय, अशी आकांक्षा सैंधवाच्या दुसऱ्या अर्थानें मनांत उभी राहिली तर ती आकांक्षाहि तृप्त करण्यासाठीं जें मिठाबद्दल तेंच घोड्याबद्दल असा पंडिती निर्णय द्यावा व घोडा खाण्याचा खारट पदार्थ आहे असा एक नवीनच सिद्धान्त प्रस्थापित करावा; हा प्रकार जेवढा अडाणीपणाचा आहे तितकाच अडाणीपणा मिळकतीच्या स्वामित्वाबद्दल कात्यायनाच्या वचनाचा अर्थ लावण्यांत झाला आहे. प्रथम स्थावर इस्टेटीपुरताच हा निर्बंध होता;

पण जंगम मिळकतीसहि हेंच तत्त्व लागू करण्यांत आलें. तेव्हां आजमितीस स्थावर आणि जंगम अशा दोन्ही प्रकारच्या मिळकतींवर विधवेस मर्यादित स्वामित्व मिळतें असें ठरलें आहे. टीकाकारानें हें मर्यादित स्वामित्वाचें तत्त्व मुलीलाच काय पण मुलीच्या मुलाला मिळणाऱ्या मिळकतीस लागू केलें आहे. मुंबई इलाख्यांत सुदैवानें मुलींना स्वतंत्र स्वामित्व कायद्यानें दिलेलें आहे. असा हा स्त्रियांच्या आर्थिक स्वामित्वाचा इतिहास आहे.

## अन्याय कसा झाला?—

वास्तविक मिताक्षरा हा ग्रंथ न्यायासनावरून थेट प्रीव्ही कौन्सिलपर्यंत शिरसा वंद्य मानला जातो. आणि मिताक्षरा ग्रंथांत हरएक प्रकारें मिळणाऱ्या मिळकतीवर स्त्रीचें स्वतंत्र स्वामित्व आहे, असें स्पष्ट नमूद केलेलें असतांनाहि मर्यादित स्वामित्वाचें उंटाचें पिलूं हिंदुधर्मशास्त्राच्या संसारांत टीकाकारांनीं आणून सोडलें; आणि तें वाढत जाऊन सर्वांत श्रेष्ठतेची प्रतिष्ठा मिरवूं लागलें. जीमूतवाहन याच्या ग्रंथाचा अधिकार फक्त बंगाल प्रांतापुरताच ग्रहण करण्यांत येतो; इतरत्र मिताक्षरेंतील तत्त्वाचीच सत्ता अबाधित असते. असें असूनहि मिताक्षराच्या स्पष्ट अभिप्रायास धाब्यावर बसवणारें हें मर्यादित स्वामित्वाचें तत्त्व स्त्रियांच्या हातांतील सत्ता काढून घेऊं शकलें आणि त्यांना दीनवाणी करण्यास कारणीभूत झालें.

## हें तत्त्व घातुक व असमर्थनीय आहे—

मर्यादित स्वामित्वाचें हें तत्त्व स्त्रियांच्या नालायकीचा शिक्का आहेच; तसेंच तें सहमालकीच्या त्यांच्या हक्कास मूठमाती देणारें आहे. मिळकत गहाण, बक्षिस अगर दान देण्याचा तिला अधिकार नाहीं, या सिद्धांतांतून दोन स्पष्ट अर्थ निघतात. असें कांहीं नियंत्रण ठेवलें नाहीं तर स्त्री मिळकत उडवून टाकील इतकी ती जात्याच नालायक आहे हा एक अर्थ; व दुसरा एक अर्थ असा कीं, तिच्या हातीं येणारी मिळकत तिच्या मालकीची नाहींच. स्त्रियांची लायकी नव्यानें प्रस्थापित केली पाहिजे असें नाहीं. स्त्रीधनाची जी कल्पना धर्मशास्त्रांत पुरातन कालापासून चालत आली आहे, तिचा आधारच त्यांच्या व्यवहारकुशलतेवर आणि लायकीवर आहे. मिळकतीचें जतन

५१०९१८
२११'७५

करण्याकडे व द्रव्याचा संग्रह करण्याकडे स्त्रियांची उपजत वृत्ति सुप्रसिद्धच आहे. मुलीला मिळणारी मिळकत तिच्या स्वतंत्र मालकीची; आणि त्याची व्यवस्था ती वाटेल तशी करूं शकते असें कायदा मानतो. पण समजा, त्याच मुलीला नवऱ्याची वारस म्हणून सासरची मिळकत मिळाली आहे तर त्या मिळकतीपुरती ती मालकीहक्क गाजवण्यास नालायक असें आजचें विचित्र कोडें हिंदु कायदा पुढें टाकतो. नालायकी असेल तर सरसहा नालायकी असावी. विधवेच्या हातीं येणारी मिळकत ती उडवून टाकील ही कल्पनाच खोटी आहे. नवरा जिवंत असतांना जिनें काटकसरीनें आणि मेहनतीनें धनाच्या अणूंचा ऐरावत केला, ती नवरा मरतांच बेफाम होऊन मिळकतीची वाताहात उडवून देईल हें कितपत संभवतें? तेव्हां नालायकीचा आरोप फोल ठरतो. तिच्या हातांत येणाऱ्या मिळकतीवर तिची मालकी नाहीं हें म्हणणें कितपत टिकणारें आहे तें पाहूं. नवऱ्याच्या हयातींत ती नवऱ्याची सहभागीदारीण झाली आणि तो तिचा मालकीहक्क पतीच्या मरणानें नष्ट होत नाहीं असें गृहीत धरलें म्हणजे नवऱ्याच्या पश्चात् तिच्या हातीं येणाऱ्या मिळकतीवर तिची मालकी नसते हें म्हणणें अनेक प्रकारें चुकीचें आहे. मुलगा, बायको, मुलगी, आई, बाप, भाऊ, पुतणे, गोत्रांतील पुरुष आणि बंधु हे यथाक्रम मरणाराचे वारस होत असें ज्या धर्मवचनानें ठरविलें त्यांत मिळकतीच्या मालकीबद्दल भेदभाव कोठेंच दाखविला नाहीं. पुरुषांना वारसा मिळेल तर तो स्वतंत्र मालकीचा व स्त्रियांना मिळेल तेव्हां मर्यादित मालकीचा असा भेदभाव शास्त्रकारांच्या मनांत असणें संभवत नाहीं, आणि तसा भावार्थ तर्कदुष्ट आहे. एकाद्या माणसाची मिळकत त्याच्या मरणानंतर दुसऱ्याकडे वारसाहक्कानें जाते, त्या वेळीं मयत इसमाचे जे हक्क असतील ते सर्व वारसास मिळतात. तेव्हां नवऱ्याचा अगर मुलाचा वारसा ज्या वेळेस विधवेला मिळतो त्या वेळेस तिला मयत पुरुषाचे असलेले सर्व हक्क ज्या त्या स्वरूपांत मिळाले पाहिजेत. मयत इसम हा संपूर्ण मालक होता तेव्हां ती संपूर्ण मालकी तिला मिळाली पाहिजे.

**दानधर्मासहि आडकाठी—**

मर्यादित स्वामित्वानें कोणाचाच फायदा होत नाहीं. आणि जरूरीच्या

वेळीं तिला मिळालेल्या सवलतीचा कांहींच उपयोग होत नाहीं याचें दिग्दर्शन वर केलेंच आहे. ज्या कारणासाठीं तिला मिळकतीची विल्हेवाट लावता येते तीं कारणें थोडीं व जुनींपुराणीं आहेत. विधवेनें आवश्यक धर्मक्रिया करण्यांत खर्च केला तरी ती धर्मक्रिया मयताच्या आत्म्यास सद्गति देण्यासाठीं केलेली असावी लागते. विधवा स्वतःच्या मनःशुद्धीकरितां काशीला जाऊन आली तर तिचा तो खर्च अयोग्य समजला जाईल. पण तीच जर ती प्रयागला जाऊन नवऱ्यास पिण्डदान देऊन परत येईल तर असा खर्च कायदेशीर समजला जातो. विधवेच्या स्वतःच्या मानसिक उन्नतीसाठीं कांहींच खर्च करण्याचा अधिकार तिला नाहीं. तिनें नवऱ्याच्या नांवानें लोकोपयोगी संस्थेस द्रव्यसहाय केलें तर तो खर्च योग्य समजला जात नाहीं. कारण त्यामुळें नवऱ्याच्या आत्म्यास सद्गति मिळाली असें म्हणतां यावयाचें नाहीं. शिक्षणसंस्था, इस्पितळें, अनाथगृहें, सामाजिक चळवळी, मंदिरांचे जीर्णोद्धार इत्यादि लोकोपयोगी व आजच्या घटकेला मदतीस योग्य अशा संस्थांस तिला मिळकत देतां येत नाहीं. तिनें पाहिजे तर नवऱ्याचीं श्राद्धें करावींत; आणि त्यापायीं होणारा खर्च योग्य समजला जातो.

तेव्हां मिळकतीच्या स्वामित्वाबद्दल अशी सूचना करावयाची कीं, वारसा, वांटणी, विक्री, बक्षीस व अन्य तऱ्हेनें त्यांना मिळणाऱ्या मिळकतीवर स्त्रियांचा संपूर्ण मालकीहक्क असावा.

### उत्तराधिकारी वारसाच्या हक्कांची छाटाछाट—

वर जी सूचना केली आहे ती मान्य केली तर उत्तराधिकारी वारसांच्या त्रासापासून विधवांची कायमची सुटका होईल. विधवेच्या मरणानंतर राहिलेली मिळकत नवऱ्याचे वारस म्हणून त्यांना मिळावी यास कोणीच हरकत घेणार नाहीं. विधवेला आपण मिळकतीवर संपूर्ण मालकी देतो तेव्हां तिनें मिळकतीची विल्हेवाट लावली नसेल तर राहिलेली मिळकत त्यांना मिळेल. विधवा ही संपूर्ण मालक असल्यानें तिनें केलेल्या व्यवहारांस हरकत घेण्याचा त्यांना हक्क उरणार नाहीं. पण जर वर केलेली सूचना ग्राह्य झाली नाहीं किंवा बडोदा कमिटीनें सुचविल्याप्रमाणें अमुक

एका किंमतीची मर्यादा ठरवन त्याच्या आंतील मिळकतीवर स्वतंत्र स्वामित्व द्यावें व त्यापेक्षां जास्त किंमतीच्या मिळकतीपुरतें मर्यादित स्वामित्व द्यावें अशी तोड निघाली तर या उत्तराधिकारी लोकांच्या हक्कांबद्दल विचार करावा लागेल. आज उत्तराधिकारी वारस म्हणून जे कबूल करण्यांत आले आहेत, त्यांत विधवेच्या नवऱ्याच्या जवळच्या वारसांचाच फक्त समावेश होत नसतो; तर मयत इसमाचे चौदा पिढ्यांपर्यंतचे वारस त्यांत गणले जातात. अशा वारसांची संख्या अजमासें दोनशें सत्तावन आहे. बरेचसे वारस असे असतात कीं, मयताचे ते हाडवैरी शत्रू तरी असतात अगर अनोळखी तरी असतात. या सगळ्यांना दावे करण्याचा हक्क ब्रिटिश राजवटींत नव्यानेंच मिळाला आहे. जवळच्या वारसानें विधवेची गय केली तर त्याच्या नंतरचा वारस दावे लावूं शकतो. पुरुष मालक मरतांच हे उत्तराधिकारी गिधाडासारखे त्याच्या विधवेभोंवतीं गोळा होतात आणि विधवेला अगदीं भंडावून सोडतात. हाडवैरी, दूरचे, अनोळखी आणि आपमतलबी लोकांसाठीं नवऱ्याची मिळालेली मिळकत कीं ज्यांत तिच्या काटकसरीचा बराचसा अंश आहे–जतन करून ठेवली पाहिजे हें कायद्याचें बंधन विधवेला असह्य होतें व अशा आशाळभुतांना निराश करण्यासाठीं खोटे व्यवहार करण्याची ईर्षा तिच्या मनांत उत्पन्न व्हावी हें साहजिकच असतें. उत्तराधिकारी वारसानें विधवेशीं संगनमत केलें म्हणजे तिला वाटेल ते व्यवहार करतां येतात. तेव्हां विधवा या आपमतलबी वारसांची संमति विकत घेऊं शकते. असा हा एकंदर अथपासून इतिपर्यंत उत्तराधिकारी वारसांचा छळ विधवेला सोसावा लागतो. मयताचे जवळचे वारस विधवेची पैशाअडक्यासंबंधींची खरी स्थिति जाणणारे असतात. मयताशीं असलेल्या नात्याच्या जिव्हाळ्यामुळें त्याच्या कुटुंबाबद्दल त्यांना आत्मीय भावना असते. आणि क्रमानें ते विधवेच्या नंतर लगेच वारस असतात. अशा जवळच्या नातेवाइकांना फसविण्याचा अधिकार विधवेला असूं नये असें कित्यकांचें म्हणणें आहे. तेव्हां उत्तराधिकारी वारसांपैकीं मुलगी, आईबाप, भाऊ, पुतण्या, बहीण, आजोबा, मुलीची मुलगी व मुलगा ह्या वारसांनाच फक्त विधवेनें केलेल्या व्यवहाराविरुद्ध तक्रार करण्याचा हक्क असावा व बाकीच्या वारसांना तसा हक्क नसावा अशी वैकल्पिक सूचना येथें नमूद करावीशी वाटते. आणि बडोदें समितीनें

हेंच सुचविलें होतें व तें आतां कायद्याचें तत्त्व म्हणून बडोदें हिंदु कायद्यांत प्रविष्ट आहे. असें झालें तर जेव्हां जवळचे वारस कोणी नसतील तेव्हां तरी विधवेस वस्तुतः स्वतंत्र स्वामित्व मिळेल. बाकीच्या दूरच्या वारसांचा हरकत घेण्याचा हक्क काढून घेतला म्हणजे तिला मिळकतीची व्यवस्था करण्याची पूर्ण मुभा मिळेल.

## विधवा सून—

विधवा सुनेच्या हक्काबद्दल खुलासा केला पाहिजे. अविभक्त कुटुंबांत विधवा सुनेला अन्नवस्त्राचा हक्क आहे. तिला नवऱ्याच्या ठिकाणीं हिस्सेदार म्हणून गणावें अशी आतां देशमूख कायद्यानें जी तजवीज केली आहे तिचा फायदा तिलाहि मिळेल व तिला आपल्या नवऱ्याचा हिस्सा मिळेल. खरी अडचण विभक्त कुटुंबांत उत्पन्न होते. तिच्या नवऱ्याची मिळकत सासऱ्याला मिळाली असेल तर तिला अन्नवस्त्र देण्याला सासरा कायद्यानें बिलकूल बांधलेला नसतो. पण तिचें भरणपोषण करण्याची सासऱ्यावर पडणारी नैतिक जबाबदारी त्याच्या पश्चात् त्याच्या मिळकतीवर कायदेशीर जबाबदारी म्हणून समजली जाते, व ती मिळकत घेणाऱ्यास त्या विधवा सुनेस अन्नवस्त्र द्यावें लागतें, असें आजचें कायद्याचें धोरण आहे. त्यांत फेरफार किती करतां येईल तें पाहूं. खुद्द तिच्या नवऱ्यास सासरा जर पोसण्यास बांधलेला नव्हता तर त्यानें आपल्या सुनेस पोसलें पाहिजे असा हट्ट धरणें बरोबर नाहीं. मात्र एका बाबतींत सुधारणा करतां येण्यासारखी आहे. आणि ती अशी—सासऱ्याच्या मिळकतीचा वारसा तिला मयत पुत्राच्या ठिकाणीं समजून मिळाला पाहिजे. मग ती एकटी वारस असो अगर दिरांच्या बरोबर ती वारस होत असो.

## कांहीं इतर हक्क—

नवऱ्याच्या मिळकतींत पत्नी ही सहमालकीण होते व तिचा हा मालकी-हक्क पतिनिधनानें नष्ट होत नाहीं, ह्या दोन मूलभूत मागण्या कायम झाल्या म्हणजे स्त्रियांचे वारसा हक्काचे अनेक अन्यायी प्रश्न आपोआप सुटतात. तिघे भाऊ आणि चौथ्या भावाची विधवा अशा कुटुंबास त्यांच्या चुलत्याचा अगर आजोबाचा (आईकडच्या) वारसा मिळाला तर आज फक्त तीन भावां-

नाच ती मिळकत मिळते; मयत भावाच्या विधवेस कांहींच मिळत नाहीं; पण नंतर ही स्थिति पालटेल व त्या मिळकतीचे सारखे चार भाग होऊन एक भाग विधवेला मिळेल. दुसरें एक कायद्याचें असें तत्त्व आहे कीं, सारख्या दर्जाच्या वारसांत स्त्रीवारसापेक्षां पुरुषवारसास अगोदर मिळकत मिळावी. हेंहि अन्यायी तत्त्व आपोआप नाहींसें होईल व वरचीं दोन तत्त्वें अशीं अमोघ आहेत कीं, विवाहित स्त्रियांचा दरेक प्रश्न अत्यंत समाधानकारकपणें तीं सोडवूं शकतात.

## आई—

मातेचा प्रश्नहि सोडविला पाहिजे. अविभक्त कुटुंबाची मिळकत असेल तर माता ही मयत पित्याच्या ठिकाणीं येईल व मुलांच्या बरोबरीनें हिस्सा मागूं लागेल. विभक्त कुटुंबांत तिला समाश्रित म्हणूनच गणावें लागेल. तिला मुलाच्या मिळकतींत हिस्सा देणें सोईचें होणार नाहीं. आणि हिस्सा तरी कसा देतां येईल? विभक्त झालेल्या व स्वतः कमवणाऱ्या मुलाची ती सहमालकीण आहे असें म्हणतां येईल काय ? आणि हिस्सा तर फक्त मिळकतीचे मालकच मागूं शकतात. म्हणून तिला समाश्रित गणून मुलांच्या ह्यातींत तसेंच पश्चात् अन्नवस्त्राचा हक्क दिला पाहिजे. आजहि तसा हक्क तिला आहे व तोच जास्त भक्कम पायावर स्थिर करण्यासाठीं असें सुचवावेंसें वाटतें कीं, मुलांच्या मिळकतीवर मातेच्या भरणपोषणाची कायदेशीर जबाबदारी समजून तिचा बोजा त्या मिळकतीवर पडावा.

## इतर बाबतींविषयीं—

इतर बाबतींत, उदाहरणार्थ वारसांचा क्रम आणि त्यांत स्त्री वारसांचें स्थान, स्त्रीधन आणि त्याचे वारस या बाबतींत ठिकठिकाणीं सुधारणा सुचवितां येण्याजोगे खांचखळगे आहेत. पण त्यांचा विचार कालगतीनें व यथाक्रम होईल. ते खांचखळगे असे कांहीं खोल किंवा रुंद नाहींत कीं, ज्यांत हिंदु स्त्रियांच्या उत्कर्षाचा गाडा कांहीं वेळ तरी अडकून बसेल. फार झालें तर तो गाडा धांवत असतांना या उंच-सखल रस्त्यानें वरखालीं धक्के बसतील. शहरांतील लोकांना खेडेगांवांतील खांचखळग्यांच्या वाटेचा बैलगाडीचा

प्रवास थोडी करमणूक करणारा तर वाटतोच, पण त्याहीपेक्षां तो एक निराळीच गोष्ट सांगत असतो. आणि ती गोष्ट ही कीं, हे आपले अस्सल जुने प्रवासमार्ग आणि हेच आपल्या वाडवडिलांच्या सहनशीलतेचे साक्षी. वर ज्या विषयाबद्दल विस्तृत रीतीनें विवेचन केलें आहे त्या विषयप्रांतांत आज स्त्रियांच्या उन्नतीचाच काय, पण पर्यायानें हिंदु समाजाच्या भरभराटीचा गाडा वाळूंत रुतून बसला आहे. त्यामुळें स्त्रीसमाज दीनवाणा होऊन कायदेशीर नियंत्रणाच्या वाळवंटांत होरपळत पडला आहे. त्या वाळवंटांतून गाडा पुढें ओढला आणि समान हक्काच्या कठीण जमिनीवर तो आणून सोडला तरी चालू काळाच्या दुर्लंघ्य दरडी चढून व पर्वताच्या माथ्यावर जाऊन पोहोंचूं, आणि तेथून पुढें नवीन युगाच्या अरुणोदय-प्रकाशांत समाजव्यवस्थेचे राजमार्ग आपणांस आढळतीलच.

---

## प्रकरण १० वें

# उपसंहार

### विधायक सूचनांची जरूरी—

येथपर्यंत स्त्रियांच्या वैयक्तिक आणि आर्थिक हक्कांची चर्चा केली व त्यांत सुधारणा करण्यासाठीं विधायक सूचनाहि पुढें मांडल्या. हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर दुर्दशेचें वर्णन एतद्विषयक निबंधांत व वाङ्मयांत इतरत्र गेल्या चाळीस पन्नास वर्षांत अनेक ठिकाणीं केलेलें आढळतें. आणि या प्रश्नाला चालना देण्याचे ज्या ज्या महात्म्यांनीं प्रयत्न केले त्यामुळेंच आज थोडीबहुत जागृति आणि सहानुभूति दिसून येत आहे. कायदेशीर दुर्दशा सगळ्यांनीं वर्णन केली. बहुजनसमाजाला ती पटली व समाजसुधारकांना ती दूर करण्याची बुद्धि झाली. तथापि विधायक सूचना पुढें मांडल्याशिवाय या प्रश्नाला खरें तोंड लागणार नाहीं असें वाटून आतांपर्यंत केलेल्या सूचना पुढें मांडल्या आहेत. विषय कायद्याचा व धर्मशास्त्राचा म्हणून गुंतागुंतीचा, तेव्हां कायदा जाणणाऱ्यांवर तो विषय बहुजनसमाजाला विशद करून सांगण्याची जबाबदारी पडते. सामाजिक सुधारणा करण्याची कळकळ असूनहि कायद्याच्या ज्ञानाच्या अभावीं स्त्रियांच्या दुर्दशेचे प्रश्न योग्य तऱ्हेनें सोडवितां येणार नाहींत; आणि एकाद्या सामान्य वकिलानें जर त्या चळवळीला विरोध केला तर खरीं दुःखें असून व तीं निवारण करण्याची खरी जरूरी असून अनभिज्ञ समाज-सुधारकाला हार खावी लागेल. तेव्हां अशा जिज्ञासू लोकांच्या व भगिनीवर्गाच्या आटोक्यांत हा विषय आणन द्यावा, साधक-बाधक चर्चेस जरूर असणारीं शास्त्रवचनें व तर्कसिद्धान्त त्यांना पुरवावेत आणि विधायक मागण्यांचा तक्ता त्यांच्यापुढें मांडावा या उद्देशानें विषयाची मांडणी केली आहे. विधायक मागण्या जनतेपुढें मांडल्या तरी हा हक्काचा झगडा कोणीं कसा लढवावा याचें विवेचन थोडें केलें पाहिजे. त्यांत खुद्द स्त्रियांना काय करतां येण्यासारखें आहे व पुरुषवर्गावर जबाबदारीचें ओझें किती आहे याचाहि विचार करावा लागेल.

### हक्क मिळविण्याचे सामुदायिक उपाय—

आजचें हिंदुधर्मशास्त्र बहुतेक न्यायाधिशांच्या ठरावांनीं व्यापलें आहे. कोर्टाचे ठराव कोर्टावर हमेश बंधनकारक असतात. मनांत सुधारणा घडवून आणण्याची इच्छा असतांहि न्यायाधीशांना पूर्वींच्या ठरावाविरुद्ध निकाल देतां येत नाहीं. हिंदुधर्मशास्त्रांत स्त्रियांच्या हक्कापुरती सुधारणा घडवून आणणें असेल तर कायदेकौन्सिलांतून कायदा पास करून घ्यावा लागेल. त्याचा विधि असा. कायदे कौन्सिलाच्या सभासदानें एकाद्या कायद्याचा मसुदा तयार करून तो कौन्सिलांत मांडण्यासाठीं पाठवावा लागतो. तो मसुदा मांडण्यास सरकारनें परवानगी दिली म्हणजे तो चर्चेसाठीं कौन्सिलापुढें येतो. कित्येक वेळेस त्याची चर्चा तहकूब राहते; कित्येक वेळेस तो सिलेक्ट कमिटीकडे पाठविण्याचें ठरतें; कित्येक वेळेस लोकमत अजमावण्यासाठीं तो पुन्हां प्रसिद्ध करण्याचें ठरतें; आणि कित्येक वेळेस विरुद्ध चर्चेच्या वावटळीनें वाळलेल्या पानाप्रमाणें तो उडूनहि जातो. हे सर्व अपमृत्यू टळले तर तो मंजूर होतो. आणि व्हॉइसरॉय अगर गव्हर्नर साहेबांच्या संमतीनें कायद्याच्या स्वरूपांत बाहेर पडतो. अशी ही रीत आहे. तेव्हां स्त्रियांनीं या कायदेशीर मार्गानें आपल्या हक्कांचें गाऱ्हाणें कायदेकौन्सिलांच्या चव्हाटयावर मांडलें पाहिजे. या प्रश्नाची तीव्रता ठसविण्यासाठीं आणि आपल्या मागण्या पटविण्यासाठीं लोकमत तयार करणें जरूर आहे. म्हणून ठिकठिकाणीं सभा भरविणें, विधायक मागण्या पुढें मांडून त्यांना पाठिंबा मिळविणें हीं कामें स्त्रियांच्या निरनिराळ्या संस्थांकडून होण्यासारखीं आहेत. याशिवाय दुसरा मार्ग असतो आणि तो म्हणजे स्त्रियांच्या हक्कांची चौकशी करण्यासाठीं सरकारी कमिटी नमून घेण्याचा. अशी कमिटी निरनिराळ्या विद्वानांचे अभिप्राय मागविते; तोंडीं पुरावा घेते; शास्त्राधार, चालू कायदा या सर्वांचा विचार करून वर्तमानकाळीं आवश्यक वाटणाऱ्या सुधारणा पुढें मांडते. कमिटीच्या निवेदनावरून कायद्याचा मसुदा घडविण्यांत येतो आणि नंतर तो कौन्सिलापुढें इतर मसुद्याच्या मार्गानें चर्चेसाठीं येतो. असा मसुदा पुढें आला म्हणजे तो मंजूर होण्याचा विशेष संभव असतो. कमिटीनें घेतलेला पुरावा व तिनें गोळा केलेले विद्वानांचे अभिप्राय यांच्या पाठिंब्याच्या जोरावर विरोधकांचीं तोंडें बंद करतां येतात. शारदा ॲक्ट पास झाला,

त्याचें सर्व श्रेय सर मोरोपंत यांच्या कमिटीस द्यावें लागेल. अशा प्रकारच्या कमिटचा म्हैसूर व बडोदें संस्थान यांनीं नेमल्या होत्या व दोन्ही संस्थानांत आर्थिक हक्कांबद्दल उदार धोरणी कायदे मंजूर झाले आहेत. कमिटी नेमून घेण्याची मागणी दिसण्यांत लहान व बिनविरोध मंजूर होण्यासारखी असते. अगदीं जुन्या मताच्या माणसालाहि आशा वाटते कीं, असलेले हक्क काढून घेण्याची आवश्यकता आपण कमिटीपुढें मांडून मंजूर करून घेऊं. परिणामाच्या दृष्टीनें ती मोठेंच काम करूं शकते. शिवाय लोकांना कोणत्या सुधारणा सांप्रत पचतील हें कमिटी चांगल्या तऱ्हेनें ठरवूं शकते. कारण तिच्यापुढें सर्व प्रकारचीं मतें व्यक्त झालेलीं असतात व त्यांचा निष्कर्ष काढून योग्य त्या सूचना ती करीत असते. ज्या भगिनी संस्थानांत राहात असतील त्यांनीं अशा कमिटचा आपआपल्या राजांकडून नेमून घ्याव्यात. खालसांतील पेक्षां संस्थानांत हा प्रश्न लवकर सुटण्यासारखा आहे. तेव्हां संस्थानी भगिनींनीं चळवळ करून खालसांतील लोकांच्या अगोदर हक्क पटकवावेत.

**अकरा कोटी व्यक्तींचा प्रश्न—**

सरकारची मदत मिळणें दुरापास्त व दिरंगाईचें आहे. तेव्हां दरेक हिंदु स्त्रीपुरुषास स्त्रियांच्या हक्काच्या बाबतींत काय काय करतां येण्यासारखें आहे तें आपण पाहूं. रजिस्टर लग्नपद्धति याचा कायदा स्पेशल मॅरेज ॲक्ट हा आहे. आणि हा कायदा अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळें त्याची जास्त ओळख करून दिली पाहिजे. ह्या कायद्याखालीं कोणाहि मनुष्यास स्वजातीय अगर परजातीय व्यक्तीशीं ठरलेलें लग्न रजिष्टर करून घेतां येतें. फक्त पुढील अटी त्यांत दिलेल्या आहेत. वधू अगर वर यांपैकीं कोणाचा नवरा अगर बायको जिवंत असतां कामा नये. पुरुषाचें वय अठरा व मुलीचें वय चौदा वर्षांपेक्षां जास्त असलें पाहिजे. एकवीस वर्षांच्या वयाच्या खालच्या वधूवरांनीं आपल्या पित्याची अगर पालकाची संमति मिळविलेली असली पाहिजे. आणि वधूवरांचें पूर्वीचें नातें लग्न न होण्याइतकें जवळचें असतां कामा नये. लग्न रजिष्टर केलें म्हणजे त्यापासून वैयक्तिक आणि आर्थिक हक्क अगदीं निराळेच उत्पन्न होतात. या ॲक्टखालीं लग्न केलेल्या पुरुषाला पहिल्या बायकोच्या हयातींत दुसरें लग्न करतां येत नाहीं. आणि त्यानें तसें

लग्न केलें तर फौजदारी कायद्याप्रमाणें त्याला शिक्षा होते. अशा लग्नांना हिंदी घटस्फोटाचा कायदा लागू पडतो. आणि त्यांत ठरविलेल्या कारणां-वरून उभयतां नवराबायकोंना झालेलें लग्न रद्द करून घेतां येतें व घटस्फोटहि मागतां येतो. या कायद्याखालीं लग्न करणारा पुरुष लग्न होतांच अविभक्त कुटुंबांतून वेगळा झाला असें समजण्यांत येतें. तथापि त्याच्या वारसा हक्कास बाध येत नाहीं. लग्न केलेल्या व्यक्तींपैकीं कोणी मयत झालें तर त्याच्या मिळकतीचा वारसा इंडियन सक्सेशन ॲक्टाप्रमाणें उतरतो. त्याचा वारसा-क्रम थोडक्यांत असा आहे: मयतास विधवा आणि मुलें असतील तर मिळकतीचा तिसरा हिस्सा त्याच्या विधवेस आणि बाकीचे दोन हिस्से त्याच्या मुलास मिळतात. त्याला संतति नसेल, पण जवळचे नातेवाईक असतील तर अर्धी मिळकत त्याच्या विधवेला व अर्धी त्याच्या जवळच्या नातेवाइकांना मिळते. आणि जवळचे नातेवाईक नसले तर सर्व मिळकत त्याच्या विधवेला मिळते. मुलगा आणि मुलगी यांना बापाच्या मिळकतीचा वारसा समसमान मिळतो. स्पेशल मॅरेज ॲक्टखालीं म्हणजे रजिष्टरपद्धतीनें ज्यांचीं लग्नें होतात अशा स्त्रियांचीं सर्व गाऱ्हाणीं दूर होतात. बहुपत्नी-कत्वाच्या दुष्ट चालीस जसा त्यामुळें आळा बसतो तसा हा कायदा स्त्रियांना घटस्फोटाची सवलत आटोक्यांत आणून देतो. विभक्त-अविभक्त कुटुंबाचा बखेडा न ठेवतां एका चुटकीसरशीं लग्न करणाऱ्या पुरुषांस हा विभक्त ठरवितो, त्याचा वारसा मुलांच्या बरोबरीनें त्याच्या विधवेस देतो. इतकेंच नव्हे, तर वारसांत मिळालेल्या मिळकतीवर त्या स्त्रीला संपूर्ण मालकी देतो. मुलींना (विवाहित वा अविवाहित) मुलांच्या बरोबरीनें आईबापांची मिळकत समसमान हिश्शानें मिळते. ही एकंदर सवलत पाहिली म्हणजे मनांत येतें कीं, हिंदुधर्मशास्त्रांत फेरफार घडवून आणण्याचें दुःसाध्य काम घडवून आण-ण्यांत समाजसुधारकांचे जे श्रम खर्ची पडतील तेवढ्या श्रमांत रजिस्टर लग्न-पद्धति लोकप्रिय करतां येईल. बहुजनसमाजाबरोबर जुन्या कायद्याच्या गाळांत रुतून बसलेल्या सुधारणेच्छु व्यक्तींना तरी योग्य त्या सुधारणा अंमलांत आणणें शक्य होईल. आपल्या समाजांत अज्ञान आणि दारिद्र्य हीं फार आहेत. तेव्हां समंजस आणि शिकलेल्या लोकांची विनाकारण कुचंबणा होते. कायदे करणाऱ्या पुढाऱ्यांचीं मनें वळविण्याऐवजीं आणि दुर्धरकांची

समजूत घालण्याऐवजीं शिष्ट गणल्या जाणाऱ्या सुशिक्षित समाजानें हिंदु लग्नपद्धतीवर बहिष्कार घातला आणि रजिस्टर पद्धति सरसहा अंमलांत आली तर हिंदु कायदाहि शरण येईल. तेव्हां ज्यांना ज्यांना हिंदु स्त्रियांची कायदेशीर दुर्दशा निवारण करण्याची इच्छा असेल, निदान त्या दुर्दशेच्या खाईंत आपण अगर आपलीं मुलेंबाळें होरपळत पडूं नयेत असें वाटत असेल, त्यांनीं स्वतःचीं व मुलाबाळांचीं लग्नें रजिष्टर पद्धतीनेंच करावीं. अविवाहित मुलींनीं तर शपथच घ्यावी कीं, लग्न करावयाचें झालेंच तर मी रजिष्टर-पद्धतीनेंच करीन. रजिष्टर पद्धतींत गणगोत्रच काय एक जातसुद्धां लागत नाहींत, तेव्हां त्यामुळें वरपसंतीचें क्षेत्रहि पुष्कळच विस्तृत होईल तें निराळेंच.

## हक्क मिळाल्यानेंच स्त्रियांची खरी उन्नति होईल—

स्त्रियांची उन्नति जर खरोखरी कशानें होणार असेल तर ती त्यांचे कायदेशीर हक्क त्यांच्या हस्तगत करून दिल्यानेंच. नुसतें शिक्षण दिल्यानें त्यांची स्थिति सुधारेल हें म्हणणें अत्यंत चुकीचें आहे. उलट शिक्षणानें व प्रौढ विवाहानें त्यांच्या अडचणी वाढवून गृहसौख्यांत नवीनच बखेडे उत्पन्न केले आहेत. शिक्षणानें त्यांना ज्ञान होईल, व्यवहारकौशल्य येईल व कदाचित् मिळवितें होतां यईल. परंतु त्यांना स्वतंत्रता नसेल तर त्यांची सर्व हुषारी कवडीमोल ठरेल. शिक्षणानें ती सुसंस्कृत होईल, तिचें कलाकौशल्य वाढेल व जास्तींत जास्त म्हणजे ती सुगृहिणी, सुकन्या, सुमाता व कलावंत विदुषी होईल; पर्यायानें ती पुरुषजातीच्या अधिक उपयोगी पडण्यास लायक होईल. एकाद्या उपयोगाच्या प्राण्यास सेवाचाकरींत तरबेज करण्यासाठीं दिलेलें शिक्षण त्या प्राण्याची उन्नति करण्यास कितीसें उपयोगी असतें? तद्वतच स्त्रियांना फक्त शिक्षण दिल्यानेंच त्यांची खरीखुरी उन्नति होणार नाहीं. शिक्षण देण्याच्या कार्यक्रमास विरोध आहे असा मात्र कोणी गैरसमज करून घेऊं नये. शिक्षण हें उन्नतीचें साधन आहे आणि साध्य जर कांहीं असेल तर वैयक्तिक व आर्थिक समान हक्क होत. अंगांतील गुणांचा विकास करणें, व्यक्तींतील कर्तबगारी जागृत करणें, कार्यांत कौशल्य प्राप्त करून देणें व उदात्त ध्येयाची वाट दाखविणें ही शिक्षणाची फलश्रुति असली तरी प्राणि-मात्राच्या कर्तबगारीस वाव नसेल, गुणांचा विकास होण्यास परावलंबी

स्थितीमुळें अशक्य होत असेल, व्यवहारकौशल्य दाखविण्यांत काडीभरहि सत्ता नसेल आणि उदात्त ध्येयाची वाट दिसत असतांहि दुसऱ्यानें वाटेंत लुबाडल्यानें तोंडांत मारल्यासारखें होऊन मधेंच मटकन बसावें लागण्याची खात्री असेल तर सुशिक्षण असतांहि त्यांना उन्नतीस पारखें व्हावें लागेल.

## व्यक्तिमात्रास काय करतां येईल?—

आतांपर्यंत ज्या अडचणी दाखविल्या आहेत त्यांवरून त्या प्रश्नाचें महत्त्व वाचकांच्या लक्षांत आलें असेल. तथापि या कायदेशीर दुर्दशेच्या वणव्यांत लोकसंख्येचा किती भाग सांपडला आहे हें पाहिलें म्हणजे हा बहुसंख्याकांचा एक प्रश्न होतो. खानेसुमारीच्या आंकड्यांवरून हिंदु स्त्रियांची संख्या अकरा कोटींच्या आसपास आहे. सात कोटी मुसलमानांचें समाधान साधण्यासाठीं अराष्ट्रीय घटना कबूल करण्यास हिंदू तयार झाले आहेत. आठ कोटी हरिजनांसाठीं हिंदुस्थानच्या दृष्टीनेंच काय, पण जगाच्या दृष्टीनें अवतारी म्हणून गणल्या जाणाऱ्या महात्म्यानें आपला प्राण इरेला लावला; तेव्हां अकरा कोटी संख्येच्या एका दीन घटकाचें दुःख निवारण करण्यासाठीं सर्व बाजूंनीं तात्कालिक प्रयत्न झाले तर ते पाहिजेच आहेत. स्त्रियांची स्थिति एका शब्दांत वर्णन करावयाची तर 'पराधीन' हें विशेषण त्यासाठीं वापरावें लागेल. आणि वैयक्तिक हक्काबद्दल तर 'स्त्री ही नवऱ्याची गुलाम आहे' अशी शब्दयोजना वापरावी लागेल. जेथें हक्क-जबाबदाऱ्यांची चकमक उडत नाहीं तेथें असंतोषाची ठिणगीहि पण दिसत नाहीं. आज सुखी असलेल्या कुटुंबांत कदाचित् स्त्रियांच्या हक्कांची विषमता दिसून येत नसेल; पण अशा कुटुंबांतील माणसांनीं कुटुंबाचा पूर्वेतिहास आणि उपस्थित भवितव्यता यांचा आढावा मनाशीं काढला, त्यांनीं थोडीशी कल्पनाशक्ति चालवून शेजारीपाजारी, आप्तइष्ट यांच्या कुटुंबांतील घडामोडींकडे लक्ष दिलें तर त्यांना ही विषमता आणि त्यामुळें घरोघर पसरलेलें दैन्य यांची सहज ओळख पटेल. हिंदू समाजांतील स्त्री बुद्धीनें व कर्तबगारीनें इतर धर्मीय स्त्रियांच्या मानानें वरच्या दर्जाची ठरेल; पण आज ती कर्तृत्वहीन आणि निर्माल्यवत् दिसत असेल तर त्याचें कारण तिच्या पांचवीला पुजलेली ही पराधीनता होय. ज्या व्यक्तींना आपल्या कुटुंबांत मानाचें हक्काचें स्थान नाहीं त्यांना समाजांत

प्रतिष्ठा ती काय असणार ? आणि जिला काडीची सत्ता नाहीं, ती दुसऱ्याला धीर अगर आश्वासन तरी कोणत्या जोरावर देणार ? ज्या स्त्रिया सुखी आहेत व स्वतंत्र आहेत त्या तरी आपापल्या नवऱ्याच्या अगर वडिलांच्या चांगुलपणामुळेंच. आणि अशा चांगुलपणाचा पाठिंबा ज्या दुर्दैवी जीवांच्या नशिबीं लाभला नाहीं अगर जन्मभर टिकला नाहीं अशा अनेक कर्तबगार स्त्रियांचीं आयुष्यें धुळीला मिळालेलीं आहेत. भगिनीवर्गाच्या कर्तबगारीचा फायदा समाजास मिळावा, व्यक्तिमात्रांतल्या उत्तमोत्तम गुणांचा विकास व्हावा आणि एकंदर समाज भरभराटीस चढावा अशी आकांक्षा बाळगणाऱ्यांना या स्त्रियांच्या हक्कमागणीकडे दुर्लक्ष करून चालावयाचें नाहीं.

## कांहीं आक्षेपांचें निराकरण—

विषयाचा समारोप करतांना कांहीं आक्षेपांचीं उत्तरें देणें जरूर वाटतें. नाहीं तर आपले आक्षेप दुसऱ्यानें खोडून काढले नाहींत म्हणून ते खोडून काढतां येण्याजोगे नाहींत असा भलताच अभिमान ठेवून त्या आक्षेपांच्या जोरावर विरोधक सर्व विवेचनाला हरताळ फासूं शकतील. ‘ न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ’ या वचनाच्या आधारावर स्त्रियांचे वैयक्तिक हक्क आणि ‘ स्त्रियानिरिंद्रिया अदायांदा: ’ यावरून आर्थिक हक्क हिरावून घेण्यासाठीं कित्येक पुराणाभिमानी चंग बांधून पुढें सरसावतील. तर मग त्यांच्या हक्कविस्ताराच्या चळवळीस ते विरोध केल्याशिवाय कसे राहणार ? स्त्रियांच्या नालायकीबद्दलच्या या जुन्यापुराण्या आरोपांस धर्मशास्त्रकारांनीं उत्तर दिलेलेंच आहे. त्यांतूनहि सामाजिक व राजकीय लहानमोठ्या संस्था यांत पुरुषांच्या खांद्याशीं खांदा लावून काम करणाऱ्या भगिनीवर्गानें त्या जुन्यापुराण्या आरोपांस चांगलीच थप्पड दिलेली आहे. स्त्रियांची निरक्षरता ही त्यांच्या हक्कमागणीच्या आड येऊं शकणार नाहीं. साक्षरतेवरच हक्कांचें अधिष्ठान करावयाचें असेल तर किती तरी पुरुषांच्या हातांतून मिळकती काढून घ्याव्या लागतील. मनुष्यमात्राच्या हक्कांचें प्रमाण त्याच्या साक्षरतेवर कधींच आणि कोठेंच ठरविण्यांत आलेलें नाहीं आणि येतहि नाहीं. नयशास्त्रांत साक्षरतेला महत्त्वच नाहीं, तें बरोबर आहे. दरेक इसमाच्या हक्कांची जोपासना करण्यास व ते प्रस्थापित करण्यास लिहितां-

वाचतां येण्याची कला त्याला अवगत असली पाहिजे असें थोडेंच आहे? मुसलमान स्त्रिया साक्षरतेंत हिंदु स्त्रियांपेक्षांहि मागासलेल्या आहेत, तरी त्यांना वैयक्तिक आणि आर्थिक हक्क दिलेले आहेतच ना? स्त्रियांना हक्क दिले म्हणजे अनीति वाढेल असेंहि म्हणणारे निघतील. जणुं काय त्यांच्यावर असलेल्या कायदेशीर नियंत्रणासच आज त्यांच्या पुण्यचरितांचें सर्व श्रेय द्यावें लागेल! कायद्याच्या बंधनांमुळें तुम्ही पापापासून परावृत्त झालां आहांत असें म्हणणें म्हणजे लाखो सती साध्वींचा उपमर्द करणें होय. त्यांना हक्क दिल्यानें त्यांच्यांत स्वैरवृत्ति वाढेल ही भीतीहि व्यर्थ आहे. उलट प्रतिष्ठेच्या अभावीं हिंदुसमाजाच्या पायदळीं पडलेल्या निर्माल्यांतला स्त्रियांचा हा पाचोळा वावटळीबरोबर उडण्याचा संभव आजच्या स्थितींतच जास्त आहे. कुटुंबसंस्थेच्या झाडास चिकटून राहणाऱ्या जिवंत पानांना वावटळीची भीति भेडसावूं शकेल काय? स्त्रियांना त्यांच्या कुटुंबांत प्रतिष्ठा मिळाली, झालेल्या चुका दुरुस्त करण्याची त्यांना सवलत मिळाली, म्हणजे त्या शालीनतेचा पदर डोक्यावर घेऊन अधिक प्रतिष्ठेनें समाजांत वावरतील का स्वैरिणीच्या अपमानाचें मडकें गळ्यांत बांधून हिंडतील? पतिपत्नीसंबंधांत बखेडे माजतील, कोठें तो संबंध खिळखिळा होईल, तर कोठें तो तुटेल, असें भयानक चित्र कांहींजण रंगवतात, पण वस्तुतः हीं नुसतीं कल्पनेचीं भुतें आहेत. आपले हक्क व जबाबदाऱ्या ओळखून वागणाऱ्या माणसास कोणीच दुखवूं शकत नाहीं. अशा चांगल्या पुरुषाशीं गांठ पडली असतांना सुद्धां हक्क मिळाले आहेत, तेव्हां त्यांचा साक्षात्कार पाहण्यासाठीं भांडणाच्या कुरापती काढून आपल्या हातानें गृहसौख्यावर बिब्बा फासण्यास स्त्रिया उत्सुक असतील असें म्हणणें हें किती धारिष्टाचें आहे? मात्र जेथें दुसऱ्यांच्या हक्कांपुढें नमतें घेण्याची तयारी नसते, अशा ठिकाणीं कदाचित् झगडे उभे होतील. अमानुष पुरुषाशीं गांठ पडली तर तो संबंध चिरायु होण्यापेक्षां तत्काल तोडतां येणें हेंच अधिक हिताचें असतें. आणि तें दृश्य समाजानें पाहण्याचें व सहन करण्याचें धैर्य ठेविलें पाहिजे. पतिपत्नीसंबंध सुखाचे असतील तोंवर कायम राहतीलच आणि दुःखाचे होऊं लागल्यावर ते कायम टिकतील तरी कसे? ते टिकतात तरी का? आणि टिकविण्यांत काय अर्थ आहे? या चळवळीची कुऱ्हाड कुटुंबसंस्थेच्या मुळावर पडून तिचा नायनाट होईल अशी भीति विरोधक

उत्पन्न करूं शकतात. तेव्हां त्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं. कुटुंबसंस्था, कुटुंबसंस्था म्हणून जी म्हणतात ती तरी आज काय किमतीची होऊन राहिली आहे? अर्धांग वायूनें लोळागोळा झालेल्या कुटुंबसंस्थेच्या म्हातारीस प्रगतीच्या पायथ्याशीं टाकून बहुजनसमाज केव्हांच डोंगर चढून वर गेला आहे. पण ही शरपंजरीं पडलेली म्हातारी शास्त्राधाराची काठी हातांत घेऊन कायद्याच्या घटनेनें एकाद्या बारा वर्षांच्या मुलीप्रमाणें लुडबुडाट करीत आहे. समाजानें आपले आचारविचार पालटले, जुने ऋणानुबंध झुगारून दिले, अशा स्थितींत कुटुंबसंस्थेची प्राथमिक कल्पना केव्हांच वाऱ्यावर उडून जाण्यास पाहिजे होती; पण हिंदुसमाजाचें अज्ञान आणि परकीय सत्तेची उदासीनता यांच्या राजवटींत जीं अनेक दुःखें हट्टानें जिवंत राहूं शकलीं आहेत त्यांत हिंदुधर्मशास्त्राचें आजचें विकृत स्वरूप हें एक होय. कुटुंबसंस्थाच राहिली नाहीं तेव्हां ती मोडेल अशी भीति कशाला बाळगावी! बरें, स्त्रियांना हक्क दिले म्हणजे ती मोडेलच हें कशावरून? उलट आम्ही ज्या सूचना आतांपर्यंत केल्या आहेत त्या सर्व सूचनांचा कटाक्ष, ही कुटुंबसंस्था जिवंत असेल तेथेंहि विस्कळितपणा न येतां उलट समान हक्क सर्वांना तिच्या छाये-खालीं बसून उपभोगतां यावेत या गोष्टीकडे आहे. मिळकतीचे अधिक भाग पडतील हें म्हणणेंहि खोटें आहे. भाग मिळतो म्हणून केवळ हौसेकरितां जवळच्या नातेवाइकांना सोडून कोणीहि स्त्री वांटणी करून स्वतंत्र राहण्याची इच्छा धरील हें संभवतें का? आणि भाग पडतील याची भीति तरी कां वाटावी? मिळकत ही मनुष्यांच्या उपयोगासाठीं आहे. मिळकतीसाठीं व्यक्तिमात्राच्या हितावर निखारा ठेवणें हा मूर्खपणाच होईल. पूर्वीच्या धांदलीच्या आणि लढायाच्या काळांत स्त्रियांनाच काय, पण इतर पुरुष कुटुंबियांना मुळींच सत्ता नव्हती. तो कालहि बदलून गेला. पुरुषांना सत्ता मिळाली; मग स्त्रियांच्या हक्कांची वाट काय? आज पुरुषांना मिळकत उडविण्याची जी अनियंत्रित सत्ता कायद्यानें दिली आहे, त्या सत्तेवर कुटुंब-संस्थेच्या आणि कुटुंबाच्या स्थैर्याखातर निर्बंध घालावेत असें कोणी सुचविलें आहे का? निरनिराळ्या व्यवसानांपायीं मिळकतीचा नायनाट करून त्यांच्यावर अवलंबून असलेल्या बायकामुलांची अन्नान्नस्थिति करणारे पुरुष थोडे का आढळतात? स्त्रियांना स्वातंत्र्य नको, असें त्या स्वातंत्र्याचा दुरुप-

योग करणाऱ्या एकाददुसऱ्या स्त्रीच्या उदाहरणाकडे बोट दाखवून म्हणावयाचें असेल तर तशींच उदाहरणें पुरुषांचीं नाहीं का आढळणार ? ज्यांना स्वातंत्र्य न देतां बंदिवासांत कायमचें कोंडून ठेवलें असतें तर त्यांचा स्वतःचा अधःपात व त्यांच्या नातेवाइकांचा छळ टाळतां आला असता अशा मनोरचनेचे आणि नीतिमत्तेचे किती तरी इसम पुरुषजातींतून निवडून काढतां येतील ! तेव्हां हक्कांचा दुरुपयोग करण्याचा मक्ता स्त्रियांनींच घेतला आहे अगर तो पुरुषांनाच असावा असेंहि म्हणतां येत नाहीं. याशिवाय किरकोळ आक्षेप अनंत येतील. त्यांतील बरेचसे विरोधकांच्या आकुंचित कल्पनेचे अगर कुजट परिस्थितीचे परिणाम असतात. हा प्रश्न सोडवितांना मनुष्यानें मनांत सहृदयता ठेवून समाजाच्या शाश्वत सुखाकडें दृष्टि ठेवली तर बरेचसे आक्षेप जागच्या जागीं जिरून जाणार आहेत.

## सुधारणा कोणी करावयाची—

स्त्रियांना हक्क काय काय द्यावेत हा सर्व जनतेच्या मताधिक्यानें सुटण्यासारखा प्रश्न नाहीं. तो प्रश्न ज्यांना शास्त्रकारांनीं शिष्ट म्हणून म्हटलें आहे त्यांनींच युक्तायुक्त विचारानें सोडविला पाहिजे.

स्मृतिकालांतहि संस्कृतीची मुळींच तोंडओळख नसणाऱ्या मूळच्या रहिवाश्यांच्या जाती कांहीं कमी नव्हत्या; परंतु त्यांनाहि धर्मनियंत्रण लागू करावयाचें तें शिष्टांचेंच, असा नियम होता. मनु म्हणतो, धर्मनिष्ठ ब्राह्मणानें व सदाचारी गृहस्थानें जें आचरिलें असेल तोच धर्म म्हणून राजानें निश्चित करावा.

सद्भिराचरितं यतं यस्याद्धार्मिकैश्च द्विजातिभिः।
तद्देशकुलजातीनामविरुद्धं प्रकल्पयेत्।

श्रुतीस्मृतींत धर्म सांगितला आहे खरा; परंतु त्याच्या अभावीं शिष्ट म्हणून जे आहेत त्यांचा आचार हाच धर्म, असें वसिष्ठ म्हणतो. बौद्धायनानें निरनिराळ्या धर्मांचा दर्जा सांगतांना म्हटलें आहे—वेदांत मूळ धर्म सांगितला आहे तो पहिला; त्यानंतर स्मृतींत जो धर्म सांगितला तो दुसरा आणि त्यानंतर शिष्टांचा आचार हा तिसरा धर्म होय. शिष्ट कोणास म्हणावें ?

तर तो म्हणतो, ज्यांना मत्सर नाहीं, अहंकार नाहीं, अभिलाष नाहीं व ज्यांनीं दंभ, गर्व, लोभ, मोह, क्रोध टाकून दिले आहेत अशांना शिष्ट म्हणावें.

उपदिष्टो धर्मः प्रतिवेदम् स्मार्तो द्वितीयः। तृतीयः शिष्टागमः शिष्टा खलु विगतमत्सरा निरहंकारा अलोलुपा दंभ-दर्प-लोभ-मोह-क्रोध-विवर्जिताः ॥

तेव्हां आजचा सुशिक्षित समाज हाच शिष्टाचाराचा हा तिसरा धर्म घालून देत आहे. ज्यांचे आचारविचार अगदीं राजसत्तेच्या अधिकारानें सर्व समाजाचें नियंत्रण करण्यास समर्थ असतात अशा शिष्टांच्यावर फार मोठी नैतिक जबाबदारी असते. समाजांत असलेल्या अडचणी दूर करण्याचीच काय, पण दीनदुबळ्या व्यक्तींच्या हक्कांसाठीं झगडण्याची सर्व भारी जबाबदारी त्यांच्या मोठेपणाच्या प्रमाणांत त्यांच्या खांद्यावर येऊन पडते. तेव्हां बहुजनस्त्रीसमाज तटस्थ आहे, अज्ञानांत निपचित पडलेला आहे, तेव्हां त्यांना नवीन हक्क कोठें पाहिजे आहेत ! त्यांना नको असलेले हक्क त्यांच्यावर कशाला लादावे ! असा युक्तिवाद करून स्वतःच्या जबाबदारींतून पळून जाण्याचा मार्ग धर्मशास्त्रानें त्यांना ठेवलेला नाहीं. दरेक गोष्टीचा विचार करतांना त्यांनीं आपली विवेकबुद्धि ओळखून निर्णय द्यावा. शिष्टांची जी बौद्धायनानें व्याख्या केली ती सुधारलेल्या व तटस्थ मानवी मनोभूमीची साक्ष पटवणारी आहे. अशी मनोरचना ठेवूनच शिष्टांनीं जर आचार अंमलांत आणला तर तो कायदा होत असतो. सामाजिक बाबतीची अर्थात् आचाराची योग्यायोग्यता ठरविण्याच्या वेळेस निर्मळ मनानें पाहणारा तोच खरा शिष्ट होय. म्हणून अशा शिष्टांनींच स्त्रियांच्या हक्कांचा प्रश्न धसाला लावून सोडविला पाहिजे. आजहि स्वराज्य कशा प्रकारचें पाहिजे त्याची रूपरेषा व तपशील ठरविण्यासाठीं बोटावर मोजण्याइतकेच पुढारी एकत्र जमून राज्यकर्त्यांशीं वाटाघाट करीत आहेत. यच्चयावत् हिंदुस्थानांतील मनुष्याचा अभिप्राय घेऊन स्वराज्याचा प्रश्न सोडवूं म्हटलें तर 'आम्हांस स्वराज्य नको' असें म्हणणारे लोक यांचीच मतें अधिक पडतील. पण अज्ञानी मनुष्यास महत्त्वाच्या बाबतींत जसा मत देण्याचा अधिकार नसतो, तसा निरंतर दुःखांत खितपत पडून राहण्याचा त्याला हक्कहि नसतो. अज्ञानी मनुष्यानें असलेल्या स्थितींत आनंद मानला तरी त्याला न दिसणाऱ्या

(१२) संगणकीकृत

११८

स्त्रियांचे हक्क व सुधारणा। जोशी वि.चा।

अडचणींतून त्याला बाहेर काढण्याचा शिष्टांना अधिकार आहे-नव्हे शिष्टांवरती जबाबदारी आहे.

स्त्रियांनीं खुद्द या बाबतींत चळवळ केली नाहीं अगर त्यांना यशस्वी रीतीनें आपलें म्हणणें पुढें मांडतां आलें नाहीं तरी भगिनी, कन्या, कान्ता आणि माता या निरनिराळ्या जिव्हाळ्याच्या धाग्यादोऱ्यांनीं पुरुष अंतःकरणाशीं कायमच्या जखडून बांधलेल्या स्त्रीजातीला त्यांच्या दुर्दशेंतून त्यांनीं बाहेर काढिलें पाहिजे. निदान स्वतःच्या उन्नतीकरितां आणि मनाच्या समाधानाकरितां त्यांनीं त्यांचें दुःख निवारण्यासाठीं धांवून गेलें पाहिजे.

### विषयाला चालना मिळावी हाच उद्देश—

वर केलेल्या सूचना सर्वच एकदम मान्य झाल्या पाहिजेत असा हट्ट नाहीं व आशा तर नाहींच नाहीं. तसेंच पुढें मांडलेल्या सूचना तेवढ्याच विचारार्ह आहेत असा अभिमानहि नाहीं. यापेक्षां चांगल्या आणि अधिक हक्क मिळवून देणाऱ्या जितक्या जास्त सूचना पुढें येतील तेवढ्या पाहिजेच आहेत. या उपेक्षिलेल्या महत्त्वाच्या प्रश्नाकडे समाजाचें लक्ष वेधावें या उद्देशानेंच या विषयावर जें काय योग्य वाटलें तें लिहिलें आहे. या प्रश्नास नुसती चालना देण्याचें श्रेय जरी मला लाभलें तरी माझे इतक्या वर्षांचे श्रम कारणीं लागले असें मानून मी कृतकृत्य होईन. प्रश्नाचें महत्त्वच एवढें आहे कीं, त्याकडे समंजस समाजाचें आपोआप लक्ष वेधेल, आणि तें शक्य तितकें लवकर वेधो एवढी इच्छा प्रकट करून वाचकांची रजा घेतों.

# ‘प्रकाश’ मंडळाचें प्रकाशन

## आगत

१. **अर्धचंद्र** :—कवि पंडित सप्रे, बी. ए., यांच्या विनोदी कवितांचा उत्कृष्ट संग्रह. किंमत १२ आणे.

२. **इस्लामी संस्कृतीचें क्रांतिकार्य** :—मानवेंद्र रॉय यांच्या इंग्रजी ग्रंथाचा श्री. नखाते, एल्एल्. बी., यांनीं केलेला मराठी सुबोध अनुवाद. किंमत १२ आणे.

३. **जीवनाचा पाया** :—श्री. बा. कृ. गलगली, यांची भावमनोहर उद्बोधक कादंबरी. खांडेकर यांची सुंदर प्रस्तावना. किंमत १॥ रुपया

४. **वर्तिका** :—‘शशाङ्क’ यांचा भावपूर्ण कलात्मक गद्य काव्यांचा अभिनव संग्रह. किंमत १२ आणे.

५. **विवाहितांचें नंदनवन** :—राजरत्न वा. वि. जोशी, एल्एल्. बी. यांच्या मार्मिक निबंधांचा संग्रह. किंमत १ रुपया

६. **स्त्रियांचे हक्क व सुधारणा** :—ले. राजरत्न वा. वि. जोशी, एल्एल्. बी. किंमत ८ आणे.

७. **फॅसिझम** :—मानवेंद्र रॉय यांच्या इंग्रजी पुस्तकाचा श्री. बा. कृ. गलगली यांनीं केलेला उत्कृष्ट अनुवाद. किंमत १ रुपया

## आगामी

१. **पुराणपुरुषाच्या अडचणी** :—ले. द. वि. गुप्ते.

२. ? ले. वि. स. खांडेकर.

‘प्रकाश’ मंडळ,

५२९ सदाशिव, पुणें २